संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
२३ जानेवारी २०२१
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)

**बराक ओबामा आणि सूरज येंगडे यांच्या दीर्घ मुलाखती**

## बांगलादेशचे प्रथम दर्शन

न्या. हेमंत गोखले



न्यायमूर्ती हेमंत गोखले व राजन अन्वर


MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
MKCL
॥ ज्ञानदीप लावू जगी ॥
जर साथ असेल MS-CIT ची, तर खात्री उज्ज्वल भविष्याची !
आता MS-CIT केंद्रात जाऊन शिका
किंवा घरून आपल्या कंप्यूटरवर शिका
किंवा आपल्या स्मार्टफोनवरून शिका
MS-CIT करा आणि जॉब रेडी व्हा !
www.mkcl.org/join
या लिंकवरून आजच प्रवेश घ्या
किंवा नजिकच्या MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
२३ जानेवारी २०२१
वर्ष ७३ / अंक - ३१
संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 /**
**Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./ चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

४ ...संपादकीय
**कोरोना अंताचा प्रारंभ झाला...**

७ **बांगलादेशचे प्रथम दर्शन**
...न्या. हेमंत गोखले

१३ **'अ प्रॉमिस्ड लॅन्ड' या पुस्तकाच्या निमित्ताने संवाद**
...बराक ओबामा

२१ **दलितांचे दुःख व अश्रू मध्यमवर्गीय भारतीयांचे होत नाहीत**
...सूरज येंगडे

२७ **लोकशाहीचा विस्तार आणि ओहोटी**
... सुहास पळशीकर

३३ **ऑर्वेलच्या तीन गोष्टी**
...जयप्रकाश सावंत

३७ **सदा सर्वदा**
...विजया देव

४१ **प्रतिसाद**
...रमेश आगाशे, शैला राव, दत्तप्रसाद दाभोळकर

## संपादकीय

# कोरोना अंताचा प्रारंभ झाला...

चीनमध्ये उगम पावलेल्या कोविड-१९ या विषाणूने जानेवारी २०२० मध्ये आपली दहशत बसवायला सुरुवात केली आणि अतिशय वेगवान वाटचाल करीत पुढील तीन महिन्यांत आख्खे जग पादाक्रांत केले. सर्वाधिक प्रगत मानल्या जाणाऱ्या युरोप खंडात त्याने अधिक रौद्र रूप धारण केले आणि महासत्ता असलेल्या अमेरिकेत तर हाहाकार माजवला. आधी गणिताच्या वेगाने वाढत जाणारे रुग्णांचे व मृत्यूंचे आकडे नंतर भूमितीच्या वेगाने वाढत गेले. आधी प्रत्येक नव्या आकड्यानंतर चिंताग्रस्त होत जाणारे चेहरे नंतर त्या आकड्यांवर नजर टाकेनासे होऊ लागले. आणि पुढे पुढे तर कोणालाच त्या वाढत्या आकड्यांचे काही वाटेनासे झाले. आणखी किती दिवस हा विळखा राहणार हा प्रश्न सुरुवातीपासून सर्वांना सतावत होता, पण शतकातून एखाद-दुसरी येणारी अशी ही साथ (महामारी) असल्याचे स्पष्ट होत गेले. आणि मग एक संपूर्ण वर्ष यातच जाणार हे उघड होत गेले. लहान-थोरांनी स्वत:च्या मनाची तशी तयारी केली. जोपर्यंत लस येत नाही, तोपर्यंत सुरक्षित अंतर आणि कमीत कमी जनसंपर्क हेच बचावात्मक उपाय आहेत, यांवर शिक्कामोर्तब झाले. त्यानंतर लस येण्याकडे संपूर्ण जगाचे डोळे लागले. लसनिर्मितीच्या यशस्वी प्रयोगांच्या बातम्या येऊ लागल्यावर लोकांनी धीर एकवटायला सुरुवात केली... आणि आता सुटकेचा श्वास घ्यायला सुरुवात केली आहे. कारण हा अंक छापायला गेला त्या दिवशी (१६ जानेवारी) भारतभरात लसीकरणाची मोहीम सुरू झाली आहे. सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या या देशात जवळपास तीन कोटी आरोग्य कर्मचारी मागील वर्षभर अहोरात्र कार्यरत होते, तणावात होते; त्यांना सर्वप्रथम लस दिली जाणार हे साहजिक आहे. त्यानंतर आणखी काही कोटी असे करत करत संपूर्ण देशात लसीकरणाच्या मोहिमा राबवाव्या लागणार आहेत. हे किती काळ चालेल, याची स्पष्टता अद्याप आलेली नाही, पण २०२१ हे वर्ष यात जाणार ही शक्यता अधिक आहे. म्हणजे जानेवारी २०२० मध्ये उगम पावलेल्या कोविड विषाणूच्या अंताचा जानेवारी २०२१ हा प्रारंभ आहे असेच म्हणावे लागते.

एकंदरीत विचार करता, सलग दोन वर्षे एका विषाणूच्या तावडीतून पूर्णत: मुक्त होण्यास लागणार ही संपूर्ण जगाची अवस्था आहे. साहजिकच शारीरिक आरोग्य हा भाग बाजूला ठेवला तरी, मानसिक, सामाजिक व राजकीय आरोग्यांवर




त्याचे बरेच दूरगामी परिणाम होत आहेत, होणार आहेत. कारण अर्थव्यवस्था बऱ्याच विस्कटल्या आहेत, व्यक्तींच्या, संस्थांच्या आणि राष्ट्रांच्याही! काही व्यक्ती, संस्था, उद्योग-व्यापार यांच्यासाठी ही स्थिती इष्टापत्ती ठरली असली तरी त्यांचे प्रमाण नगण्य आहे. सामान्यांना याचा सर्वाधिक फटका बसला आहे. या महामारीच्या लाटांमध्ये अनेकजण नामशेष झाले आहेत, अनेकजण कोलमडून पडले आहेत, अनेकांची वाताहात झाली आहे, अनेकांची स्वप्नं उद्‌ध्वस्त झाली आहेत, अनेकांची उमेद संपुष्टात आली आहेत. परिणामी, मानवी जीवनातील अनिश्चितता व क्षणभंगुरत्व यांची जाणीव नव्याने झालेल्या अनेकांचा जगण्यातील रसच कमी झाला आहे. ही सर्व परिस्थिती मानवी संस्कृतीच्या विकासासाठी सर्वाधिक हानीकारक आहे.

अशा पार्श्वभूमीवर पुढील वाटचाल कशी करावी याबद्दल भल्याभल्यांच्या मनात संभ्रम असणे स्वाभाविक आहे. पण मानवी संस्कृतीची आतापर्यंतची वाटचाल कशी होत आली आहे; याकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकता आला, त्या प्रवासातील वाटावळणे व खाचखळगे समजून घेता आले तर तो संभ्रम निश्चितच कमी होईल, मनाला दिलासा मिळेल. मानवी संस्कृतीचा उत्कर्षच होत आला आहे, असाच निष्कर्ष त्यातून निघेल. वरवर पाहता हा निष्कर्ष मनाला पटवता येणे जड जाईल. पण तसेच आहे खरे! यासंदर्भात दोन लिटमस टेस्ट ज्याला त्याला घेता येतील. पहिली टेस्ट अशी घेता येईल की, या जगाचा प्रवास धर्माकडून विज्ञानाकडे झाला तो कसा आणि दुसरी टेस्ट घेता येईल ती अशी की, या जगाचा प्रवास एकाधिकारशाहीकडून लोकशाहीकडे कसा झाला आहे!

आदिमानव विकासाचे टप्पे पार करत पुढे जाऊ लागला, तसतसे देव व धर्म या कल्पना त्याच्या मनाची पकड घेऊ लागल्या. व्यक्तीच्या मनाची सुरक्षितता व समाजाची सुव्यवस्था या गरजेतून त्या दोन कल्पना आकाराला येत गेल्या. हळूहळू त्या कल्पनांना धुमारे फुटत गेले, मग त्यांना जडत्व येऊ लागले. त्यानंतर त्यांचा जाच सुरू झाला. त्यातून येणारी बंधने व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर आक्रमण करू लागली, समूहाने पुढे जाण्याच्या मार्गातील धोंड बनू लागली. त्यात मक्तेदारी निर्माण होऊ लागली. लोकांच्या अज्ञानाचा व सुटेसुटेपणाचा गैरफायदा घेतला जाऊ लागला. रूढी, परंपरा, चालीरिती

यामुळे देव व धर्म हे समाजाच्या पायातील बेड्या ठरू लागले. आणि मग देव व धर्म या संकल्पनांविषयी संशय निर्माण होऊ लागला. त्यासंदर्भात प्रश्न विचारले जाऊ लागले. व्यक्तीच्या अधिकाराची चर्चा होऊ लागली. त्याचदरम्यान या जीवसृष्टीचे आकलन करून घेण्यासाठी विविध ज्ञानशाखा आकाराला येऊ लागल्या आणि मग विज्ञान ही संकल्पना पुढे येऊ लागली. विज्ञान ही जरी विचार करण्याची एक पद्धती म्हणून आपण मान्य करत असलो तरी, निसर्गविज्ञानाच्या विविध शाखांनी सृष्टीची रहस्ये उलगडायला सुरुवात केली तेव्हा खरे बदल होऊ लागले. नंतर उपयोजित विज्ञान (ॲप्लाइड सायन्स) घराघरांत प्रवेश करू लागले तेव्हा 'चमत्काराशिवाय नमस्कार नाही', या उक्तीचा प्रत्यय येऊ लागला. त्यापुढचा टप्पा म्हणजे तंत्रज्ञान. त्यामुळे जनजीवन सुलभ व जलद होण्याची प्रचिती दिली. आणि मग देव व धर्म या संकल्पनांचे गारूड कमी होऊ लागले. ज्ञानविज्ञान दिवाणखाण्यात आले तर देव-धर्म माजघरात ठेवले जाऊ लागले. ही एकूण प्रक्रिया बरीच गुंतागुंतीची राहिली आहे, पण तिचे ढोबळ मानाने निघालेले सार असेच आहे.

असाच काहीसा जगाचा प्रवास एकाधिकारशाहीकडून लोकशाहीकडे होत आहे. मूलत: माणूस हा एकटा असला तरी टोळी करून राहणे ही त्याची गरज बनली, तेव्हा प्रत्येकाच्या मनात वर्चस्वाची भावना कमी-अधिक प्रबळ होत जाणे स्वाभाविक झाले. आणि मग टोळीयुद्ध ही नित्याची बाब बनली. त्यातूनच पुढे मालकीहक्क पक्के होत गेले. त्याला काही एक नियमितपणा आणण्यातून एकाधिकारशाही अस्तित्वात आली, अर्थातच देवघेवीच्या पायावर तिची संरचना उभी राहिली. एकाधिकारशाही किती काळ व किती पिढ्या चालू ठेवायची याची कुजबूज ती चालवून घेणाऱ्यांच्या मनात निर्माण होऊ लागली. त्यानंतर ती 'शाही' कितपत सुसह्य व असह्य इथपर्यंत ती चर्चा आली आणि मग त्यातूनच पुढे हळूहळू 'लोकशाही' या संकल्पनेचा उदय झाला. अर्थातच लोकशाहीचा विकास व विस्तार होण्याच्या मार्गात अनंत अडथळे येत गेले. (अद्याप ते संपलेले नाहीत.) पण जग उलट्या दिशेने जाणार नाही हेच खरे! लोकशाही ही काही तरी मूर्त संकल्पना आहे, असे समजून चालणाऱ्यांना हे पटणार नाही. मात्र ती शासनप्रणाली आहे, जीवनप्रणाली आहे आणि उत्क्रांत होत जाणारी प्रक्रिया आहे, याचे भान सुटले नाही तर हे पटायला जड जाणार नाही. तत्कालीन क्रिया-प्रतिक्रियांमुळे निराशा जरूर येईल, वेळोवेळी व सर्वत्र होत असलेल्या पिछेहाटीचे दु:ख निश्चित होईल; पण अंतिमत: लोकशाहीचा गाडा पुढेच जातो आहे, याबाबतची खात्री कायम राहील. वरील निष्कर्षाशीही सहमत होता येणे अनेक लहान-थोरांना अवघड जाईल. कारण सभोवतालचे वास्तव तसे नाही, याचा अनुभव त्यांना रोज येत असतो. पण त्यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, 'निरीक्षणे बरोबर, निष्कर्ष चूक' अशी गल्लत तर आपण करीत नाही ना! व्यक्तिगत अनुभवावरून सामाजिक सिद्धांत मांडण्याची सवय तर आपल्याला लागलेली नाही ना!

कोणत्याही समाजाचा राष्ट्राचा व जगाचा उत्कर्ष व ऱ्हास मोजायचा असेल तर समग्र विचार करता येणे आणि काळाच्या टप्प्यांनुसार त्यात कमी-अधिक काय झाले, हा सारासार विचार (म्हणजेच विवेक) करण्याची वृत्ती अंगी भिनली पाहिजे. तसे न करता, तत्कालीन व तुकड्या-तुकड्यांतील निरीक्षणांचा मारा करून धडाधड निष्कर्ष काढत जाणे यामुळे समाजमनात निराशेची पेरणी तेवढी होत राहते. म्हणून जेवढ्या मोठ्या व जबाबदारीच्या ठिकाणी माणसे, तेवढा हा विवेक अधिक बाळगण्याची गरज असते.

सारांश, संपूर्ण जगावर ओढवलेल्या गतवर्षीच्या संकटाकडेही अधिक धीराने, अधिक संयमाने पाहता यायला हवे. हे खरे आहे की, १९२० नंतर असे (महामारीचे) संकट संपूर्ण जगावर २०२० मध्ये आले, त्यामुळे ते संकट अनुभवलेले आजच्या जगात कोणीही नाही. पण मानवजातीचा इतिहास असेच सांगतो की, प्रत्येक शतकात असे संकट कधी ना कधी येऊ गेले आहे. त्यातून जग पुढे सरकले आहे; नव्या आकांक्षांनी जन्म घेतला आहे, नव्या उमेदीने झेप घेऊन जगाने नवी यशोशिखरे पादाक्रांत केलेली आहेत!

000

न्या. हेमंत गोखले

# बांगलादेशचे प्रथम दर्शन

मे १९७१ मध्ये, वयाच्या विशीत असलेले कायद्याचे विद्यार्थी हेमंत गोखले बांगलादेश मुक्तिसंग्रामातील निर्वासितांना मदत करण्यासाठी गेले होते. त्यावर आधारित दहा भागांची लेखमाला जून ते सप्टेंबर १९७१ मध्ये साधना साप्ताहिकातून क्रमश: प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर जवळपास ५० वर्षांनी म्हणजे मार्च २०२० मध्ये, वयाच्या सत्तरीत असलेले निवृत्त न्यायमूर्ती हेमंत गोखले व्याख्यानांच्या निमित्ताने बांगलादेशमध्ये गेले होते. या भेटीवर आधारित दहा भागांची लेखमाला या अंकापासून क्रमश: प्रसिद्ध करीत आहोत. मागील वर्ष शेख मुजिबूर रहेमान यांचे जन्मशताब्दी वर्ष होते, तर चालू वर्ष बांगलादेशच्या स्वातंत्र्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे, त्यामुळे या लेखमालेला विशेष औचित्य आहे. **– संपादक**

बांगलादेशचा १९७१ चा स्वातंत्र्यलढा ही भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेली, भारतीय उपखंडातील सर्वांत मोठी राजकीय घटना होय. त्या वेळी पूर्व बंगालच्या जनतेची सुरुवातीची मागणी स्वायत्ततेची होती. बंगबंधू शेख मुजिबूर रेहमान त्या लढ्याचे नेतृत्व करीत होते. पाकिस्तानच्या पार्लमेंटमध्ये बहुसंख्य जागा त्यांनी जिंकल्या, तरीही पाकिस्तानचे Marshal Law Administrator जनरल याह्याखान हे बंगबंधूंना सरकार स्थापन करण्यासाठी बोलवत नव्हते. स्वायत्ततेची मागणीही त्यांनी फेटाळली. दि.२५ मार्च १९७१ रोजी शेख मुजिब यांना अटक करण्यात आली. पाक सैन्याने दडपशाही सुरू केली. जनतेचे आंदोलन वाढतच गेले. अत्याचारामुळे हैराण झालेल्या निर्वासितांचे प्रचंड लोंढे भारतामध्ये येऊ लागले. त्यांच्या हाल-अपेष्टांच्या बातम्या यायला लागल्या.

मी तेव्हा कायद्याचा विद्यार्थी होतो, युवक क्रांती दलाशी संबंधित होतो. आम्हा युक्रांदियांना स्वस्थ बसवेना. निर्वासितांची परिस्थिती समजून घ्यावी, त्यांच्यासाठी जमेल तसे काम करावे, या विचाराने आम्ही सात तरुण-तरुणी १६ मे १९७१ रोजी कलकत्त्याला निघालो. काही दिवस बोनगाव आणि पेट्रापोल येथील निर्वासितांच्या छावण्यांत मदतकार्य केले. माझा मुंबईचा मित्र शरित भौमिक आणि त्याचा मोठा भाऊ अमित त्या वेळेस त्यांच्या वडिलांच्या गावी उत्तर बंगालमध्ये जलपैगुडी येथे गेले होते. मी तिथे जाण्याचे ठरविले. माझे इतर सहकारी मुंबईला परत आले.

त्या काळात उत्तर बंगालमध्ये जाण्यासाठी बोटीने गंगा नदी ओलांडून जावे लागायचे. गंगेवरचा 'फराक्का बॅरेज' तेव्हा झालेला नव्हता. मी जवळजवळ तीन आठवडे पश्चिम बंगालमध्ये अनेक ठिकाणी फिरलो. निरनिराळ्या ठिकाणची निर्वासितांची शिबिरे पाहिली. काही विद्यार्थी-

नेत्यांना आणि कामगार चळवळीतील व्यक्तींना भेटलो. तेव्हाचे तिथले हिंसेचे राजकारण मला जवळून दिसले. निर्वासितांसाठी काम करणारी भारतातील आणि पूर्व पाकिस्तानातीलही काही उल्लेखनीय माणसे मला भेटली. त्या तीन आठवड्यांत मी जे काही पाहिले-अनुभवले, मला जे जाणवले, त्या सर्वांवर मी साधना साप्ताहिकात २६ जून १९७१ पासून 'शोनार बांगला बिप्लवी बांगला' ही दहा लेखांची मालिका लिहिली. पुढे भारताने बांगलादेशच्या मुक्तिवाहिनीला मदत करण्यासाठी पूर्व पाकिस्तानात सैन्य पाठविले. पाकिस्तानचा पराभव होऊन बांगलादेश स्वतंत्र झाला.

पुढच्याच वर्षी मी वकील झालो. कालांतराने न्यायाधीश झालो. सुप्रीम कोर्टातून २०१४ मध्ये निवृत्तही झालो. मधल्या काळात कलकत्त्याला अनेक वेळा गेलो. बदलत गेलेले कलकत्ता शहर पाहिले. कलकत्त्यातील 'जोराशंको' येथील रवींद्रनाथ टागोरांचे घर पाहिले; परंतु जिथे रवींद्रनाथांनी आपले बालपणीचे आणि तारुण्याचे दिवस व्यतीत केले होते, त्या बांगलादेशला जाण्याचा योग आला नव्हता.

निवृत्तीनंतर माझ्याकडे Arbitration ची काही कामे आहेत. त्यातल्या एका कामातले एक सहकारी श्रीराम बापट नुकतेच बांगलादेशला तेथील Atomic Power Station च्या कामासाठी जाऊन आले होते. त्यातच माझे मित्र नागपूरचे प्रा. सुब्रो सरकार यांच्या सूचनेवरून ढाक्याचे प्रा.असाधुझमान यांनी मला तेथील Spring Law School मध्ये व्याख्यानासाठी बोलावले. १० ते १४ मार्च २०२० या दिवसांत म्हणजे नुकत्याच पसरत असलेल्या कोरोनाच्या तोंडावर ते शिबिर होते. शेवटच्या दिवशी Public Access to Information या विषयावर माझे व्याख्यान ठेवणार होते. मी आमंत्रण स्वीकारायचे ठरवले. माझ्याबरोबर माझे पुण्याचे मित्र अन्वर राजन हेही बांगलादेशला यायला तयार झाले. मी निर्वासितांसाठी १९७१ मध्ये काम केले आहे, हे ऐकून बांगलादेशचे मुंबईतील उपायुक्त लुत्फुर रेहमान यांना आनंद झाला. आम्हाला लगेचच व्हिसा मिळाला. मुंबई ते ढाक्का अशी थेट विमानसेवा असल्याने प्रवासाचीही अडचण नव्हती.

मला व्याख्यानासाठी बोलावले होते खरे; पण आमचे स्वागत कसे होईल, अशी मनात शंका होती. एक तर आम्हाला ओळखणारे असे ढाक्क्याला कोणीच नव्हते. दोन वर्षांपूर्वी पुण्यात Symbiosis Law College मधील सेमिनारला भेटलेल्या प्रा.तस्लिमा मन्सूर यांच्याशी सिंबायोसिसच्या प्राचार्या शशिकला गुरपूर यांनी आमच्यासाठी संपर्क साधला. परंतु, प्रकृतिअस्वास्थ्यामुळे त्या भेटण्याची शक्यता कमी होती. अनेक वर्षांपूर्वी भेटलेल्या बॅ.सारा हुसेन इंग्लंडला गेलेल्या होत्या. आम्हाला बोलविणारे प्रा.असाधुझमान यांनी मात्र सांगितले होते- काळजी करू नका, तुमचे स्वागतच होईल.

शिवाय, गेल्या काही वर्षांत भारत आणि बांगलादेश ह्या दोन देशांमध्ये काही बाबतींत तणावही निर्माण झाला आहे. गेल्या दोन वर्षांत जवळजवळ १० लाख रोहिंग्या मुसलमानांना म्यानमारमधून हुसकावल्याने बांगलादेशात ते निर्वासित म्हणून आले होते. त्यांच्यासंबंधी भारताची भूमिका बांगलादेशला योग्य वाटत नव्हती. दुसऱ्या बाजूला भारतामध्येही बांगलादेशीयांविरुद्ध काही घटना झाल्या होत्या. बंगलोरमध्ये सफाई आणि इतर कामे करणारे काही हजार बांगलादेशी हाकलण्यात आले होते आणि ते पश्चिम बंगालात बांगलादेशच्या सीमेवर जाऊन बसले होते. मुंबईतही अशा काही घटना घडल्या होत्या. भारतात मंजूर झालेल्या 'नव्या नागरिकता कायद्या'बद्दल बांगलादेशमध्ये रोष होता, कारण त्यामुळे बांगलादेशातून आलेल्या मुस्लिम धर्मीयांना भारताचे नागरिकत्व मिळणार नव्हते. परंतु आश्चर्य म्हणजे, या पार्श्वभूमीवर आमचे मात्र स्वागत सर्वत्र प्रेमाने आणि जिव्हाळ्याने झाले.

ढाक्क्याला गेल्यावर १२ ते २० मार्च असे नऊ दिवस आम्ही बांगलादेशात ठिकठिकाणी जाऊन आलो. या नऊ दिवसांच्या झरोक्यातून झालेले बांगलादेशचे निकट दर्शन कसे होते? ढाक्क्याचा विमानतळ आपल्या बऱ्याच विमानतळांप्रमाणे थोडाफार अनागोंदी वाटला. त्याला हजरत शहा जलाल या सूफी संताचे नाव दिले आहे. विमानतळावर कोविड टेस्ट आणि इमिग्रेशन झाल्यावर पुढे गेलो तर भारतीय उच्चायुक्तालयातील एका कर्मचाऱ्याने आमचे स्वागत केले. तिथल्या 'टाइम्स युनिव्हर्सिटी'तले प्रा.महम्मद नानूमियाँ आम्हाला शिबिराच्या ठिकाणी नेण्यासाठी आले होते. नानूमियाँनी आमचा ताबा घेतला तो आम्ही ढाक्का सोडेपर्यंत. त्यांच्याबद्दल जितकी कृतज्ञता व्यक्त करावी, तितकी कमीच आहे! विमानतळाबाहेर पडल्यावर लक्षात आले, इथल्याही रस्त्यांमध्ये आपल्यासारखीच खोदकामे आणि मेट्रोचीही कामे चालू

आहेत, वाहतूककोंडीही आहे. महत्त्वाचे वेगळेपण लक्षात आले ते हे की, सर्व वाहनांवरच्या नंबर प्लेट्स फक्त बंगाली भाषेतच होत्या! दुकानांवरचे बोर्डही बंगालीमध्ये आणि क्वचितच कुठे इंग्लिशमध्ये.

विमानतळावरून आम्ही सावरभागातील BRAC University Campus मध्ये गेलो, जिथे Spring Law School योजलेली होती आणि तिथल्या वसतिगृहांमध्ये आमच्या राहण्याची सोय केलेली होती. तिथे जाताना वाटेत ढाक्क्याचा नकाशा आणि बांगलादेशची राज्यघटना विकत घेण्यासाठी एका मॉलमध्ये गेलो. आपल्या मॉल्ससारखाच पॉश. मॉलचे नाव 'वसुंधरा मॉल'. त्यात सर्व काही उपलब्ध. आश्चर्य म्हणजे, अगदी केरळच्या पद्धतीचे 'अभ्यंगम्' हे आयुर्वेदिक उपचार केंद्रदेखील तिथे होते. पण कर्मचाऱ्यांची भाषा मात्र सर्वत्र फक्त बंगाली! कलकत्त्यामध्येही हिंदी भाषा चालते, पण इथे नाही. हे सर्व करून कॅम्पसमध्ये पोचायला आम्हाला उशीर झाला. त्या दिवशीची म्हणजे १२ मार्चची सकाळची व्याख्याने आम्ही पोहोचण्याच्या आधीच झाली होती. आम्हाला प्रथम तिथल्या कॅन्टीनमध्ये जेवायला नेण्यात आले. जेवणात अर्थातच भात आणि प्रामुख्याने फिश करी. (तिथे आणि नंतरही सर्वत्र बांगलादेशामध्ये.) आम्ही आल्याचे कळल्याने आमच्या पाठोपाठ शिबिराला आलेली मुले तिथे कॅन्टीनमध्ये आली. त्यांनी आम्हाला गराडाच घातला. भारताविषयी त्यांना प्रचंड कुतूहल होते आणि अनेक प्रश्न विचारायचे होते. बऱ्याच जणांचे इंग्रजीचे उच्चार अर्थातच बंगाली ढंगाचे आणि कानाला गोड लागणारे. बहुतेकांचे शालेय शिक्षण बंगाली माध्यमाच्या शाळेतच झालेले, कारण बांगलादेशात शालेय शिक्षण सर्वत्र पूर्णपणे बंगालीतूनच आहे. पूर्व बंगालमधील तरुणांनी उर्दूच्या सक्तीविरुद्ध फेब्रुवारी १९५२ मध्ये आंदोलन केले होते. २१ फेब्रुवारी रोजी त्या आंदोलनात काही तरुण मारले गेले होते. ढाक्क्यामध्ये या तरुणांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'शहीद मिनार' हे स्मारक उभारले आहे. आता २१ फेब्रुवारी या दिवसाला 'संयुक्त राष्ट्र महासंघाने' आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिवस म्हणून मान्यता दिली आहे.

बांगलादेशच्या निरनिराळ्या भागांतून आलेली,

डावीकडून डॉ.जामिलूर रझा चौधरी, डॉ.कमाल हुसेन आणि न्या. हेमंत गोखले



ठिकठिकाणच्या कायद्याच्या महाविद्यालयांत आणि विद्यापीठांत शिकणारी तरुण मुले-मुली शिबिराला आली होती. ५५-६० जणांनी नोंदणी केली होती आणि त्यात अर्धी संख्या मुलींची होती. सगळी मुले आपल्या मुंबई-पुण्याच्या मुलांसारखीच रंगीबेरंगी कपडे घातलेली आणि मुली जीन्स व टॉप्स किंवा ड्रेस घातलेल्या. बुरखा वगैरे तर जाऊ दे, पण डोक्यावरून ओढणीसुद्धा न घेतलेल्या. त्यांच्यामध्ये काही हिंदू मुली-मुलेही होती. म्हणजे, केवळ त्यांच्या नावावरूनच ते लक्षात आले, पण इतरांमध्ये मिळून-मिसळून गेलेली.

कायद्याचे विद्यार्थी असल्याने भारताचे सुप्रीम कोर्ट, अलीकडे भारतात झालेले कायदे, विशेषतः नागरिकत्व कायद्यात झालेले बदल याबद्दल त्यांचे प्रश्न होतेच; पण मी मुंबईहून आलेला असल्याने बॉलीवुडबद्दलचेही प्रश्न होते. अमिताभ बच्चन आणि सचिन तेंडुलकर यांच्याबद्दल खास आकर्षण. क्रिकेटचे प्रचंड वेड. रात्री टेलिव्हिजनवर कोरोनापासून काळजी कशी घ्यायची, हे सांगायला सचिन तेंडुलकर होताच- अर्थात बंगालीत बोलणारा! बांगलादेशी टेलिव्हिजनवर आपल्यासारख्याच मालिका होत्या, म्हणजे रिक्षाने वडिलांबरोबर जाणाऱ्या नायिकेला खलनायक त्रास द्यायला लागतो, नायक तिथे उडी मारून नायिकेला वाचवतो आणि ते दोघे एकमेकांच्या प्रेमात पडतात इत्यादी. मी म्हटले, दोन्हीकडे मालिका निर्माण करणाऱ्यांच्या कल्पना सारख्याच आहेत तर!

दुसऱ्या दिवशी सकाळी कॅम्पसमधून मी फेरफटका मारला. खूप झाडे, सुंदर हिरवळ, भरपूर मोकळी जागा आणि सर्वत्र स्वच्छता! तिथे एका ठिकाणी शिबिराला आलेली मुले क्रिकेट खेळणारी. होस्टेल्सना फुलांची नावे दिलेली- रजनीगंधा, कृष्णचुरा आणि मालनचुरा. लायब्ररीच्या इमारतीचे नाव होते 'अनिषा'- म्हणजे मोठी इच्छा किंवा आकांक्षा! सर्वत्र योग्य त्या संस्कृतप्रचुर बंगाली शब्दांचा वापर.

दि.१३ मार्चला सकाळी दोन आणि दुपारी एक व्याख्यान झाले. व्याख्यानांवेळी मुले नोट्स काढत होती आणि प्रश्नही विचारत होती. काहींनी ipad आणि छोटे laptop आणलेले होते. पहिले व्याख्यान बांगलादेशच्या सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती महम्मद इमान अली यांचे Violence and Torcher against Children या विषयावर झाले. अतिशय अभ्यासपूर्ण. भारतीय राज्यघटनेच्या कलम १५(३) प्रमाणेच बांगलादेशच्या संविधानातील कलम २८(४) अन्वये इथल्या सरकारला स्त्रिया व मुले यांच्या हितासाठी खास कायदे करण्याचा अधिकार आहे. International Convention on Rights of Children यामधील बऱ्याचशा नियमांचा स्वीकार करण्यासाठी बांगलादेशने २०१३ मध्ये Children Act मंजूर केला आहे, परंतु त्याची अंमलबजावणी महत्त्वाची आहे. लहान मुले आणि विशेषतः मुली यांच्याबाबत हिंसेच्या असंख्य घटना होत असतात- अगदी इमाम आणि मुल्ला-मौलवींकडूनही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. अशा घटनांचे परिणाम काय होतात, त्या कशा थांबवल्या पाहिजेत, यावर त्यांनी सविस्तर ऊहापोह केला.

तरुण वकील इम्रान सिद्दिकी यांचे, धर्मस्वातंत्र्य आणि कायदा या विषयावर दुसरे व्याख्यान झाले. त्या वेळेला मलाही भारतीय सुप्रीम कोर्टाच्या 'शबरीमला निकाला'वर प्रश्न विचारले गेले. दुपारच्या जेवणानंतर ज्येष्ठ वकील शहादीन मलिक यांचे Access to Justice ह्यावर अप्रतिम व्याख्यान झाले. त्यांचा एकूण अनुभव आणि अभ्यास त्यातून दिसून येत होता.

तिसऱ्या दिवशी म्हणजे १४ मार्चला सकाळी माझे Public Access to Information या विषयावर व्याख्यान झाले. त्यात मी भारताच्या आणि बांगलादेशाच्याही माहितीच्या अधिकाराच्या कायद्याबद्दल बोललो. माहितीचा अधिकार हा माहिती मिळविण्यासाठी आणि सरकारी यंत्रणांवर अंकुश ठेवण्यासाठी, सत्तेचा दुरुपयोग रोखण्यासाठी उपयुक्त आहे. माहिती नसेल तर कसे नुकसान होते आणि माहिती मिळाली तर कशी प्रगती करता येते, याची मी काही उदाहरणे दिली. अरुणा रॉय यांच्या कामाची माहिती दिली, त्यावर सर्वांनी प्रश्न विचारले.

त्यानंतर Valedictory Function साठी Spring Law School योजणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष आणि बंगबंधू यांचे सहकारी डॉ.कमाल हुसेन हे तिथे आले. University of Asia Pacific चे कुलगुरू डॉ.जमिलूर रझा चौधरी आले. डॉ.जमिलूर हे शिक्षणाने व व्यवसायाने इंजिनिअर आणि बांगलादेशच्या पुनर्बांधणीमध्ये त्यांनी मोठे योगदान दिलेले. (दुर्दैवाने शिबिरानंतर काही दिवसांतच त्यांचे निधन झाले.) त्यांच्या विद्यापीठाचे ट्रेझरर, निवृत्त 'एअर कमोडर' इशफाकइलाही चौधरी हेही आले. त्या सर्वांचे आणि माझेही भाषण झाले. शिबिरात भाग घेतल्याबद्दलची

सर्टिफिकेट्स मुलांना देण्यात आली.

Valedictory Function नंतर Spring Law School संपले. पण तिथे आलेले विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्या आठवणी मात्र राहिल्या. त्यातल्या काहींना शासनामध्ये, काहींना राजकारणात आणि काहींना न्यायक्षेत्रात जायचे होते. अनेक मुलांना भारतात आणि परदेशात उच्च शिक्षणासाठी जायचे होते. मुंबई, दिल्ली बघायची होती. पुढे आपल्या कुटुंबासाठी आणि देशासाठी काही तरी चांगले करायचे होते. मुला-मुलींनी आमच्याबरोबर फोटो काढले, पत्ते व फोन नंबर घेतले, त्यांच्या गावी येण्याचे आमंत्रणही दिले. त्यांची आपुलकी मनाला स्पर्शून गेली. ढाक्क्याच्या या शिबिरामुळे मला इथल्या तरुण पिढीच्या क्षमतेची आणि आशा-आकांक्षांची थोडी कल्पना आली.

तीन दिवसांनी १७ मार्चला आम्ही शिलाईडाहा येथील रवींद्रनाथांचे घर बघण्यासाठी कुश्तिया येथे गेलो. तो दिवस बंगबंधूंच्या जन्मशताब्दीचा होता. पार्लमेंट आणि इतर महत्त्वाच्या इमारतींवर ढाक्क्यामध्ये रोषणाई करण्यात आली होती, जी आम्ही कुश्तियाला जाताना पाहिली. कोरोनाला रोखण्यासाठी सार्वजनिक समारंभ मात्र मर्यादित ठेवले होते. कुश्तियाच्या इस्लामिक युनिव्हर्सिटीमध्ये आमची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराशीच शेख मुजिब यांचे भव्य चित्र लावलेले होते. त्यांच्यासमोर पुष्पचक्रे अर्पण केलेली होती. शेख मुजिब यांची भाषणे ध्वनिक्षेपकावरून प्रसारित केली जात होती. विद्यापीठाबाहेरच्या चहाच्या टपरीवर आम्ही चहा प्यायला गेलो. आम्ही बंगालीत बोलू शकत नव्हतो पण आम्ही भारतातून आलो आहोत, असे सांगितल्यावर चहावाल्याने चहा देण्याआधी 'श्रीमती इंदिरा गांधी' असे मोठ्याने म्हणून चक्क सॅल्यूटच ठोकला! रात्री टेलिव्हिजनवर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण प्रक्षेपित केले गेले, ज्यामध्ये त्यांनी शेख मुजिब यांच्या कार्याचा गौरव केला. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना आणि इतरही महत्त्वाच्या व्यक्तींची श्रद्धांजलीची भाषणे झाली.

कुश्तिया विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये निरनिराळ्या विषयांच्या/विभागांच्या इमारती आणि होस्टेल्स असा

न्यामूर्ती हेमंत गोखले, बांगलादेशी विद्यार्थिनींसोबत



मोठा पसारा होता. कोरोनाच्या धास्तीमुळे लेक्चर्स आणि होस्टेल्स बंद करण्यात आली होती. विद्यापीठाच्या बाहेरच्या पारावर अनेक तरुणी आणि तरुण दिसले– आपापल्या बॅगा, हॅवरसॅक्स वगैरे सामान घेऊन, बसेस पकडून गावी जाणारे. ढाक्क्याला भेटली होती तशीच ही मुले–मुली रंगीबेरंगी कपड्यांतली, मोकळी–ढाकळी आणि एकमेकांत मिसळणारी. त्यातल्या दोन तरुण–तरुणींशी बोललो. ते संख्याशास्त्र आणि पदार्थविज्ञानाचे विद्यार्थी होते. या विद्यापीठाचे शिक्षण झाल्यावर त्यांनाही उच्च शिक्षणासाठी भारतात किंवा बाहेरच्या देशांत जायचे होते. एकंदरीत आकांक्षा त्याच– अधिक शिकायचे, पुढे जायचे.

दुसऱ्या दिवशी सकाळी आम्हाला तिथल्या कुलगुरूंनी चहासाठी बोलावले. त्याआधी तिथल्या ज्येष्ठ रजिस्ट्रार रेवा मंडल या भेटल्या. प्रशासनामध्ये येण्याआधी त्या विधी विभागामध्ये डीन होत्या. आम्हाला विधी विभागात घेऊन गेल्या. पुढच्या वेळेला याल तेव्हा आमच्याकडे व्याख्यानासाठी जरूर या, म्हणाल्या.

भारत आणि बांगलादेश या दोन देशांमधील शिक्षणाच्या देवाण–घेवाणीसंबंधीची दोन उदाहरणे इथे नमूद केली पाहिजेत. पहिले उदाहरण कुश्तियाचेच. कुलगुरू हरून अल् रशीद यांच्या दालनात गेलो, तर तिथे मॅनेजमेंटचे प्रा.झकेरिया रेहमान हे भेटले. आम्ही मुंबई–पुण्याहून आलो हे ऐकल्यावर त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनी पुणे विद्यापीठातून Ph.d. केल्याचे आम्हाला सांगितले. ते म्हणाले, ‘‘मी प्रा.एस. डब्ल्यू. भावे यांचा विद्यार्थी होतो.’’ ते ऐकून आम्हाला आश्चर्य तर वाटलेच आणि आनंदही झाला. नंतर कुलगुरू हरून अल् रशीद यांच्या दालनात गेलो. तोच अनुभव त्यांच्याबाबतही आला. ते इंग्रजीचे प्राध्यापक आणि त्यांनीही पुणे विद्यापीठातून Ph.d. केलेली! मी म्हटले, ‘‘हा विशेष योगायोग आहे!’’ त्यांनी सांगितले की, ते पुण्यात तीन वर्षे राहिले होते आणि त्यांना पुण्याच्या चांगल्या आठवणी होत्या. प्रा.शिरीष चिंधडे हे त्यांचे गाईड होते. भारतात परतल्यावर माझा पुण्याचा मित्र विवेक पुरंदरे याच्यामार्फत मी प्रा.चिंधडे यांच्याशी संपर्क साधला, कारण विवेक आणि ते शाळेत बरोबर असल्याचे विवेककडून ऐकले होते. प्रा. हरून अल् रशीद हे कुलगुरू झाल्याचे ऐकून प्रा. चिंधडे यांना अतिशय आनंद झाला. ते म्हणाले की, प्रा. रशीद हे वीसेक वर्षांपूर्वी त्यांचे विद्यार्थी होते आणि अतिशय अभ्यासू व नम्र विद्यार्थी म्हणून त्यांच्या लक्षात होते. प्रा. रशीद यांनी प्रसिद्ध भारतीय इंग्रजी लेखक निराद सी.चौधरी यांच्या साहित्यावर Ph.d. केल्याचेही त्यांनी सांगितले. निराद चौधरी हे मूळचे पूर्व बंगालमधले होते.

शिक्षणाच्या देवाण–घेवाणीचा दुसरा प्रसंग मात्र अगदी वेगळा. कोविडच्या निर्बंधांमुळे आम्हाला आमची बांगलादेश भेट एक दिवस लवकर संपवावी लागली. आम्ही २० तारखेला ढाक्क्याच्या विमातळावर पोचलो. तिथे विमान पकडणाऱ्या तरुणमंडळींची मोठीच गर्दी होती. त्यातले आठ–दहा तरुण–तरुणी तमिळमध्ये बोलत असावेत, असे मला वाटले. सुप्रीम कोर्टात जाण्याआधी मी एक वर्ष मद्रासला मुख्य न्यायाधीश होतो, त्यामुळे तमिळशी थोडा परिचय होता. मी त्यांना म्हटले, ‘‘तुम्ही तमिळ भाषिक का? आणि आत्ता इथे कसे?’’ त्यावर ती मुले म्हणाली, ‘‘आम्ही इथल्या मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी आहोत आणि कोविडमुळे कॉलेज बंद झाले म्हणून परत चाललो आहोत.’’ मला आश्चर्यच वाटले. तमिळ भाषिक मुले आणि शिक्षणासाठी इथे? रशियन भाषा येत नसतानाही भारतीय मुले वैद्यकीय शिक्षणासाठी रशियाला गेल्याचे ऐकले होते, पण बांगलादेशला? मी म्हटले, ‘‘तुम्हाला बहुतेक तमिळ आणि इंग्रजीशिवाय दुसरी भाषा येत नसणार.’’ त्यावर ते म्हणाले हे खरे आहे, पण जुळवून घेत आहोत, कारण तमिळनाडूत सरकारी कॉलेजमध्ये आमचा नंबर लागला नाही. तिथल्या कॉलेजपेक्षा इथली फी कमी आहे, कॉलेजचे शिक्षण इंग्रजीतून आहे आणि शिक्षणाचा दर्जाही तेवढाच चांगला आहे.’’ मी म्हटले, वीस वर्षांपूर्वी बांगलादेशचे विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी भारतात येत होते. आता भारतातील विद्यार्थीही उच्च शिक्षणासाठी बांगलादेशमध्ये जात आहेत. आपण उगाचच बांगला देशला मागासलेला समजत होतो. तिथले शिक्षण, प्राध्यापक आणि विद्यार्थी आपल्या तोडीसतोड आहेत तर!

**न्या. हेमंत गोखले**
मुंबई
gokhalehemantlaxman@gmail.com
Mob. 9769305849

(लेखक, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती या पदावरून २०१४ मध्ये निवृत्त झाले आहेत.)

बराक ओबामा

# ‘अ प्रॉमिस्ड लॅन्ड’ या पुस्तकाच्या निमित्ताने संवाद

(भाग २)

**प्रश्न** – मला तुमच्या लेखनप्रक्रियेविषयी म्हणजे तुम्ही हे पुस्तक कसे लिहिले, याबद्दल विचारायचे आहे. त्याबद्दलचा माझा एक प्रश्न असा आहे की, तुम्ही मोठ्या प्रमाणात सर्व गोष्टींना एका संदर्भचौकट देता– म्हणजे या गोष्टींची चर्चा त्यांच्या-त्यांच्या संदर्भचौकटीत करता– आणि नेमकेपणाने बोलायचे झाले, तर तुम्ही तुमच्या विरोधकांबद्दल चर्चा करताना एक संदर्भचौकट किंवा काहीएक पार्श्वभूमी देऊनच ती करता, याबद्दल आहे. हे पुस्तक म्हणजे सध्याची राजकीय परिस्थिती किंवा वर्तमान आणि खूप मागच्या काळातील राजकीय भूतकाळ यांना जोडणारा एक सांधा वाटतो. तुम्ही तुमच्या राजकीय भूमिका संयमी पद्धतीने मांडता. खरे पाहिले तर ट्रंप त्यांच्या मित्रांबाबत जितका चांगूलपणा दाखवितात, त्यापेक्षा अधिक तुम्ही तुमच्या शत्रूंबद्दल दाखविता. ही शैली तुमच्या स्वभावामुळे इथे येते का? तसेच, आपण राष्ट्राध्यक्ष होतो आणि त्यामुळे आपल्या लिखाणाला एक पोक्तपणा पाहिजे, या धारणेमुळे येते का? मी तुम्ही तुमच्या शपथग्रहण सोहळ्याच्या दिवशीचे जे वर्णन केले आहे, त्याबद्दल विचारत आहे. मावळते राष्ट्राध्यक्ष बुश यांच्यासोबत गाडीत होतात, लोक त्यांच्याविरोधात खिल्ली उडवून घोषणा देत होते आणि तुम्हाला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटत होती.

– राजकारणाच्या सर्वोच्च स्थानी असतानादेखील मी माझे स्वत्व जपून ठेवण्यासाठी– माझा आत्मा, काय चूक काय बरोबर याबद्दलचे माझे ठोकताळे, धारणा, माझे चारित्र्य, माझ्या लेखी मी जो कोण आहे तो– हे सगळे आपल्या हातून निसटून जाऊ नये यासाठी माझे चाललेले प्रयत्न या पुस्तकातील एकूण कथनाचा एक प्रमुख पैलू आहे.

**प्रश्न** – या पदाचे हास्यास्पद (absurd) स्वरूप पाहता, कोणताही राष्ट्राध्यक्ष आपल्यातील माणूस कसा काय जिवंत ठेवू शकतो, हादेखील प्रश्न पडतो.

माझ्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कार्यकाळात सत्ता कशी राबवावी, याबद्दल अनेकांच्या मनात गैरसमज होते. आक्रसताळेपणा केल्यामुळे आणि खत्रूडपणे वागल्यामुळे अधिकाधिक कामे मार्गी लावता येतात, असा त्यांचा समज होता. माझ्या कारकिर्दीतील काही प्रसंग मला आठवतात– जेव्हा माझ्या पाठीराख्या वर्गामध्ये, किमानपक्षी बुद्धिवंतांमध्ये नैराश्याची व हताशपणाची भावना निर्माण झाली होती. ही मंडळी लिंडन जॉन्सन [२३] आणि माझ्यामध्ये तुलना करून दोघांमधला फरक दाखवायची. ते म्हणायचे, जॉन्सन हा अतिशय घाणेरडा माणूस असला, तरी त्याने व्होटिंग राईट्स् ॲक्ट [२४] संसदेकडून मान्य करून घेतला की नाही? आणि असेच बरेच काही. ओबामा, तुम्ही तशा पद्धतीने वागले पाहिजे, तुम्ही नको इतके चांगले आहात...

– (राष्ट्राध्यक्ष असला तरी) तो पिता असतो, मित्र असतो, पती असतो. पुस्तकातील पहिल्या विभागाचे नाव ‘द बेट’ म्हणजेच पैज असे आहे. पहिली पैज जी मी लावत आहे ती अमेरिकेच्या स्वरूपात अनुस्यूत असलेल्या तिच्यातील आणि लोकशाहीच्या अंगभूत ताकदी संदर्भातील. एक मोठा, विविधता असलेला, आपापसात मतभेद असल्यामुळे वाद घालण्याची हौस असलेला, बहुवांशिक असा देश तेथील समाजाला अधिक परिपूर्ण करू शकतो आणि जगाला एक उदाहरण घालून देऊ शकतो, यावर माझा विश्वास आहे. असे होईल, यावरच मी एका अर्थाने पैज लावली. ज्या दुसऱ्या मुद्याबाबत मी स्वतःशी पैज लावली ती म्हणजे, न सुधारण्याइतपत नीतिभ्रष्ट न होता मी या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकेन. म्हणून जटिल पर्यायांमधून अटळपणे करावी लागणारी निवड आणि अपरिहार्यपणे केल्या जाणाऱ्या तडजोडी, यांच्याशी झुंज देणारा असा मी तुम्हाला या पुस्तकात दिसेन.

**प्रश्न –** या सगळ्याला सुरुवात तुमच्या पहिल्या निवडणुकीच्या प्रचारापासून झाली?

– माझ्या पहिल्या निवडणुकीवेळी एका व्यक्तीने ती निवडणूक– म्हणजे मी ज्या निवडणुकीची तयारी करत होतो ती– लढविणार नाही, असा मला शब्द दिलो होता आणि तिने तो शब्द फिरविला. आता उमेदवारीअर्ज स्वीकारला जाण्यासाठी जितक्या नागरिकांचा लेखी पाठिंबा लागतो, तितके संख्याबळ काही त्या व्यक्तीकडे नव्हते. तेव्हा माझ्यापुढे प्रश्न होता की– या मुद्याच्या आधारे अशा व्यक्तीविरोधात तक्रार करून तिची उमेदवारीच बाद करावी का? हवे त्याला किंवा तिला निवडणुकीला उभे राहता येणार का, हा या सगळ्यातला गाभ्याचा प्रश्न आहे. आता सह्या करून लेखी पाठिंबा व्यक्त करण्याची ही जी तरतूद आहे, तिचा हेतू प्रस्थापितांना आपल्या जागांवर कायम राहता यावे हा आहे. मुद्दा असा आहे– माझी याबद्दलची भूमिका काय आहे? मला याबद्दल नेमके काय वाटते? आणि याबाबतचा विचार पुस्तकामध्ये शेवटापर्यंत केलेला दिसेल. राष्ट्राध्यक्षपदाच्या माझ्या संपूर्ण कार्यकाळातही अगदी हाच विचार केलेला दिसेल.

तुम्हाला जे काही या सगळ्याबद्दल वाटत आहे, त्याचा पैलू हा पुढीलप्रमाणे आहे– जेव्हा मी विनयशील व सभ्यपणे वागले पाहिजे असा निर्णय घेतो आणि जेव्हा मी लोकांमध्ये चांगुलपणा आणि इतर तत्सम सद्गुण आहेत असे गृहीत धरतो, ते काही मी भोळा–भाबडा आहे म्हणून असे करीत नाही; तर असे वागले पाहिजे, असा निर्णय मी समजून–उमजून आणि जाणूनबुजून घेतलेला असतो. कारण, अधिकाधिक लोक या पद्धतीने वागले, तर हे जग अधिक सुंदर होईल. कधी कधी असे वागण्यात मी कमी पडतो आणि मग स्वतःबद्दलच माझा अपेक्षाभंग होतो. आपली वागणूक ही नीतिमत्ता, नैतिकता आणि मूलभूत स्वरूपाचा मानवी सभ्यपणा– अशा मुद्यांवर आधारलेली असणे महत्त्वाचे आहे, असे निदान मला तरी वाटते.

माझ्या राष्ट्राध्यक्षपदाच्या कार्यकाळात सत्ता कशी राबवावी, याबद्दल अनेकांच्या मनात गैरसमज होते. आक्रसताळेपणा केल्यामुळे आणि खत्रूडपणे वागल्यामुळे अधिकाधिक कामे मार्गी लावता येतात, असा त्यांचा समज होता. माझ्या कारकिर्दीतील काही प्रसंग मला आठवतात– जेव्हा माझ्या पाठीराख्या वर्गामध्ये, किमानपक्षी बुद्धिवंतांमध्ये नैराश्याची व हताशपणाची भावना निर्माण झाली होती. ही मंडळी लिंडन जॉन्सन [२३] आणि माझ्यामध्ये तुलना करून दोघांमधला फरक दाखवायची. ते म्हणायचे, जॉन्सन हा अतिशय घाणेरडा माणूस असला, तरी त्याने व्होटिंग राईट्स् ॲक्ट [२४] संसदेकडून मान्य करून घेतला की नाही? आणि असेच बरेच काही. ओबामा, तुम्ही तशा पद्धतीने वागले पाहिजे, तुम्ही नको इतके चांगले आहात...

**प्रश्न –** शिकागोच्या हाईड पार्क भागात राहणारे व कायद्याचे अध्यापन करणारे एक सभ्य प्राध्यापक....

– हो, हे आणि इतर बरेच काही. पण सार्वजनिक रीत्या नाही तर खासगीत मी लोकांना सागायचो की– लिंडन जॉन्सन हे बऱ्याच गोष्टी करून घेऊ शकले, कारण सरतेशेवटी संसदेत त्यांच्याकडे प्रचंड संख्याबळ होते. बस्स, हेच. एफ.डी.आर. [२५] यांच्या पाठीशी असाच पाठिंबा होता, तेव्हाच त्यांना हव्या त्या गोष्टी करून घेता आल्या. आणि बहुतेक वेळा खरा मुद्दा हाच असतो– तुम्हाला हवे असलेले कायदे मान्य करून घेण्यासाठी तुमच्या पाठीशी संसदेत आवश्यक ते संख्याबळ आहे का? आता अफोर्डेबल केअर ॲक्ट [२६] मान्य करून घेण्याच्या प्रक्रियेकडे पाहू. हा कायदा फक्त सिनेटमध्ये मान्य करून घेणे पुरेसे नव्हते, तर सिनेटने मान्य केलेले हे विधेयक संसदेच्या कनिष्ठ सभागृहातील– प्रतिनिधीगृहातील – माझ्या पक्षाच्या सदस्यांकडून मान्य करून घ्यायचे होते. तेसुद्धा जेव्हा सिनेटने मान्य केलेले विधेयकाचे प्रारूप

अधिक सोई-सुविधा देत नाही म्हणून त्यांना फारसे पसंत नसताना! यात नॅन्सी पेलोसी [२७] यांच्यासोबत काम करत मी माझ्याच पक्षातील सदस्यांशी अत्यंत प्रभावीपणे संवाद साधला आणि त्यांना विधेयक आहे त्या स्वरूपात मान्य करण्याबाबत पटवून देऊ शकलो. या सर्व प्रक्रियेमध्ये माझ्या मनासारखे व्हावे, म्हणून मी कोणाचीही गचांडी धरली नाही किंवा काही गुप्त कारस्थानेही केली नाहीत.

आता ज्या गोष्टी करून घेण्यात मी कमी पडलो त्याचा विचार केला तर 'असे का झाले?' हा प्रश्न उपस्थित होतो. आपण ज्या घटकांचा-शक्तींचा उल्लेख आणि विचार यापूर्वीच केला आहे, त्या याच्या मुळाशी होत्या- सिनेटमधील फिलिबस्टर ओलांडून पुढे जाण्यासाठी तुम्हाला ६० सिनेटर्सचा पाठिंबा हवा. माझ्या कारकिर्दीच्या पहिल्या महिन्याबाबत बोलायचे झाले तर, त्या वेळी या सर्व शक्ती माझ्या विरोधात काम करत होत्या. आमच्यासमोर एक प्रचंड मोठे आर्थिक संकट उभे राहिल्याचे आम्हाला स्पष्टपणे दिसत होते. त्यावरील उपाययोजना सिनेटमध्ये मान्य करून घेण्यासाठी आम्हाला रिपब्लिकन पक्षाच्या काही सदस्यांचा पाठिंबा आवश्यक होता आणि तो आम्ही कसाबसा महत्प्रयासाने मिळवला. म्हणूनच आम्ही 'अमेरिकन रिकव्हरी अँड रिइनव्हेस्टमेंट ॲक्ट' [२८] मान्य करून घेऊ शकलो. अशा आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठीच्या पॅकेजच्या बाजूने मतदान केल्याबद्दल पक्षातून त्या रिपब्लिकन्सपैकी एक असलेल्या आर्लेन स्पेक्टर [२९] यांना घरचा रस्ता दाखवण्यात आला होता. या अशा पॅकेजला रिपब्लिकन पक्षाचा काही वैचारिक विरोध नव्हता, याची आता आपल्याला कल्पना आलेली आहे. कारण त्यांनीदेखील दोन लाख कोटी डॉलरचे आर्थिक मदतीचे पॅकेज नुकतेच मान्य केले आहे. का, तर राष्ट्राध्यक्ष त्यांच्या पक्षाचे आहेत.

**प्रश्न –** २०२१ चा जानेवारी उजाडताच रिपब्लिकन मंडळी अर्थसंकल्पातील तुटीमध्ये पुन्हा एकदा रस घ्यायला लागतील.

– अर्थात. पुस्तक लिहिताना प्रत्येक क्षणी मी मागे वळून पाहत होतो आणि प्रत्येक वेळी माझ्या मनात विचार यायचा की, अनेक प्रसंगांत मी नको इतक्या चांगुलपणाने वागलो.

**प्रश्न –** तुम्ही अधिक चांगुलपणाने वागायला पाहिजे होते, असे नाही का वाटत?

– म्हणजे नेमके काय?



**प्रश्न –** म्हणजे मॅककॉनेलना अधिक वेळा अनौपचारिक रीत्या भेटणे, विरोधकांशी अधिक संवाद साधत त्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करणे...

– हे पाहा, हे सगळे दुसऱ्या खंडात येईल आणि मी त्याबद्दल अधिक स्पष्टपणे लिहिणार आहे. पण आता उदाहरणार्थ– जॉन बेनर [३०] घ्या. माझे आणि त्यांचे राजकीय संबंध अतिशय उत्तम होते, पण स्वतःच्या पक्षाच्या सदस्यांचा पाठिंबा कायम ठेवण्यासाठी त्यांना एका विशिष्ट पद्धतीने वागावे लागायचे. माझ्याशी बोलताना– अर्थात खासगीत– ते प्रतिनिधीगृहातील आपल्या पक्षांच्या सदस्यांना नावे ठेवायचे. जॉन मॅकेनही हेच करायचे. विरोध कधीच वैयक्तिक नव्हता. आता मिच मॅककॉनेल यांना एकूण राजकीय व्यवस्थेत जवळचा असा कोणीच मित्र नाही. ज्यो बायडेन आणि मिच यांची दीर्घ काळापासूनच कशी मैत्री आहे, असे सध्या लिहिले जात आहे आणि ते वाचण्यात मला बरीच मौज वाटत आहे. दोघांचीही एकमेकांशी बऱ्याच वर्षांपासूनची ओळख आहे, परिचय आहे. मिच मॅककॉनेल यांच्याशी झालेल्या भेटी–गाठी, चर्चा–संवाद याबद्दल बायडेन काय म्हणाले आहेत ते माझ्यासमोर आहेच की. मी रिपब्लिकन मंडळींना आपलेसे करण्यासाठी पुरेसे प्रयत्न केले नाहीत, असे नाही. आम्ही त्यांना सर्व प्रकारच्या कार्यक्रमांना निमंत्रित करीत असू– व्हाईट हॉऊसमध्ये चित्रपट दाखविण्याच्या कार्यक्रमांना, शासकीय भोजन समारंभांना, कँप डेव्हिडला...[३१] तुम्ही ज्या कोणत्या कार्यक्रमाचे नाव घ्याल, त्या सर्वांना. त्यांना आपलेसे करण्यासाठी प्रयत्न कमी पडले, हा मुद्दा नाही. त्यांना माझे आणि डेमॉक्रॅटिक पक्षाचे राक्षसीकरण करणे हे राजकीय दृष्ट्या फायद्याचे होते. फॉक्स न्यूजसारख्या माध्यमांनी या राक्षसीकरणाचा प्रचार–प्रसार केला. त्यांच्या मतदारांचा यावर विश्वास बसायला लागला आणि कालांतराने राक्षसीकरण करण्याचे रिपब्लिकनांचे प्रयत्न इतके यशस्वी ठरले की, त्यांना आमच्याशी तडजोडी करणेच नव्हे तर मैत्रीपूर्ण पद्धतीने वागणेदेखील अवघड होऊन बसले.

**प्रश्न –** फ्लॉरिडाचे चार्ली क्रिस्ट [३२] हे उदाहरण आहे?

– या सर्व गोष्टी फार लवकर घडल्या. मी पुस्तक लिहीत असताना जेव्हा मागे वळून पाहिले, तेव्हा मला कशाकशाचे आश्चर्य वाटले असे तुम्ही विचारले होते. आपल्या व्यवस्थेत गोष्टी किती वेगाने घडतात, हे मी विसरलोच होतो. माझा शपथविधी झाला आणि आम्ही एका महिन्याच्या आतच 'अमेरिकन रिकव्हरी अँड रीइनव्हेस्टमेंट ॲक्ट' मान्य करून घेतला. दोन ते तीन महिन्यांत वाहन उद्योगाला आम्ही आर्थिक मदतीचे एक पॅकेज दिले. बँकिंगव्यवस्था पूर्णतः ढासळू नये, यासाठीही आम्ही उपाययोजना केल्या. अशा वेळी माझी चार्ली क्रिस्ट यांच्याशी भेट होते. त्या वेळी ते अतिशय लोकप्रिय असे रिपब्लिकन पक्षीय राज्यपाल होते आणि पक्षभेदापलीकडे जाऊन काम करणारे अशी त्यांची ख्याती होती. मी त्यांच्याशी हस्तांदोलन करतो आणि दोन जिवलग मित्र जशी एकमेकांची उराउरी भेट घेतील, तशा पद्धतीची मिठी मारतो. या भेटीमुळे ते स्वतःच्या पक्षातच उपरे ठरले. हे सगळे कधी झाले, तर माझा शपथविधी होऊन एक महिना पूर्ण होण्याच्या आत. त्या वेळी माझ्या कामाबद्दल ६३–६५ टक्के लोक खूश होते. एका अर्थाने मी त्या वेळी राजकीय मधुचंद्राचा आनंद लुटणारा लोकप्रिय राष्ट्राध्यक्ष होतो. आता मी इथे काय केले? तर, मी कोणाचे तरी अभिनंदन करीत आहे आणि त्यांच्याशी केवळ नम्रपणे व सौजन्याने वागत आहे. इथे क्रिस्ट यांच्यासारखा नेता काय करतो? तर, आपल्या राज्यातील आर्थिक परिस्थिती अधिकाधिक बिकट होत चालली असल्यामुळे राज्यातील लोकांच्या नोकऱ्या वाचविण्यासाठी आणि गृह कर्जाचे हप्ते भरता येत नसल्यामुळे याच लोकांच्या घरावर येणारी जप्ती टाळण्यासाठी आर्थिक मदतीच्या एका पॅकेजला पाठिंबा देतो. त्याच्या या भूमिकेसंदर्भात स्वपक्षात काय प्रतिक्रिया उमटते? तर, त्यांची तत्काळ बदनामी सुरू होते आणि त्यांना पक्षातून घालवून दिले जाते. इथून मार्को रुबियो [३३] यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात होते. त्याचा प्रारंभ कसा होतो– तर चार्ली क्रिस्ट हे खऱ्या अर्थाने रिपब्लिकन नाहीत, या टीकेचा भडिमार करून.

मग जॉन मॅकेन निवडणुकीनंतर घासून गुळगुळीत झालेले नेहमीचेच वाक्य उच्चारतात– 'मी राष्ट्राध्यक्ष ओबामा यांना यश लाभो अशी प्रार्थना करतो' आणि लगेच याचा प्रतिवाद–विरोध करणारी प्रतिक्रिया रश लिंबॉ यांच्याकडून येते. उजव्या विचारांच्या माध्यमविश्वात त्याची री ओढली जाते.

आता या सगळ्याचा आम्ही विचार केला असता किंवा याला आमच्या हिशोबात धरले असते,आणि मी मिच मॅककॉनेल किंवा पॉल रायन [३४] यांच्यासोबत आणखीन काही

अनौपचारिक बैठका किंवा भेटी-गाठी घेतल्या असत्या, तर सगळ्या गोष्टी कशा जुळून आल्या असत्या किंवा सर्व काही आलबेल झाले असते- हा जो समज आहे....

**५. आयोवा राज्यात काय चालले आहे?**

**प्रश्न –** तुम्हाला आयोवा[३५] राज्याबद्दल प्रचंड आस्था-ममत्व असल्याचे तुमच्या लिखाणावरून स्पष्ट होते. या राज्याने तुम्हाला पाठिंबा दिला म्हणून एका अर्थाने तुमच्या राजकीय प्रवासाला खऱ्या अर्थाने गती मिळाली. पण तुमची भावना केवळ एवढ्यापुरती मर्यादित नाही. आपण इतिहासाच्या एका अगदी वेगळ्या टप्प्यावर आहोत, असे वाटायला लागले होते. त्यापूर्वीचा काळ म्हणजे तुमचा आयोवातील प्रचाराचा काळ. शिवाय माझ्या आकलनानुसार हा काळ म्हणजे तुमच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या प्रचाराला गती मिळण्यापूर्वीचा आणि तुमची कारकीर्द सुरू होण्यापूर्वीचा तुम्ही अनुभवलेला निर्भेळ-निखळ आनंदाचा व मौजेचा हा शेवटचा काळ होय.

– आयोवातील काळ हे सुवर्णक्षणच होते, कारण राजकारण आणि अमेरिका अपेक्षित दिशेने पुढे जात होते. त्या वेळी मी हेलावून गेलो होतो. आजही तो काळ मला हेलावून टाकतो. समाजातील सर्व स्तरांतील, सर्व घटकांतील तरुण-तरुणी- न्यूयॉर्क शहरातील ब्रुकलीन भागातील कृष्णवर्णीय, कॅलिफोर्नियातील आशियाई वंशीय, अमेरिकेच्या मध्य भागातील शेतकरी कुटुंबं- सगळे माझ्या प्रचारात सामील झाले होते. साहित्याच्या एका बॅगेसह आम्ही त्यांना आयोवातील लहान शहरांमध्ये धाडून दिले. या शहरांमध्ये रिपब्लिकन पक्षाचा प्रभाव होता. या तरुणाईने केले काय तर- किराणा दुकानासोमोर टेबल टाकून प्रचार केला, रोटरी क्लबच्या बैठकांना हजेरी लावली, लिटल लीगच्या[३६] स्पर्धांसाठी स्थानिक संघांना प्रशिक्षण दिले. लोकांची मने जाणून, त्यांचे म्हणणे ऐकून आणि त्यांच्या आयुष्याशी समरस होऊन हे शहर आपलेसे करून त्यांना आमच्या बाजूला वळवले. सहभागात्मक लोकशाहीवर आधारित एक चळवळच आम्ही तिथे उभी केली. राष्ट्राध्यक्षपदासाठी डेमॉक्रॅटिक पक्षाची उमेदवारी मिळण्याच्या माझे प्रयत्न गांभीर्याने घेतले जाऊ लागले ते या चळवळीमुळेच.

**प्रश्न –** पण त्यानंतर राष्ट्राध्यक्षपदाच्या सलग दोन निवडणुकांमध्ये ओयोवाने ट्रंप यांच्या बाजूने कौल दिला होता.

– मी एवढ्याच आधारावर इतक्या लवकर निराश होणार नाही. बेरोजगारीचा दर२०१२ च्या निवडणुकीत ८.५ टक्के असूनही आयोवाने माझ्या बाजूने कौल दिला आणि ओयोवाच्या लोकसंख्येतील विविध वांशिक गटांचे लोकसंख्येतील प्रमाण काही बदललेले नाही. मी आयोवात बहुमताने जिंकलो. त्यामुळे या देशात काही तरी फार मोठा बदल झाला आहे, असा समज काही तितकासा खरा नाही. वस्तुस्थिती वाटते त्यापेक्षा अधिकच गुंतागुंतीची आहे.

मुळातच मला मतदान करायला अनुकूल नसलेल्या मतदारांशी थेट संवाद साधण्याचा आयोवातला प्रचाराचा काळ हा शेवटचा प्रसंग होता. असा थेट संवाद मी पहिल्यांदा कधी साधला, तर सिनेटची निवडणूक लढवताना. आता इलिनॉयचा[३७] दक्षिण भाग हा केन्टकी अथवा ओहायोचा दक्षिण भाग अथवा इंडियाना अथवा आयोवाच्या बऱ्याचशा भागांसारखा आहे. या सिनेट निवडणुकीच्या निमित्ताने माझ्या लक्षात आले की, सांस्कृतिक दृष्ट्या परंपरानिष्ठ अशा भागात, ग्रामीण किंवा लहान शहरांमध्ये- जेथील बहुसंख्य कष्टकरी वर्ग हा श्वेतवर्णीय आहे- तेथील मंडळींशी मी एक नाते प्रस्थापित करू शकतो आणि त्यांची मते मिळवू शकतो. त्याचे कारण म्हणजे विसंवाद घडवतील असे कोणतेही मध्यस्थ आम्हा दोघांमध्ये नव्हते. आणि हेच राष्ट्राध्यक्षपदाच्या दोन्ही निवडणुकींमध्येसुद्धा घडले.

माझ्यासारखी सभ्य व सौजन्यशील व्यक्ती आयोवात जाऊन आपल्या आयुष्याची कहाणी सांगते आणि त्या मंडळींच्या आयुष्यांच्या कहाण्या ऐकते- हे सगळे त्या वेळी आयोवात शक्य होते, कारण राजकारणाचे स्वरूप एका अर्थाने बऱ्यापैकी विकेंद्रित होते. आता माझ्या राजकीय प्रवासातील एक विरोधाभासी पैलू म्हणजे- मी वॉशिंग्टनमध्ये विविध लोकांच्या भेटीगाठी सातत्याने घेऊन त्यांच्यावर माझी छाप पाडण्याचे आणि प्रतिमानिर्मितीचे प्रयत्न केले नाहीत. आयोवातल्या मंडळींना मी जितके प्रेम दिले, तितके प्रेम मी वॉशिंग्टनमधील प्रस्थापितांना दिले नाही, हे खरे आहे. आयोवातली मंडळी पाहिली की, मला माझ्या आजी-आजोबांची आणि मिशेलच्या आई-वडिलांची आठवण येते. येथे एक प्रकारची आपलेपणाची भावना आहे, एक प्रकारचा आप्तभाव आहे. पण आयोवातील प्रचार आटोपल्यानंतर आपण आता राष्ट्रीय पातळीवर प्रचार करीत आहोत, हे माझ्या लक्षात आले.

वीस ते पन्नास हजारांच्या संख्येने लोक तुमच्या सभांना येतात, ही बाबच अशी आहे की, त्यामुळे डोक्यात हवा जाऊ शकते.

**प्रश्न –** तुम्ही एक प्रकारे कशाचे तरी प्रतीक झालात.

– याला डेव्हिड क्सेलरॉड[३८] फारसे गांभीर्याने घेत नव्हता आणि या सगळ्याला निकालात काढत याला 'दैवी प्रतीक ओबामा' म्हणायचा. हे जे काही होत आहे ते धोकादायक आहे, हे त्याला माहिती होते. आजूबाजूच्या घडामोडी गाळून-चाळून लोकांपर्यंत पोहोचविणाऱ्या प्रस्थापित आणि वर्चस्व असलेल्या यंत्रणा व बातम्या यांच्या चष्म्यातून लोक आपल्याकडे पाहतात. आता या बातम्यांच्या स्रोतांचे स्वरूपच बदलले आहे. अगदी २००८ पर्यंत अशी परिस्थिती होती की, मी एखाद्या लहान शहरात गेलो तर तिथे एक स्थानिक वृत्तपत्र असायचे. त्याचा मालक किंवा संपादक उजव्या किंवा परंपरानिष्ठ विचारांचा असायचा. अनेक वेळा त्याच्या केसांचा क्रू कट असायचा. शिवाय बोटाय लावलेला असायचा. ही मंडळी अनेक वर्षांपासून रिपब्लिकन पक्षाची समर्थक असायची. सरकारने कर वाढवावेत आणि ते पैसे खर्च करावेत, अशी भूमिका असणाऱ्या उदारमतवादी-पुरोगामी राजकारण्याचे म्हणणे एकूण घेण्यात त्यांना रस नसायचा; पण मला भेटायला ते तयार व्हायचे. मग तो संपादकीय लिहायचा- हा शिकागोचा वकील उदारमतवादी-पुरोगामी आहे. पण मला तो बरा व सभ्य वाटला आणि त्याच्याकडे काही चांगल्या कल्पनाही आहेत. स्थानिक दूरचित्रवाहिनीही कोणताही पक्षपात न करता सरळ पद्धतीने माझ्या प्रचाराचे वार्तांकन करायची. आता तुम्ही त्याच शहरांमध्ये गेलात तर काय दिसेल? तर, ती सर्व वर्तमानपत्रे नाहीशी झालेली आहेत. आता प्रत्येक केशकर्तनालयातील टीव्हीवर किंवा माजी सैनिकांची जी देशव्यापी संघटना आहे, तिच्या स्थानिक सभागृहातील टीव्हीवर फॉक्स न्यूज लावलेले असेल. ते जर नसेल, तर सिंक्लेर समूहाच्या[३९] मालकीची वाहिनी तरी लावलेली असेल. माझ्यासारखी व्यक्ती नेमकी कोण व कशी आहे, तिच्या राजकीय भूमिका काय व कोणत्या आहेत, ती कोणत्या मूल्यांवर विश्वास ठेवते याबद्दल पूर्वी जो समज असायची, धारणा असायच्या, ठोकताळे असायचे; त्यांत आता आमूलाग्र बदल झाला आहे. त्यामुळे अशा मंडळींचा पूर्वग्रह आणि मनातील किंतु दूर सारून त्यांच्यापर्यंत पोहोचणे अवघड झाले आहे.

लिखाण संपल्यानंतर मला एक बाब जाणवली. एखाद्या तथ्याविषयी किंवा सामाईक घटनेविषयी पूर्वी आपल्या समाजात आणि राजकीय व्यवस्थेत सर्वांचे एकमत होत असे. काही बाबींबद्दल व्यापक अशी सहमती होती. आता हे चित्र पूर्वीसारखे राहिले नाही. या घसरणीची मला प्रचंड चिंता वाटत आहे. आता आपल्याकडे कोणी वॉल्टर क्रॉंकाईट[४०] नाहीत. त्यांनी आपल्याला केनेडींच्या[४१] हत्येच्या शोकांतिकेचे वर्णन टीव्हीवरून सांगितले. पण यासोबतच व्हाईट हाऊस आणि वरिष्ठ लष्करी अधिकारी जे व्हिएतनाम युद्धाबद्दल सांगत आहेत त्यापेक्षा वस्तुस्थिती वेगळी आहे हेदेखील त्यांनी युद्धाचे समर्थक व विरोधक या दोघांनाही सांगितले. तसे आता आपल्याकडे कोणी नाही. अशा सामाईक आणि सर्वांना मान्य असलेल्या धारणा नसल्या, तर लोकशाही राबविणे अवघड होत जाते.

आयोवातील पक्षांतर्गत निवडणुकीतील विजयानंतर रेव्हरंड जेरेमाया राईट[४२] यांची दोन मिनिटांची व्हिडिओटेप प्रसिद्ध झाली. त्यात ते आफ्रिकी पद्धतीचे कपडे घालून अमेरिकेला जाम शिव्या देत आहेत. यामुळे एक वावटळ उठली आणि माझी उमेदवारी धोक्यात आली. पण ती सावरली. आता ते नेमके काय आणि का म्हणाले याची पार्श्वभूमी मी विशद केली, त्यांच्या वाक्‌ताडनाला एक संदर्भचौकट पुरविली. त्यामुळे शिकागोच्या साऊथ साईड भागात कधीही पाऊल न ठेवलेला आणि राईट काय म्हणाले याबद्दल बऱ्यापैकी नाराज असणाऱ्या देशातील एका मोठ्या वर्गाला मी माझ्या बाजूला आणले. त्या वेळचे माध्यमविश्व कसे वेगळे होते याचा हा पुरावा होय.

सध्या काय परिस्थिती आहे? तर, डेमॉक्रॅटिक पक्ष हा लहान मुलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या टोळीच्या लोकांना दाखविण्यासाठी तयार केलेला मुखवटा आहे, अशी ठाम समजूत असणारा एक मोठा वर्ग देशात आहे. हे सगळे रुजत जाते. फिलाडेल्फियातील गरीब कृष्णवर्णीय जिथे राहतात, त्या भागात दारोदार जाऊन प्रचार करणाऱ्या स्वयंसेवकाशी अलीकडेच मी बोलत होतो. क्युनॉनने[४३] प्रसृत केलेल्या कट-कारस्थानांच्या कथांबद्दल लोक त्याला प्रश्न विचारत होते. जत्रेतील किंवा सर्कशीतील आकर्षणांची जोरात ओरडून जाहिरात करणारे लोक जसे वागतात, तसेच वागण्याऱ्या एका व्यक्तीच्या प्रभावाखाली देशातील एक मोठा वर्ग आजदेखील आहे.

**६. माहिती तंत्रज्ञान-समाजमाध्यमांच्या कंपन्या**

**विरुद्ध लोकशाही**

**प्रश्न –** सध्या अस्तित्वात असलेल्या माहितीप्रसाराची द्वेषमूलक यंत्रणा नीतिमत्तेला न्यायापासून दूर नेत आहे का?

– माझ्या मते, ही व्यवस्था आपल्या लोकशाहीसमोरील सर्वांत मोठा धोका आहे. डोनाल्ड ट्रंप या व्यवस्थेतूनच निर्माण झाले. तिचे ते एका अर्थाने अपत्य आहेत. मात्र, ही व्यवस्था त्यांनी निर्माण केली नाही. त्यांनी ही व्यवस्था अधिक पक्की होण्याच्या प्रक्रियेला चालना दिली असेल, पण ती त्यांच्यापूर्वीही अस्तित्वात होती आणि ती त्यांच्या नंतरही टिकून राहणार आहे. आपण या समस्येला ज्या प्रकारे सामोरे जात आहोत, ते पाहून मी चिंताक्रांत झालो आहे. त्याचे कारण म्हणजे वॉल्टर क्रॉंकाईट यांच्या काळात...

**प्रश्न –** ते वॉल्टर क्रॉंकाईट यांचा काळ जाऊ द्या. आपण २००८ मधील आयोवातील प्रचाराबद्दल बोलू. आजघडीला तुमच्यासारखे नाव असणारी व तुमच्यासारखी जीवनकहाणी किंवा पार्श्वभूमी असणारी व्यक्ती आयोवात प्रचारार्थ गेली, तर तिला १० मिनिटे तरी स्वतःचे म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल का, याबद्दल मला शंका आहे.

– अगदी आमूलाग्र बदल झाला आहे. मगाशी मी सर्वांना मान्य असणाऱ्या धारणा–समजुतींचा उल्लेख केला. एके काळी अशी परिस्थिती होती, कारण त्या वेळी तीनच मोठ्या व महत्त्वाच्या दूरचित्रवाहिन्या होत्या आणि काही मूठभर वृत्तपत्रे होती. त्यांचा जनमानसावर–लोकमतावर प्रभाव होता. आता तुम्ही कालचक्र मागे फिरवू शकत नाही. तुम्हाला इंटरनेट नाहीसे करता येणार नाही. प्रत्येक प्रकारच्या छटांच्या राजकीय विचार–धारणा बाळगणाऱ्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठीच आणि तेवढ्याच आवडी–निवडींची पूर्तता करणाऱ्या हजारोंच्या संख्येने उदयाला आलेल्या विविध दूरचित्रवाहिन्यांना आपण नाहीसे करू शकणार नाही. आता सर्वांना मान्य असणाऱ्या धारणा–समजुतींच्या अभावी आपण मोठ्या समस्या हाताळूच शकणार नाही. आपल्यासमोर एका महामारीचा धोका उभा आहे. समस्या गंभीर आहे. पक्षभेद विसरा आणि डॉ. अँटोनी फाऊचींचे ऐका. अशा रोगांचा ते अनेक वर्षे अभ्यास करत आहेत. आपले सगळे निर्णय योग्यच ठरतील असे नाही, कारण विज्ञानात अंतिम असे काही नसते. वारंवार प्रयोग करत असताना दर वेळी काही नवी माहिती–तथ्ये पुढे येत असतात, पण आपण होता होईस्तोवर विज्ञानाच्या आधारे या संकटाचा सामना करू. लोकांचे जीव वाचविण्यासाठी विज्ञान काय सांगत आहे तेच करू, असे एकसुरात म्हणणे आता अवघड होऊ लागले आहे.

**प्रश्न –** या परिस्थितीसाठी तुम्ही या कंपन्यांना जबाबदार धरता का?

– मी यासाठी माहिती तंत्रज्ञान–समाजमाध्यम कंपन्यांना सर्वस्वी जबाबदार धरत नाही. कारण समाजमाध्यमांच्या (social media) आधीपासूनच अशी परिस्थिती होती. पण समाजमाध्यमांनी त्याला विलक्षण गती आणि चालना दिली आहे. माझी आणि या कंपन्यांच्या मालक–चालकांची ओळख आहे. मी याबद्दल त्यांच्याशी बोललो आहे. या कंपन्यांचा असा आग्रही दावा आहे की, त्या काही 'द अटलांटिक'सारखी पारंपरिक माध्यमे नाहीत. त्यांची भूमिका ही एखाद्या टेलिफोन कंपनीसारखी आहे. पण त्यांचा हा दावा काही फारसा पटण्यासारखा किंवा समर्थन करता येण्यासारखा नाही. आता ही मंडळी कशाचा प्रसार होऊ द्यायचा आणि कशाचा होऊ द्यायचा नाही, याबाबत आपला संपादकीय अधिकार वापरतातच की– मग भले तो विविध अल्गोरिदम यांच्यावर आधारित असो अगर नसो. आता देशात अस्तित्वात असलेल्या प्रत्येक मतप्रवाहाला व्यक्त होण्यासाठी खासगी कंपन्यांनी व्यासपीठ उपलब्ध करून दिलेच पाहिजे, अशी सक्ती आपल्या राज्यघटनेतील पहिली घटनादुरुस्ती करीत नाही. अंतिमतः सरकारी नियंत्रणे आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील मंडळींनी विकसित केलेले व्यवसाय यांची सांगड घालून आपल्याला या प्रश्नाचा सामना करावा लागेल, कारण परिस्थिती अधिक भीषण होत जाणार आहे. केवळ लेखी मजकुराच्या आधारे तद्दन खोट्या गोष्टींचा आणि कट–कारस्थानांच्या कथांचा प्रचार–प्रसार झाल्यामुळे अशी परिस्थिती आहे. पण कल्पना करा– मी किंवा तुम्ही व्हिडिओवर काहीबाही बोलत आहोत असे खोटेच दाखविण्याची तांत्रिक क्षमता निर्माण झाली, तर किती भीषण परिस्थिती निर्माण होईल! आपण आता अशा परिस्थितीच्या बऱ्यापैकी जवळपास पोहोचलो आहोत.

**टीपा –**

२३. लिंडन बी. जॉनसन– अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष (१९६३ ते १९६९). अतिशय चाणाक्ष, धूर्त, पाताळयंत्री आणि प्रभावी संसदपटू आणि संसदीय कामकाजातील व्यूव्हरचनाकार. त्यांच्या

कार्यकाळात त्यांनी अनेक सुधारणा घडवून आणल्या. कल्याणकारी राज्याचा विस्तार केला आणि कृष्णवर्णीयांच्या अधिकारांना अधिक प्रभावी संरक्षण देणारे कायदे केले.

२४. व्होटिंग राईट्स् ॲक्ट (Voting Rights Act)- १९६५ मध्ये मान्य झालेला कायदा. कृष्णवर्णीयांना मतदार म्हणून नाव नोंदविण्यास कठीण जावे, या हेतूने मतदार होण्यासाठीचे जे विविध भेदभाव करणारे निकष अमेरिकेतील अनेक राज्यात होते ते या कायद्याने बेकायदेशीर ठरविले.

२५. एफ.डी.आर– फ्रँक्लिन डिलानो रूझवेल्ट. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष (१९३३–१९४५). १९२९–१९३० च्या महामंदीतून देशाला बाहेर काढले. कल्याणकारी राज्याचा एका अर्थाने पाया रचला. दुसऱ्या महायुद्धात देशाचे नेतृत्व. पदावर असतानाच मृत्यू.

२६. अफोर्डेबल केअर ॲक्ट (Affordable Care Act)- २०१० मध्ये मान्य झालेला कायदा. त्यायोगे अधिक अमेरिकी नागरिकांना अरोग्यविमा उपलबध झाला. ओबामा केअर (Obama Care) या नावानेदेखील हा कायदा ओळखला जातो.

२७. नॅन्सी पेलोसी– डेमॉक्रॅटिक पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या. अमेरिकी संसदेच्या कनिष्ठ सभागृहाच्या– प्रतिनिधी गृहाच्या– विद्यमान सभापती. ओबामांच्या कार्यकाळातील पहिल्या दोन वर्षामध्ये याच पदावर आणि त्यानंतर २०१० मध्ये डेमॉक्रॅटिक पक्षाने बहुमत गमावल्यामुळे अल्पमत पक्षाच्या गटनेतेपदी आणि अर्थातच आपल्या पक्षाच्या गटनेत्या.

२८. अमेरिकन रिकव्हरी अँड रिइनव्हेस्टमेंट ॲक्ट (American Recovery and Reinvestment Act). २००८ च्या मंदीतून बाहेर पडण्यासाठी २००९ मध्ये मान्य केलेला कायदा.

२९. आर्लेन स्पेक्टर– या सर्व प्रकरणाचा परिणाम म्हणून ते आपला रिपब्लिकन पक्ष सोडून डेमॉक्रॅटिक पक्षात सामील झाले. २०१२ मध्ये निधन.

३०. जॉन बेनर– रिपब्लिकन नेते आणि २०११ ते २०१५ अमेरिकी संसदेच्या कनिष्ठ सभागृहाचे– प्रतिनिधी गृहाचे– सभापती. पक्षांतर्गत गटबाजीमुळे पदाचा राजीनामा. सध्या राजकारणातून निवृत्त.

३१. कँप डेव्हिड– अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे शासकीय रिसॉर्ट. अनेक राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या पण अनौपचारिक बैठकींचे ठिकाण. १९७८ मध्ये अमेरिकच्या मध्यस्थीने झालेल्या इजिप्त आणि इस्रायल यांच्यातील शांतीकराराची बोलणी तसेच त्यावरील स्वाक्षऱ्या येथे झाल्या.

३२. चार्ल्स क्रिस्ट– रिपब्लिकन पक्षाचे माजी नेते आणि त्या पक्षातर्फे फ्लॉरिडा राज्याच्या राज्यपालपदी निवड. २०१० मध्ये पक्षातर्फे सिनेटसाठीच्या उमेदवारी मिळविण्याचा प्रयत्नात आघाडीवर. पण ओबामांच्या काही धोरणांना राज्यपालपदी पाठिंबा दिला म्हणून पक्षाने पाठिंबा काढून घेतला आणि त्यांची उमेदवारी मागे पडली. अपक्ष म्हणून ही निवडणूक लढविली पण पराभूत. २०१२ मध्ये राष्ट्राध्यक्षपदासाठी ओबामांना पाठिंबा देत डेमॉक्रॅटिक पक्षात प्रवेश आणि सध्या त्याच पक्षाचे अमेरिकी संसदेच्या कनिष्ठ सभागृहाचे– प्रतिनिधी गृहाचे सदस्य.

३३. मार्को रुबियो– रिपब्लिकन नेते आणि फ्लॉरिडा राज्यातून निवडून आलेले सिनेट सदस्य. २०१० मध्ये पक्षातर्फे सिनेटसाठीची क्रिस्टी यांना जी उमेदवारी मिळू घातली होती, ती या प्रकरणामुळे अंतिमतः यांना मिळाली.

३४. पॉल रायन– रिपब्लिकन नेते. अमेरिकी संसदेच्या कनिष्ठ सभागृहाचे– प्रतिनिधी गृहाचे माजी सभापती. सध्या राजकारणातून निवृत्त.

३५. आयोवा– अमेरिकेतील राष्ट्राध्यक्षपदासाठीचा आपला उमेदवार कोण असावा यासाठी दोन्ही प्रमुख पक्ष– रिपब्लिकन आणि डेमॉक्रॅटिक– पक्षांतर्गत निवडणुका घेतात. यांना primaries असे म्हणतात. आयोवात या primaries इतर राज्यांपेक्षा सर्वात आधी होतात आणि म्हणून आयोवाला अमेरिकेच्या राजकारणात एक आगळे महत्त्व आहे.

३६. लिटल लीग– ४ ते १६ वयोगटातील मुलांसाठी बेसबॉल आणि सॉफ्टबॉलच्या स्थानिक स्पर्धांचे आयोजन आणि अशा उपक्रमांना प्रोत्साहन देणारी संस्था.

३७. इलिनॉय– २००४ मध्ये ओबामा हे सिनेटमध्ये इलिनॉय राज्यातून निवडून गेले.

३८. डेव्हिड क्लरॉड– प्रचारादरम्यान आणि राष्ट्राध्यक्षपदाच्या कार्यकाळात ओबामांचे वरिष्ठ सल्लागार.

३९. सिंक्लेर ब्रॉडकास्टींग कॉर्पोरेशन– अनेक दूरचित्रवाहिन्या आणि रेडिओ वाहिन्याची मालकी असणारा माध्यम समूह. उजव्या विचारांकडे उघड कल.

४०. वॉल्टर क्राँकाईट– सुप्रसिद्ध अमेरिकी दुरचित्रवाणी पत्रकार. त्यांच्या विश्लेषणाला आणि म्हणण्याला मानणारा मोठा वर्ग होता.

४१. जॉन एफ. केनेडी– अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष

४२. रेव्हरंड जेरेमाया राईट–शिकोगोतील धर्मगुरु. ओबामांचे लग्न त्यानींच लावले. त्यांच्या चर्चचे ओबामा कुटुंबीय सदस्य. या वादानंतर संबधात काहीसा दुरावा.

४३. क्यूनॉन (Q-non)- २०१७ मध्ये उगम पावलेली आणि लवकरच इटंरनेट आणि समाजमाध्यमांच्या आधारे प्रसृत झालेल्या कट–कारस्थानांचा दावा करणारी उजव्या विचारांची आभासी चळवळ. प्रणेता आजदेखील अज्ञात. यातर्फे पुरोगामी आणि उदारमतवाद्याच्या विरोधात गलिच्छ आरोप करण्यात आले.

(भाग ३ : पुढील अंकात)

**अनुवाद : अभय दातार,** नांदेड
abhaydatar@hotmail.com

(The Atalantic या इंग्रजी नियतकालिकात १६ नोव्हेंबरच्या अंकात **जेफ्री गोल्डबर्ग** यांनी घेतलेली ही मुलाखत आहे.)

सूरज येंगडे

# दलितांचे दुःख व अश्रू मध्यमवर्गीय भारतीयांचे होत नाहीत

(भाग २)

मी अतिशय ॲकॅडमिक धाटणीचं पुस्तक लिहिलं. मी या मुद्यांविषयी काही वर्षं विचार करत होतो, बोलत होतो आणि वादचर्चा करत होतो– त्या संकल्पनांचा पुनर्विचार करावा, असं मला वाटलं. माझ्या मते, मी महान पुस्तक लिहू पाहत होतो. असं बोलणं अहंकारी वाटत असेल, तर तो तुमच्यातल्या असुरक्षिततेचा प्रश्न आहे; त्याला मी काही करू शकत नाही. तर मी म्हणालो तसं, पीएच.डी.साठी मी स्थलांतरावर काम केलं. मग मी पीएच.डी. बाजूला ठेवली. ॲकॅडमिक अर्थाने मी जातिव्यवस्थेचा व्यावसायिक अभ्यासक नव्हतो. म्हणजे मला बऱ्याच नव्या गोष्टी वाचाव्या लागणार होत्या. आधी मी रुचीखातर काही गोष्टी वाचत होतो, पण आता हे पुस्तक लिहिण्यासाठी मी पुन्हा त्यांची उजळणी करू लागलो... तेव्हा मला वाटलं, डॅम! तर, 'कास्ट मॅटर्स' असं आकाराला आलं असावं.

### दोन
### 'कास्ट मॅटर्स'बद्दल

**प्रश्न –** 'कास्ट मॅटर्स' हे असामान्य पुस्तक आहे. ब्राह्मण्याचं तत्त्वज्ञान भारतातील सार्वजनिक जीवनाचं नियमन करतं, अशी मांडणी या पुस्तकात केलीय. एका विशिष्ट निकडीच्या सूरात प्रस्तुत पुस्तकात ही मांडणी येते. ही निकड का जाणवते?

– मी स्थलांतर अभ्यासाचा विद्यार्थी आहे. मी आफ्रिकी सिद्धान्त शिकतो– त्यासाठी मी (पीएच.डी. करायला) दक्षिण आफ्रिकेला गेलो. या पुस्तकामागील वैयक्तिक प्रवास अनेक लोकांना माहीत नाही. मी यूकेमध्ये होतो. लंडनला मला नोकरी मिळाली होती आणि मानवाधिकार वकील म्हणून मी जगत होतो. पण मला त्यात समाधान वाटत नव्हतं, कारण माझ्या नि माझ्या समुदायाच्या भवितव्याविषयी अधिक काही उत्तरं मला हवी होती. मी 'माझं भवितव्य' असं म्हणतो, तेव्हा माझ्या समुदायाशी ते जोडलेलंच आहे. दलितांनी आफ्रिका व लॅटिन अमेरिका या अवकाशांमध्ये प्रवेश केलेला नाही, असं माझ्या लक्षात आलं. मी युनायटेड नेशन्समध्ये काम केलेलं होतं, त्यामुळे आफ्रिका माझ्यासाठी महत्त्वाचा होता आणि मी आफ्रिकी सामाजिक व राजकीय प्रश्नांकडे लक्ष दिलं होतं. त्या वेळी अमेरिकी सिनेमाने नि संस्कृतीने निर्माण केलेल्या आफ्रिकी लोकांविषयीच्या साच्यांचा आणि आफ्रिकी लोकांकडे बघण्याच्या अमेरिकी नजरेचा माझ्यावर बराच प्रभाव होता. एके दिवशी लंडनमध्ये असताना मी हे सगळं सोडायचा निर्णय घेतला.

मग मी नोकऱ्यांसाठी अर्ज करायला लागलो. मला सोमालियाला जायचं होतं. पण सुरक्षेसंदर्भातील परवानगीत अडचणी आल्यामुळे ते घडलं नाही. माझ्या या शोधप्रवासात मी विकासक्षेत्रामध्ये जाऊन पोचलो– 'विकासक्षेत्र' म्हणजे काय, हे माहीत नसतानाच मी या

क्षेत्रात नोकऱ्या शोधत होतो. आफ्रिकी लोक कसे जगतायत, कसे तग धरून आहेत आणि कसे लढतायत, राजकारणाविषयीची त्यांची कल्पना काय आहे- हे जाणून घेण्यासाठी मला आफ्रिकेला जायचं होतं. दलित समुदायासाठी हे खूप महत्त्वाचं होतं. आफ्रिका खंडामध्ये ५४ राष्ट्रं आहेत, मला भूराजकीय दृष्ट्या अदमास घेण्यासाठी हा प्रचंड मोठा अवकाश होता. सगळ्यांनाच याचं आश्चर्य वाटलं. 'तू आफ्रिकेला का जातोयस?' असं त्यांनी मला विचारलं.

काळे व दलित यांच्यातील ऐक्याची रूपरेषा विकसित कशी करायची, याचा शोध घेण्यासाठी मी तिथे गेलो. तिथे मी माझा प्रकल्प तयार केला. आफ्रिकी लोकांमधील जातीचा अभ्यास मला करायचा होता, पण प्रायोजक संस्थेने- भारत सरकार माझे प्रायोजक होते- हा प्रकल्प नाकारला आणि मला स्थलांतराविषयी काम करायची सूचना केली. पदवीचा विद्यार्थी असताना विविध तडजोडी करण्याचा प्रयत्न आपण करत असतो, कारण आपल्याला काहीही करून पीएच.डी. पूर्ण करायची असते. मी अडीच वर्षांमध्ये तो प्रकल्प पूर्ण केला आणि जोहान्सबर्गमधल्या विटवॉटर्सरँड विद्यापीठातून मला पीएच.डी. मिळाली.

मग मी हार्वर्डला आलो. आफ्रिकी-अमेरिकी लोकांशी जोडून घेण्याची माझी खूप इच्छा होती, मग तसंच घडलंही. त्यानंतर माझी दृष्टी खरोखरच खुली झाली. आफ्रिकी-अमेरिकी इतिहास, संस्कृती व वाङ्मय या विषयांच्या अनेक वर्गांना मी बसलो. त्यांनी निर्माण केलेल्या देदीप्यमान अभ्यासविश्वाशी माझा परिचय झाला. मी एव्हरनोट-ॲपमध्ये टिपणं काढत होतो. दक्षिण आफ्रिकेमध्ये मी पीएच.डी. केलेली असल्यामुळे अमेरिकेत नोकरी मिळणं अवघड होतं, कारण अमेरिकेचं अगदीच अमेरिकीकरण झालेलं आहे. पण दरम्यान मी हेन्री लुई गेट्स ज्युनिअर यांच्याशी बोलत होतो. एके दिवशी त्यांनी मला विचारलं, ''तू माझ्या ऑफिसला येतोस का?'' मी डळमळीतपणे होकार दिला. ते खास 'स्किप गेट्स' धाटणीची बढाई मारत म्हणाले, ''तुला माझं ऑफिस तर माहितेय. ये मग.'' मी नम्रपणे त्यांची माफी मागितली आणि मला त्यांचं ऑफिस कुठेय ते माहीत नसल्याचं सांगितलं. त्यांना थोडं आश्चर्य वाटलं असावं, असं मला वाटतं. ते स्टार आहेत, विलक्षण विद्वान आहेत. मग मी दिवसाच्या वेळेत त्यांच्या ऑफिसात गेलो. ते म्हणाले, ''हे बघ, द्यू बोय आणि आंबेडकर यांच्यात इतकं सुंदर नातं असल्याची मला माहिती नव्हती.'' मग ते म्हणाले, ''तुझं काम पूर्ण करायला तुला किती गरजेचे आहेत, तेवढं मला सांग.'' मी काही अशा प्रश्नासाठी तयार नव्हतो, त्यामुळे त्यांना काय म्हणायचंय हे माझ्या लक्षात आलं नाही. मग ते म्हणाले, ''मी तुला फेलोशिप देतो, तू ते महत्त्वाचं पुस्तक लिही. ही कहाणी आम्हाला समजणं गरजेचं आहे!'' मला सुखद आश्चर्याचा धक्का बसला. त्यांनी हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मला द्यू बोय फेलोशिप दिली. तेव्हा मी 'कास्ट मॅटर्स' लिहायचं ठरवलं.

मी अतिशय ॲकॅडमिक धाटणीचं पुस्तक लिहिलं. मी या मुद्द्यांविषयी काही वर्षं विचार करत होतो, बोलत होतो आणि वादचर्चा करत होतो- त्या संकल्पनांचा पुनर्विचार करावा, असं मला वाटलं. माझ्या मते, मी महान पुस्तक लिहू पाहत होतो. असं बोलणं अहंकारी वाटत असेल, तर तो तुमच्यातल्या असुरक्षिततेचा प्रश्न आहे; त्याला मी काही करू शकत नाही. तर मी म्हणालो तसं, पीएच.डी.साठी मी स्थलांतरावर काम केलं. मग मी पीएच.डी. बाजूला ठेवली. ॲकॅडमिक अर्थाने मी जातिव्यवस्थेचा व्यावसायिक अभ्यासक नव्हतो. म्हणजे मला बऱ्याच नव्या गोष्टी वाचाव्या लागणार होत्या. आधी मी रुचीखातर काही गोष्टी वाचत होतो, पण आता हे पुस्तक लिहिण्यासाठी मी पुन्हा त्यांची उजळणी करू लागलो... तेव्हा मला वाटलं, डॅम! तर, 'कास्ट मॅटर्स' असं आकाराला आलं असावं.

**प्रश्न –** पुस्तकावरच्या टीकेचा उल्लेख तुम्ही केलात. दलित राजकीय संभाषिताचा मध्यवर्ती बिंदू म्हणून संविधानवाद मानण्यावर तुम्ही टीका केलीत, ती योग्य नसल्याचं लोकांचं म्हणणं आहे. विशेषत: भारतामध्ये सार्वजनिक अवकाशातील निर्णायक विचारसरणी असलेल्या ब्राह्मण्याचा सामर्थ्यवान प्रतिकार करण्यासाठी संविधानवाद उपयोगी पडत असताना अशी टीका त्यांना योग्य वाटली नाही. अशा रीतीने संविधानवादाबद्दल लिहीत असताना तुम्हाला नक्की कशाचं समर्थन करायचं होतं, याबद्दल तुम्ही आम्हाला अधिक काही सांगाल का?

– शौना, आपण एक गोष्ट समजून घेणं गरजेचं आहे. मी ज्या कुटुंबातून आलो, ते दारिद्र्यरेषेखाली आहे. मी त्या गाळातून बाहेर पडलेल्या कीटकासारखा आहे. एका बेकार घाणीतून मी आलोय. सुदैवाने माझे वडील शिपाई होते. त्यांना दर महिन्याला साडेतीन हजार रुपयांचा चेक

मिळायचा, ते मला आठवतं. तर, ते विचारांमध्ये अतिशय रस घेणारे होते. माझ्या घरात लिओ टॉलस्टॉयचं लेखन होतं, आइनस्टाईनचं आत्मचरित्र होतं, आमच्या घरात कांशीराम यांचं साहित्य होतं. बरं, हे सगळं मराठीत होतं. बाबूराव बागुल, राजा ढाले, वि. स. खांडेकर, भालचंद्र नेमाडे, दुर्गा भागवत आदी मराठी साहित्यातल्या ख्यातनाम मंडळींची पुस्तकंही आमच्याकडे होती. या प्रादेशिक भाषेतलं बरंच काही आम्ही वाचत होतो. वेगवेगळ्या जातींमधील पुरोगामी लोकांप्रमाणेच मुंबईतल्या अभिजनांमध्येही वाचली जाणारी पुरोगामी नियतकालिकंही माझे वडील घेत असत. नांदेड हे छोटंसं मागास शहर आहे. तिथे माझे वडील साधनेसारखं नियतकालिक घेत होते– उच्च अभिरुचीचं, ब्राह्मणी प्रभाव असलेलं हे नियतकालिक बुद्धिप्रामाण्यवादामध्ये, पुरोगामित्वामध्येही रस घेत असे. तर, माझे वडील केवळ दलित साहित्यापुरते बंदिस्त झालेले नव्हते. दलितांनाही बुद्धिप्रामाण्यवादामध्ये आश्वस्तता मिळत होती. विशेष म्हणजे, साधनेत माझा लेख प्रकाशित होतो आहे. माझे वडील हयात असते, तर त्यांना याचा खूप अभिमान वाटला असता. साधना त्यांच्या आवडीचं साप्ताहिक होतं.

मी अगदीच अपघाताने इथवर आलेलो आहे, हे कळावं यासाठी मी हे सगळं सांगतोय. दलित समुदायातून, आत्यंतिक दारिद्र्यातून लोक येतात; पण या सगळ्यातून विचारविश्वातून प्रवास करायला खूप चिकाटी लागते. मी हे कसं करतो, ते मला माहीत नाही. पण भविष्यासाठी इतिहास रचायचा असेल; तर आज आपण घाम गाळायला हवा, म्हणजे भविष्यात आपल्या समुदायाला या कष्टांची फळं चाखता येतील.

मी जे करतोय, ते मला करू द्या. तुमच्या कामकाजाच्या मार्गावर मी प्रश्न विचारलेले नाहीत. मी माझं काम करतो, तेव्हा तुमच्यावर हल्ला होत असल्यासारखं तुम्हाला वाटत असेल, तर हा संदेश तुमच्यासाठीच असू शकेल. पण ते पुस्तक म्हणजे कलाकृती आहे– मी ते रंगवलंय. प्रेक्षकांनी ते जाणवून घ्यावं. ते तुमच्या गाभ्याला स्पर्श करत असेल, तर तुम्ही बसून काही दिवस त्याकडे एकटक पाहत राहा. तुम्हाला त्याचा स्पर्श होत नसेल, तर सरळ निघून जा. हे विचार कोणाला रुचत असतील, तर ठीक आहे. कोणाला या पुस्तकावर टीका करायची असेल, तरीही ठीक आहे. पण मला माझ्या आजीच्या, आईच्या, वडिलांच्या वेदनेशी, बहिणींच्या सुरक्षेशी–असुरक्षेशी, माझ्या भावांच्या भरकटलेपणाशी, माझ्या स्वतःच्या अवनतीशीही प्रामाणिक राहायचं आहे. त्या अर्थी हा विचारांचा प्रवाह आहे. हे पुस्तक म्हणजे इतिहासाचं स्मारक आहे आणि मला या काळाशी सत्यनिष्ठ, प्रामाणिक राहायचं होतं. काळाचा विश्वासघात करायचा नव्हता.

**प्रश्न –** तुम्ही एक पद्धतीशास्त्रीय कोटी तयार केली आहे, त्याला तुम्ही कास्टेगरीज असं संबोधलं आहे. सामाजिक अर्थक किंवा अर्थपूर्णता हातात असणाऱ्या नि वापरणाऱ्या लोकांचा अदमास घेण्यासाठी ही संज्ञा उपयोगी पडते. या संज्ञांना राजकीय चेतनाजागृतीसाठी कसं वापरता येईल आणि या संज्ञा धार्मिक सीमांपलीकडेही कशा विस्तारतात?

– मी 'कास्टेगरीज'बद्दल लिहितो तेव्हा हेदेखील नमूद करतो की, या संज्ञेवर काही केवळ दलितांची मालकी नाही. 'कास्टेगरीज'चं घटितशास्त्रीय आकलन जातीच्या मूळ घटकासंदर्भात व्हायला हवं आणि जातीचं कोटीकरण कसं होतं याचाही संदर्भ त्याला असायला हवा. जात म्हणजे विभाजन. या विभाजनामध्ये प्रत्येक विभागाची वैश्विक मूल्यं आहेत. माझी मूल्यं मी दुसऱ्यावर लादणार नाही आणि दुसरी व्यक्ती तिची मूल्यं माझ्यावर लादू शकत नाही– हा विचार भारतातल्या ब्राह्मणी प्रकल्पातून आलेला आहे. अशा प्रकारे ते कोणाचाच नसलेला एक इतिहास लादतात.

'कास्टेगरायझेशन' सत्तेशी कसं खेळतं किंवा सत्ता कशी काबीज करतं, हे ओळखण्यासाठी मी नम्रपणे त्याबद्दल मांडणी केली; कारण 'कास्टेगरीज'साठी सत्ता अतिशय महत्त्वाची आहे. इतर धर्मांमध्ये व जातींमध्येही ती अर्थातच अस्तित्वात आहे. ख्रिस्ती, मुस्लिम, ब्राह्मण यांच्यातही 'कास्टेगरी' दिसतात. मी यावर दलितसंदर्भात मांडणी केली, कारण ते माझं अनुभवजन्य ज्ञान आहे.

मी कथा लिहायचा प्रयत्न करत होतो, असंही लोक म्हणाले. संशोधक म्हणून आपण क्षेत्र–अभ्यास करायला गेलो की, टिपणं काढतो. संस्कृतीसोबत सत्तेची आंतरक्रीडा सुरू असल्याचं आपल्या लक्षात येतं. सत्ता व संस्कृतीच्या या मूल्यांची स्वतःची अशी वैश्विक आवाहकता असते. मी यातल्या एखाद्या 'कास्टेगरी'मध्ये येत असेन, तर माझीही काहीएक– उदाहरणार्थ, परिवर्तनकारी दलित म्हणून– वैश्विक आवाहकता आहे; पण मी इतर परिवर्तनकारी प्रारूपांद्वारे माझ्याकडे पाहतो. मी जतनवादी दलित असतो,

तर जतनवादाकडे स्वीकारणीय प्रारूप म्हणून पाहिलं असतं.

तर, मी ही मांडणी केली आणि यातून अमुक-तमुकवर टीका होते असा अर्थ लोकांनी काढला असेल, तर तो त्यांचा अर्थ झाला. लेखक म्हणून विशिष्ट अर्थ वाचकांवर लादण्याचा मला फारसा अधिकार नाही. हे आता वाचकांचं पुस्तक आहे. त्यांच्या मेंदूतल्या पेशींमध्ये त्याने प्रवेश केला आहे आणि शरीरामध्ये ते कार्यरत झालेलं आहे. पुस्तकातल्या संकल्पना त्यांनी कशा रीतीने समजून घेतल्या याचा त्यांच्या कृतींवर प्रभाव पडतो आहे.

पिएर बोर्द्यू, फॅनन आणि आंबेडकर यांची अवतरणं देऊन नि बरीच ॲकॅडमिक भाषा वापरून मी हे सगळं लिहू शकलो असतो. उदाहरणार्थ, मला केवळ ग्रीको-युरोपीय परंपरेमधून- सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल, हायडेगर, हेगेर- विचार करायचा होता. पुस्तकाच्या पहिल्या मसुद्यामध्ये या लोकांना उत्फुल्ल दलित मन मिळालं होतं. पण अशाने संदेश पोचवता आला नसता. आपण दलितांविषयीचा एखादा विषय हाताळतो, तेव्हा त्याचं पद्धतशीरशास्त्रीय स्पष्टीकरण देणं गरजेचं आहे. 'कास्टेगरीज'संबंधीचा विभाग पद्धतीशास्त्रीय टिकाऊपणाच्या अर्थाने वाचला गेला, तर लोकांना त्याच्या आकलनाचा चांगला अंदाज येईल. हा मुद्दा चर्चेला घेतल्याबद्दल तुमचे आभार.

### तीन
### समकालीन राजकारण

**प्रश्न –** भारत सरकारने स्वतःचा हिंदू राष्ट्रवाद अभूतपूर्व सामर्थ्याने पुढे आणला आहे. तुम्ही तुमच्या 'दलिटॅलिटी' या ('इंडियन एक्स्प्रेस'मधील) स्तंभामध्ये या संदर्भात अनेकदा लिहिता. काही वेळा तुमचं म्हणणं वादग्रस्तही ठरतं. आजच्या भारतामध्ये मुस्लिमांना अस्पृश्यांसारख्याच अनुभवाला सामोरं जावं लागत आहे, असंही तुम्ही लिहिलं होतं. हिंदू राष्ट्रवादाच्या सामर्थ्याचा प्रतिकार करणारा सार्वजनिक अवकाश निर्माण करण्यासाठी दलित व मुस्लिम कसे एकत्र येऊ शकतात?

– खूप चांगला प्रश्न आहे. तळपातळीवर, माझ्या स्वतःच्या अनुभवांनुसार, मी असं म्हणेन की, भारतातल्या शहरी किंवा निमशहरी वसाहतींच्या भूअवकाशीय रचनेकडे पाहिलं, तर या अवकाशांच्या एका कोपऱ्यात दलित व मुसलमान एकमेकांशेजारी राहताना दिसतात. त्यांना तिकडे ढकललं जातं. त्यांच्या संदर्भात परिणामकारक सांधा जोडणाऱ्या दोन गोष्टी आहेत. एक- ते सारखंच अन्न खातात- सारखेच मसाले, सारखेच मांस. दोन- ब्राह्मणी सामाजिक रचना दोघांनाही दडपते. या मुद्द्यावर हे दोन समुदाय ऐक्य साधू शकतात.

पण कायमच ऐक्य अस्तित्वात असतं, असा याचा अर्थ नाही. अनेक अंतर्विरोध आहेत. भारतामध्ये अनेक कट्टरतावादी मुसलमान आहेत- विशेषतः गरीब मुसलमानांमध्ये असे कट्टरतावादी आहेत. मी हे बोलतो ते लोकांना आवडत नाही, विशेषतः उदारमतवाद्यांना आवडत नाही. असं ऐकल्यावर ते एकदम भयग्रस्त होतात. 'तू हे असं का लिहितोस?' अशी विचारणा उदारमतवादी मला पत्र लिहून करतात. आमच्यात बरेच वाद-युक्तिवाद होतात. पण बहुतांश लोक हा प्रश्न विचारत असले, तरी त्यांना या संदर्भात काहीच अनुभव नसतो. यातले बहुतांश लोक सर्व सुखसोईंनी युक्त इमारतींमध्ये राहत असतात आणि मुस्लिम समुदायातील आयएएस अधिकारी किंवा उद्योजक आई-वडिलांची मुलं यांची मित्र-मैत्रिणी असतात. ते पूर्णतः निराळ्या सामाजिकतेमध्ये वावरत असतात. ते आणि मी आत्ता बोलतो, हा निव्वळ एक अपघात आहे. मी भारतात असतो, तर त्यांचं नि माझं जग पूर्णतः भिन्न राहिलं असतं. ते समाजवादी मूल्यं मानत असले, तरी त्यांनी माझ्याकडे तुच्छतेने पाहिलं असतं. त्यांच्या जातीयवादाने मला अवकाश मिळू दिला नसता. या लोकांना स्वतःचं बाळबोध जागलेपण दाखवायचं असतं, ते मला अजिबात सहन होत नाही.

हे मी कशाला बोलतोय? कारण, मुसलमान आणि दलित कायम एकमेकांसोबत राहिलेले आहेत, पण एकमेकांविरोधातही राहिलेले आहेत. भारताविषयीची मुसलमानांची जाणीव हिंदू जाणिवेशी बरीचशी जोडलेली आहे. ते 'हिंदू' कोटीचं जातीनुसार विभाजन करत नाहीत. ते दलितांकडे पाहताना स्वतंत्र दलित म्हणून पाहत नाहीत, तर हिंदू म्हणून पाहतात. त्यांची अडचण ही आहे. त्यांना मौलानांकडून नि मौलवींकडून मिळालेल्या शिक्षणाचा हा परिणाम आहे. मुसलमानांनी दलितांच्या प्रश्नाशी गद्दारी केलेली आहे. 'तू असं कसं काय म्हणू शकतोस?' असं आता तुम्ही विचाराल. सांगतो. ते मशिदीमध्ये जातात आणि पॅलेस्टाईनसाठी प्रार्थना करतात; पण त्यांनी मशिदीत जाऊन खैरलांजीसाठी किंवा दलितांच्या इतर जनसंहारांसंदर्भात प्रार्थना केली होती का?

मुसलमानांनी आणि दलितांनी एकत्र यायला हवं, हे उदारमतवादी प्रतिपादन मला रास्त वाटतं; पण त्यांत प्रचंड स्थानिक व अंतर्गत तणावही आहे, हे आपण समजून घ्यायला हवं. याचा लाभ कोणाला होणार आहे? याचा वापर ब्राह्मण करतात आणि दलित नि मुसलमान हे देशद्रोही असल्याचं सांगतात. दलितांना थेट ब्राह्मणांपर्यंत पोचण्याची वाट नाही, पण मुसलमानांकडे जाण्याची वाट त्यांना उपलब्ध आहे. का? तर, ते एकमेकांचे शेजारी आहेत म्हणून. 'दलित क्रांती शक्य आहे का?' या विषयावर मी लेफ्ट फोरममध्ये एक भाषण दिलं होतं. मी म्हणालो, ''असं काही शक्य नाही! फ्रेंच क्रांती झाली तेव्हा त्यांनी बॅस्टिलवर हल्ला चढवला होता. दलितांना सत्ताकेंद्रापाशी जाणं अवघड आहे, ते भूअवकाशानेच या केंद्रापासून विभक्त झालेले आहेत! ब्राह्मणांनी दलितांचं विनाकारण हिंदूकरण केलं आहे. असं करताना विचलित होऊन त्यांचं लक्ष मुस्लिमांकडे गेलं.''

आता आपण मुस्लिम नि दलित यांच्याबद्दल बोलू. राजकीय आघाडीवर ते कायमच एकमेकांसोबत राहिले आहेत, हे मी तुम्हाला सांगू शकतो. पण दलितमुक्तीच्या संदर्भात मुस्लिमांनी चुकाही केलेल्या आहेत. हे (चुका करणारे) 'नेहमीचे मुस्लिम' नाहीत- त्यात मी भेद करतो. हे उच्चजातीय 'धर्मांतरित' मुस्लिम आहेत. कनिष्ठ जातींमधील- अनुसूचित जातीय-जमातीय व इतर मागासवर्गीय (ओबीसी) मुसलमानांची आडनावं (मुस्लिमेतर) दलितांसारखीच आहेत! उदाहरणार्थ- तुम्ही पश्चिम महाराष्ट्रात गेलात, तर तुम्हाला अब्दुल देशमुख असं मुस्लिम नाव सर्रास आढळतं. ते (मुस्लिमांमधील कनिष्ठ जातीयांनी) त्यांचं अनन्य परिप्रेक्ष्य राखलं आहे. मी मुसलमानांवर टीका करतो, तेव्हा उच्चजातीय धर्मांतरित मुसलमानांवर टीका करत असतो. ते संपूर्ण मुसलमान समुदायाचे प्रवक्ते राहिले आहेत आणि हिंदू-मुस्लिम विभाजनाला ते खतपाणी घालतात. मुळात हे विभाजनच हास्यास्पद आहे, असं मला वाटतं.

भारताचं हिंदू-मुस्लिमीकरण दोन्ही धर्मांमधल्या उच्चजातीयांच्या पथ्यावर पडलं आहे. सच्चर समितीच्या अहवालामध्ये मुसलमानांच्या उघड अक्षमतांवर चर्चा केलेली आहे- मुघलांचे वारस असलेले हे लोक असतील का? नाही! सदर अहवालामध्ये स्थानिक-एतद्देशीय मुस्लिमांचा उल्लेख आहे, त्यांना पद्धतशीरपणे दूर ठेवण्यात आलेलं होतं. एकाच मशिदीत प्रार्थना करत असताही तुम्ही (उच्चजातीय मुस्लिम) स्वतःच्या मुलीचं लग्न खालच्या जातीतल्या मुस्लिमाशी करून द्याल का? कोणालाही याबद्दल बोलायचं नसतं.

अतिशय प्रेमळ फारकतीच्या मुद्यावरून मी टीका करतो. भारतातल्या मुस्लिमांनी आणि दलितांनी एकत्र काम करणं गरजेचं आहे का? होय, शंभर टक्के. त्यांनी एकत्र काम कसं करावं? बहुजन चौकटीमध्ये करावं. ते शक्य आहे, कारण मुस्लिम लोक बहुजन अस्मितेचा भाग आहेत. तुम्ही मुस्लिम असूनही आमचा भाग असू शकता. तुमच्या लक्षात आलं असेल तर, गेल्या काही दिवसांमध्ये मी माझं कथन बदलतो आहे. मी याबद्दल दलितांशीही बोलतो आहे. दलित मुस्लिम आहेत, दलित ख्रिस्ती आहेत आणि आपण त्यांच्याशी खुलेपणाने बोलायला हवं. हे अवघड संभाषण आहे, पण मी माझ्या पातळीवर ते सुरू केलं आहे. केवळ वेगळं नाव नि धर्म मिळालेल्या माझ्या दलित भावा-बहिणींबद्दल मला चिंता वाटते. शेवटी आमची गुणसूत्रं सारखीच आहेत.

मुस्लिमांनाही हे हळूहळू कळतं. परंतु, आधी आम्हाला हिंदू म्हणू नका, असं मी त्यांना सांगू इच्छितो. आम्ही हिंदू नाही. तुम्ही दलित ख्रिस्तींना ख्रिस्ती असं म्हटलंत, तर त्यांचं दलितत्व तुम्ही काढून घेत असता. भारतीय राजकारणाच्या तथाकथित 'जमातीकरणा'ला माझा विरोध आहे- पण केवळ धार्मिक अर्थाने, कारण जातीच्या संदर्भातील एका सखोल जाणाऱ्या समस्येचं निराळं रूप म्हणजे धर्म आहे. ही हिंदू-मुस्लिम समस्या असल्याचं दाखवून जातीय समस्या टिकून राहते.

त्याकडे जातीय समस्या म्हणून पाहिलं, तर जातिव्यवस्थेवर हल्ला करणं शक्य आहे. धर्मावर हल्ला करता येत नाही. तसं कोण करेल? धर्मावर हल्ला केला, तर आपल्याला कुठेच पुढे जाता येणार नाही. त्यातून धार्मिक युद्ध सुरू होईल. पण जातीवर हल्ला करणं शक्य आहे. इतर लोकांकडून लाभ मिळणाऱ्या लोकांकडे जातिव्यवस्थेची मालकी आहे. जातिव्यवस्थेवर हल्ला केला, तर तिच्या उच्चाटनाच्या दिशेने आपल्याला जाता येईल.

**प्रश्न –** आज मुस्लिम व ख्रिस्ती लोकांमध्ये जातीवरचं लेखन अत्यल्प आहे. सच्चर समितीच्या अहवालाने [१] २००६ मध्येच आपल्याला सांगितलं होतं की, मुस्लिम दलित हा भारतातील सर्वांत असुरक्षित गट आहे!

– या अहवालाचा वापर करून अनेकांनी मुस्लिम दडपलेले असल्याचं सांगितलं, हे मी समजू शकतो. कोणते मुस्लिम दडपलेले आहेत? हिंदू दडपलेले आहेत, असं कोणी म्हटलं तर ते तुम्ही स्वीकारल का? नाही. अनुसूचित जातींमधले लोक दडपलेले आहेत, असं आपण म्हणू.

**प्रश्न –** पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाच्या स्वरूपाकडे जातीय दृष्टीने कसं पाहावं? मोदी ब्राह्मण नाहीत, पण त्यांच्यावर अनेकदा ब्राह्मणी रचनेची पाठराखण केल्याचा आरोप होतो. भारताच्या पायाभरणीवेळी १९४० च्या दशकात दृढमूल झालेली ब्राह्मणी रचना कायम राहिली नसती, तर कदाचित मोदी पंतप्रधान झाले नसते. मोदींनी सत्ता काबीज करण्याच्या घटनेमध्ये या ब्राह्मणी रचनेच्या रूपांतराचं प्रतिबिंब पडलेलं आहे. नेते म्हणून मोदी ब्राह्मणी रचनेची पाठराखणही करतात आणि त्याच वेळी त्यात बदलही करतात, हे कसं?

– हा चांगला प्रश्न आहे. ब्राह्मण तीन प्रकारे समजून घेता येतात : (i) ओळख, (ii) प्रतिनिधित्व, (iii) व्यक्तीकरण. या तीन पद्धती आपण स्पष्टपणे समजून घेतल्या, तर मोदींकडे कसं पाहायचं याची जातीय चौकट आखता येईल. मोदींविषयीचं जातीय आकलन असं– प्रतिनिधी म्हणून ते ब्राह्मण आहेत, पण महत्त्वाचं म्हणजे ओळखीच्या पातळीवर ते ब्राह्मण आहेत. या दोन चौकटींची पूर्तता ते करतात, पण ते व्यक्तिगत स्तरावर ब्राह्मण होऊ शकत नाहीत, कारण ते मुळात ब्राह्मण नाहीत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला हे तीनही घटक लागू होतात. सर्व ब्राह्मणांना हे तीनही घटक लागू होतात का? तसं असेलच असं नाही. उदाहरणार्थ– ब्राह्मण व्यक्ती ब्राह्मण्याचं प्रतिनिधित्व करायचं नाही असं ठरवू शकते आणि योग्य बाजूला असणाऱ्यांना साथ देऊ शकते.

ब्राह्मण ओळखीचं व प्रतिनिधित्वाचं प्रतीक मोदी आहेत. त्यांची जात इथे अप्रस्तुत आहे, कारण प्रतिनिधित्व संदेशवाहकाद्वारेही करता येतं. संदेशवाहक कधीही बाजूला सारता येतात. या संदेशवाहकाच्या कामामध्ये ते त्यांचे मालक सांगतील तसं करत आहेत. त्यांना व्यक्ती म्हणून कृती करायचा अधिकार नाही. आपण कनिष्ठ जातीय व्यक्ती आहोत, हे त्यांनाही माहीत आहे. ते १९९४ पासून ओबीसी असले किंवा मोढ घंची (वाणी) ही त्यांची मूळ जात असली, तरी ते ब्राह्मणांहून कनिष्ठच आहेत.

जातीविषयीच्या आपल्या आकलनावर याचा कसा परिणाम होतो, हे आपण समजून घ्यायला हवं. मोदींची अखेर एका देशाचे पंतप्रधान म्हणून होणार आहे. त्यांचा वारसा त्यांच्या मृत्यूनंतर उरणार नाही. मोदींनी जे काही केलं, त्याचं श्रेय ब्राह्मण स्वतःकडे घेतील. त्यातील चुकांचं खापर इतर ओबीसींवर फोडलं जाईल. ब्राह्मणी व्यवस्थेची हीच परंपरा राहिलेली आहे.

मोदी ब्राह्मण व्यक्ती असते, तर हा प्रश्न वेगळा राहिला असता. प्रतिनिधित्वाच्या आणि ओळखीच्या राजकारणामध्ये ते अतिशय संकुचित वास्तव म्हणून जगत आहेत, त्यात ते स्वतःची ओळख ब्राह्मणी प्रकल्पाशी जोडून घेत आहेत– रा.स्व.संघाचे दलित, रा.स्व.संघाचे मुसलमान आणि रा.स्व.संघाचे ख्रिस्ती असे असतात.

हे सगळं असलं, तरी मोदी जे काही करत आहेत त्याने प्रचंड अनागोंदी निर्माण होतेय आणि मोदींना प्रस्तुत राहण्यासाठी केवळ आणखी काही पिढ्या त्यांचे स्मरण कार्यक्रम करावे लागतील. वाजपेयींप्रमाणे मोदींनाही ते स्मरणात ठेवतील– वाजपेयी निरुपयोगी होते; पण वाजपेयी थोर सज्जन होते, असं आता ते म्हणत आहेत!

मोदी अतिशय दयनीय अवस्थेतील पराभूत ओबीसी ठरणार आहेत आणि मागासवर्गीयांना या छायेत दीर्घ काळ वावरावं लागेल. मोदींची स्मृती वारंवार जागी होत राहील. मोदी ब्राह्मणी मूल्यांचं प्रतिनिधित्व कसं करतात, याबद्दल कोणीच बोलत नाही. त्यांच्याबद्दलचा निवाडा जातीय मूल्यांद्वारे व्हावा, असं वाटत असल्यामुळे ते मोदी ओबीसी असल्याचं फक्त बोलत राहतात.

(भाग ३ पुढील अंकात)

अनुवाद : प्रभाकर पानवलकर

**सूरज येंगडे,** अमेरिका
suraj.yengde@gmail.com

**टीप :**

9. https://www.education.gov.in/sites/uploadšfiles/mhrd/files/sacharšcomm.pdf

(‘बॉर्डरलाइन्स’ या संकेतस्थळावर २३ नोव्हेंबर २०२० रोजी प्रकाशित झालेल्या **शौना रॉड्रीग्ज** यांनी घेतलेल्या मुलाखतीचं हे मराठी भाषांतर आहे. इंग्रजीतील मुलाखतीचा दुवा : https://www.borderlines-cssaame.org/posts/2020/11/23/dalit-is-the-new-political-and-epistemic-horizon-an-interview-with-suraj-yengde.)

सुहास पळशीकर

# लोकशाहीचा विस्तार आणि ओहोटी

(लोकशाहीचे अर्थ कसे समजून घ्यायचे आणि त्या अर्थांमध्ये कोणते किचकट प्रश्न गुंतलेले आहेत, ते आधीच्या भागात पहिले.) वेगवेगळ्या प्रकारे लोकशाहीचे अर्थ सांगत-सांगत लोकशाहीचा जो आधुनिक काळात विस्तार झाला, त्याची गोष्ट काहीशी उत्साहवर्धक, स्फूर्तिदायक आणि आनंद देणारी आहे. लोकशाहीच्या आधुनिक काळातल्या उदयानंतरच्या विकासाला सुरुवात तशी खूप उशिरा झाली. सुरुवात कुठून झाली, हेही कळणं खरं अवघड आहे. मॅग्नाकार्टापासून सुरुवात झाली, असं मानतात, परंतु त्याच्यानंतर इंग्लंडमध्ये आनंदी आनंद होता. तिथे काही लोकशाही नव्हती आणि त्यामुळे अनेक शतकांचा प्रदीर्घ काळ असा गेला की, धडपड चाललेली होती पण लोकशाही अद्याप अस्तित्वात यायची होती. किंबहुना, इंग्लंडमधली लोकशाही जर बघायला लागलो तर खरं तर तुम्हाला थेट एकोणिसाव्या शतकात यावं लागेल. १८३२ चा रिफॉर्म ॲक्ट. याच्याआधी इंग्लंडमध्ये लोकशाही होती, पण ती मोडकी-तोडकी होती. त्याच्या अगोदर लोकशाहीचा बिगुल जर कोणी वाजविला असेल, तर तो फ्रेंच आणि अमेरिकन राज्यक्रांत्यांमधून वाजविला गेला, म्हणून भारतातल्या अनेक स्वातंत्र्यवाद्यांवर फ्रेंच आणि अमेरिकन राज्यक्रांत्यांचा वैचारिक प्रभाव राहिलेला आहे. म्हणजे १८ व्या शतकापासून किंवा खरं तर १८ व्या शतकाच्यासुद्धा शेवटी-शेवटी लोकशाहीच्या या आधुनिक प्रवासाला सुरुवात झाली. तो प्रवास खडतर होता.

**विसाव्या शतकातला विस्तार**

१९ व्या शतकात पुढे फारसे काही घडले नाही. त्यातल्या त्यात इंग्लंडमध्ये लोकशाहीला संस्थात्मक स्वरूप येत गेले. म्हणून नेहमी ज्याची जाहिरात केली जाते, नेहमी ज्याचा उदघोष केला जातो- तो टप्पा म्हणजे विसावे शतक. ते लोकशाहीसाठी महत्त्वाचे मानले जाते. एका अर्थाने, विसावे शतक हे लोकशाहीचे होते. विसाव्या

एकविसाव्या शतकामध्ये अडचणीची गोष्ट निर्माण झालेली दिसते ती अशी- रशिया जिथे लोकशाही आल्यामुळे तिच्या विस्ताराला विसाव्या शतकात चालना मिळाली, तिथे लोकशाहीचा बँडबाजा वाजला. टगेगिरी, गुंडगिरी करणाऱ्या लोकप्रिय नेत्याने सर्व लोकशाही घशात टाकली. पूर्व युरोपात हंगेरीमध्येसुद्धा अशाच प्रकारे लोकशाहीचं विसर्जन करण्यात आलेलं दिसतं. तिकडे अमेरिका खंडामध्ये मोठा लोकशाहीवादी देश असलेल्या देशांपैकी एक म्हणजे ब्राझील, जिथे लोकशाहीचा संकोच करण्याचे प्रयत्न चालू आहेत. तुर्कस्तानात लोकशाहीचा संकोच होतोय, हे प्रसिद्धच आहे. फिलिपाइन्समध्ये लोकप्रिय नेत्याच्या चरणी लोकशाही वाहून टाकली गेली आहेच. निवडणुकीचा निकाल मान्य नाही म्हणून हटवादीपणा अध्यक्षामुळे त्याच्या समर्थक टोळ्यांनी थेट कायदे मंडळावर हल्ला केला ही अपूर्व गोष्ट कल्पनेतली आहे!

शतकाच्या सुरुवातीला युरोपात छोटे-छोटे समाज लोकशाहीवादी बनले. ते कसे बनले याचा इतिहास जर पाहिला, तर तो गमतीचा आहे. ते समाज मुळात वेगवेगळ्या साम्राज्यांमधून बाहेर पडून स्वत्व शोधायला लागले. कुणी इटालियन इटलीचं, तर कुणी फ्रेंच फ्रान्सचं स्वत्व शोधायला लागला. मागे वळून आजच्या भाषेत जर आपण बोलायला लागलो तर असं म्हणता येईल की, राष्ट्र आणि लोकशाही यांची अशा रीतीने हातात हात घालून वाटचाल सुरू झाली. समाज जेव्हा त्यांचं स्वत्व शोधायला लागले, तेव्हा त्या समाजांना आपल्या स्वत्वामध्येच आणखी एक स्वत्व सापडलं, ते म्हणजे, स्वतःचं नियंत्रण स्वतःच करायला पाहिजे. त्यातून लोकशाहीच्या विकासाला विसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये सुरुवात झाली. पाहिजे तर तुम्ही त्याला लोकशाहीची लाट असं म्हणा.

त्याच्यानंतर विसाव्या शतकाच्या मध्यावरती नव-स्वतंत्र अनेक देशांनी- म्हणजे वासाहतिक देश- लोकशाही स्वीकारली. त्यातल्या अनेकांमध्ये लोकशाहीचा झटकन पराभवही झाला. तिथं लोकशाही टिकविण्यासाठीचे अनेक लढेही झाले, पण ही दुसरी लाट होती. कारण एका अर्थानं हे लोकशाहीचं सीमोल्लंघन होतं. जगाच्या नकाशामध्ये जर तुम्ही पाहिलंत तर ज्याला दक्षिण गोलार्ध असं म्हणता येईल, तिथे लोकशाहीचा शिरकाव हा विसाव्या शतकाच्या मध्यावर झाला. जुन्या भाषेत बोलायचं झाल्यास पूर्व-पश्चिम भाषेमध्ये पूर्वेकडे हा शिरकाव झाला, असंही म्हणता येईल. त्याच्यानंतर तिसरी लाट म्हणता येईल, ती लाट अशी नव्हती, पण आपण तिसरा टप्पा म्हणू या; तो म्हणजे सोव्हिएत युनियनचा पाडाव व्हायच्या सुमाराला आणि सोव्हिएत मॉडेलचा पाडाव झाला त्या वेळेला एक नवा युरोप- पूर्व युरोप अस्तित्वात आला, ज्याला पुन्हा एकदा उर्वरित युरोपाप्रमाणे लोकशाहीच्या दिशेने जाण्याची प्रेरणा मिळाली. खुद्द रशियालासुद्धा ती काही प्रमाणात मिळाली.

**शतकांच्या संधिकाळातला गुंता**

चौथा टप्पा गुंतागुंतीचा आहे. म्हणजे, हा चौथा टप्पा होता की नव्हता, असाही प्रश्न कदाचित काही जण विचारतील. तो विसाव्या शतकाच्या शेवटी-शेवटी सुरू झाला. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीलाही तो चालू होता. त्याच्यामध्ये कोणकोणते देश घेता येतील? उदाहरणार्थ- तुम्हाला त्याच्यामध्ये पाकिस्तानमधली "Movement for Restoration of Democracy' ही चळवळ घेता येईल. तिच्यातून पाकिस्तानात लष्करी राजवट अखेरीस बाजूला करता आली आणि लोकशाही पुनःस्थापित करण्याचा एक प्रयत्न पुन्हा एकदा करता आला. हा चौथा टप्पा १९९० ते २०१० या पंधरा-वीस वर्षांच्या काळामध्ये आला, असं आपल्याला म्हणता येईल. या चौथ्या टप्प्यातच चीनमध्ये काही तरी होतंय की काय, अशी एक आशा निर्माण झाली. चीनमधल्या विद्यार्थ्यांनी उठाव केला. रणगाड्याखाली त्यांना चिरडलं गेलं. (Tiananmen Square ची घडामोड, १९८९). याच टप्प्यावरती नेपाळमध्ये अखेरीस एकविसाव्या शतकाच्या आरंभी राजेशाही संपूर्णपणे संपवून लोकशाही आणण्याचा प्रयत्न झाला. त्यांना त्याचं संविधान दीर्घ काळ लिहिता आलं नाही, पण राजेशाही मात्र गेली आणि नेपाळमध्ये पूर्ण लोकशाही आणण्याचा रस्ता मोकळा झाला. ह्याच टप्प्यावरती 'Arab Spring' असं ज्याला म्हटलं गेलं तो, जणू काही लोकशाहीचा वसंत तिथे फुलणार अशी एक इंटरनेट हवा तयार केली गेली. हा काळ इंटरनेटचा होता. त्यामुळं जे खोटं असतं ते खरं, जे व्हर्च्युल असतं ते रिअल- असं मानण्याच्या या काळामध्ये अरब समाजांमध्येसुद्धा लोकशाही येईल, असं काही जणांना अचानकपणे त्या वेळेला वाटायला लागलं. तिथल्या काही देशांमध्ये लोकशाही आलीदेखील. काही काळ आली, काही काळ टिकली, परत अंतर्धान पावली. इंडोनेशिया (१९९८), म्यानमार (२००८-२०१०) यांसारख्या देशांमध्ये परत एकदा लोकशाही आणण्याचे प्रयत्न झाले, तेही या टप्प्यावर झाले आणि त्या अर्थाने हा गुंतागुंतीचा पण पूर्ण यशस्वी न ठरलेला असा टप्पा होता. पण तो महत्त्वाचा होता, याचं कारण भौगोलिक दृष्ट्या लोकशाही सगळीकडे पसरण्याचा आणि त्याहीपेक्षा लोकशाही नावाचं मूल्य प्रस्थापित होण्याचा हा काळ होता. (ते झाल्यामुळेच फुकुयामा यांनी आपला एके काळी गाजलेला End of History चा विचार मांडला : उदारमतवादी लोकशाहीला आता पर्याय उरला नाही, हा मुद्दा त्याच्या मुळाशी होता.)

**मर्यादा**

त्या सर्वांच्या तपशिलात इथे आपण जाणार नाही, पण दोन गमतीच्या गोष्टी लक्षात ठेवून मग आपण पुढे जाऊ. विसाव्या शतकात लोकशाहीचा हा जो विस्तार झाला,

त्याला दोन तळटीपा आहेत. त्यातली पहिली अशी की- टीचभर समाजांच्या अनुभवाने आधी लोकशाहीचे जे सिद्धांत तयार केले गेले होते ते खोटे पाडून, त्या सिद्धांतांप्रमाणे जिथं लोकशाही येऊ शकणार नाही असं म्हटलं जात होतं, अशा समाजांमध्ये लोकशाही आणण्याचे प्रयोग विसाव्या शतकाच्या मध्यापासून सुरू झाले. तोपर्यंत पाश्चात्त्य लोकशाही सिद्धांतीकरण असं होतं की, लोकशाही टप्प्या-टप्प्यांनी येते. शिक्षणाचा प्रसार आणि काही प्रमाणात आर्थिक प्रगती झाल्यानंतर लोकशाही येते. गरिबी आणि लोकशाही एकत्र नंदू शकत नाही. हा प्रत्येक सिद्धांत चुकीचा ठरवत विसाव्या शतकाच्या मध्यापासून लोकशाहीने जगभर प्रवेश केला. ही एक फूटनोट जाता-जाता म्हणून लक्षात ठेवली पाहिजे. याचं कारण लोकशाहीचे सिद्धांत कोणते, ते कोणत्या आधारावर तयार झाले, हे प्रश्न लोकशाहीच्या आजच्या संदर्भात अंतिमतः महत्त्वाचे आहेत. हे युरोपातले जे छोटे-छोटे समाज आहेत, ते म्हणजे जग नसतं. तरीही त्यांच्या आधारावरती त्या काळात जागतिक सिद्धांत बांधले गेले होते. आता जे सिद्धांत तयार होतात- गेल्या तीस-चाळीस वर्षांमध्ये- ते जगातला वेगळा अनुभव लक्षात घेऊन तौलनिक अभ्यास करणारे लोक नवे सिद्धांत मांडतात. दुसरी फूटनोट आहे, ती आपली जाता-जाता त्रास देण्यासाठी म्हणून... ती तुम्हाला नाही तर आपल्याला प्रिय असलेल्या अमेरिका नावाच्या देशाला त्रास देण्यासाठी. ती अशी- लोकशाही निर्यात करता येत नाही, हे विसाव्या शतकात सगळ्यांना कळलं. बऱ्याच गोष्टी अमेरिका त्या काळात निर्यात करत होती आणि त्याबरोबर लोकशाहीसुद्धा निर्यात करता येईल, अशी त्यांची समजूत होती. दुसऱ्यांना लोकशाही शिकवता येईल, असं वाटत होतं. अशी लोकशाही शिकवता येत नाही. लोकशाही स्वतःला हवं असेल तर समाज शिकतो, हा विसाव्या शतकाचा फार मोठा अनुभव आहे. (आणि मूळ भाषणाचे संपादन करीत असताना अशी वेळ येऊन ठेपली की, निर्यात करून करून अमेरिकेतील लोकशाहीचा पुरवठा एकदम आटला!)

### लोकशाहीची सार्वत्रिक कोंडी

एकूण विसाव्या शतकात लोकशाहीचा व्यवहार, तिची स्वीकारार्हता आणि तिचे सिद्धान्त याचा विस्तार झाला. एवढा सगळा आनंददायक अनुभव पाठीशी असूनसुद्धा एकविसावं शतक जेव्हा सुरू झालं, तेव्हा मात्र लोकशाहीचे सगळे प्रयोग यशस्वी झालेच, असं आपल्याला काही म्हणता येणार नाही. हे काहीसं अनपेक्षित होतं. याचं कारण असं की- सगळ्या जगभर लोकशाहीचा प्रवास चालू होता, विकास-विस्तार होत होता आणि जणू काही आता लोकशाही प्रस्थापित झाली असं वाटायच्या काळात तिला काही धक्के निर्माण झाले. म्हणून एकविसावं शतक महत्त्वाचं आहे. त्यावरून घेण्याचा धडा असा की, लोकशाही आली की ती मुक्कामाला येतेच असं नाही. ती टिकवावी लागते. काय झालंय नेमकं आत्ता एकविसाव्या शतकामध्ये? एक तर तुम्हाला माहितीय की क्युबासारखे, उत्तर कोरियासारखे किंवा चीनसारखे देश आहेत- ज्या देशांनी लोकशाहीकडे अजिबात कुतूहलानेदेखील पाहायला नाकारलेलं दिसतंय. चीनचा मी मुद्दाम उल्लेख अशाकरता करतो आहे की, चीन ही येत्या काळातील जागतिक आर्थिक महासत्ता असेल. जेव्हा महासत्ताच बिगर-लोकशाहीवादी असेल, तेव्हा जगात लोकशाहीला पोषक वातावरण कसं राहील, असा प्रश्न एकविसाव्या शतकात

कामाच्या ठिकाणी काम करावं. ते बरोबर आहे. पण एका अर्थाने सात्त्विक दिसणाऱ्या या प्रतिपदानाबरोबर जे तामस प्रतिपादन आपसूक येतं ते असं- लोकांवर लक्ष ठेवता येतं, ते करण्यात काही गैर नाही आणि लक्ष ठेवण्यासाठी तुम्हाला चौकाचौकात पोलीस उभे करावे लागत नाहीत. तंत्रज्ञान हे तुमचे पोलीस बनतं, तंत्रज्ञान हा तुमचा एक्झिक्युशनर बनतो, तंत्रज्ञान हीच तुमची विचारसारणी बनते आणि त्यामुळे तंत्रज्ञान हा लोकशाहीचा एक विरोधक बनतो. हे आपल्या सगळ्यांचा डोळ्यांदेखत गेल्या पंधरा-वीस वर्षांत अत्यंत वेगाने घडले आहे. ही सर्व टेक्नॉलॉजी घडत होती, आकाराला येत होती आणि तिच्याबद्दल आपण तेव्हा बेसावधपणा बाळगल्यामुळे किंवा बावळटपणा स्वीकारल्यामुळे ह्या टेक्नॉलॉजीमधून चोरांना पकडण्याबरोबर सावांनादेखील पकडलं जाऊ शकतं, याचं भान आपल्याला राहिलं नाही. हे जगभर झालेलं आहे.

आपल्यापुढे 'आ' वासून उभा आहे. खेरीज, लोकशाही विरुद्ध असलेले छोटे-छोटे लष्करशहा, हुकूमशहा हे यादी करायला लागले की आफ्रिकेतील किंवा दक्षिण अमेरिकेतील सापडतील.

एकविसाव्या शतकामध्ये दुसरी अडचणीची गोष्ट निर्माण झालेली दिसते ती अशी- रशिया जिथे लोकशाही आल्यामुळे तिच्या विस्ताराला विसाव्या शतकात चालना मिळाली, तिथे लोकशाहीचा बँडबाजा वाजला. टगेगिरी करणाऱ्या, गुंडगिरी करणाऱ्या पण लोकप्रिय असणाऱ्या एका नेत्याने सगळी लोकशाही घशात टाकली. आता अलीकडे पूर्व युरोपात हंगेरीमध्येसुद्धा अशाच प्रकारे लोकशाहीचं विसर्जन करण्यात आलेलं दिसतं. तिकडे अमेरिका खंडामध्ये मोठा लोकशाहीवादी देश असलेल्या देशांपैकी एक म्हणजे ब्राझील, जिथे लोकशाहीचा संकोच करण्याचे प्रयत्न चालू आहेत. तुर्कस्तानात लोकशाहीचा संकोच होतोय, हे प्रसिद्धच आहे. फिलिपाइन्समध्ये लोकप्रिय नेत्याच्या चरणी लोकशाही वाहून टाकली गेली आहेच. आणि निवडणुकीचा निकाल मान्य नाही म्हणून हटवादीपणा करणाऱ्या अजब अध्यक्षामुळे अमेरिकेत त्याच्या समर्थक टोळ्यांनी थेट कायदे मंडळावर हल्ला केला ही अपूर्व गोष्ट कल्पनेतली नाही, तर ६-७ जानेवारी २०२१ रोजीची आहे!

म्हणजे, जणू काही जगाच्या वेगवेगळ्या भागांतून लोकशाहीची कोंडी एकविसाव्या शतकात अचानकपणे सुरू झाली आहे का, असा प्रश्न यातून उपस्थित होतो. भारताच्या शेजारील देश श्रीलंका, तिथे आधी यादवीचं निमित्त करून त्यांनी लोकशाहीमध्ये अनेक तडजोडी केल्या आणि आता अलीकडे पुन्हा तिथे जे सरकार आलेलं आहे, ते लोकशाहीबद्दल फार प्रेम बाळगणारे नाही. कौटुंबिक टगेगिरी हा त्याचा आधार आहे. शांततेचं नोबल मिळवणाऱ्या राज्यकर्त्यांच्या देशामध्ये (म्यानमार) निवडून आलेल्या नेत्या अंतर्गत लोकशाहीबद्दल फार उत्साही नाहीत- त्यांचं मानवाधिकाराबद्दलचं रेकॉर्ड फारसं चांगलं नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर भारतामध्ये अशी तक्रार अनेक जण गेली दहा वर्षे करताहेत- काही जण तीस वर्षं ती तक्रार करताहेत की, भारतातील लोकशाही ही फार कच्ची आहे किंवा कमकुवत आहे. लोकप्रिय नेतृत्वाच्या चरणी संस्था आणि त्यांची स्वायत्तता वाहून टाकण्याची सवय भारताच्या लोकशाहीत दिसते.

म्हणजे, 'जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये वेगवेगळ्या कारणांनी आणि वेगवेगळ्या प्रमाणात लोकशाहीचा संकोच होतोय का?' असा प्रश्न गेल्या पाच-सात वर्षांत अचानक निर्माण झाला. हा प्रश्न गंभीर ठरण्याचं कारण गमतीशीर आहे. अमेरिकेमध्ये रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प हे जेव्हा अध्यक्ष म्हणून निवडून आले, तेव्हा तिथले अभ्यासक अचानक जागे झाले आणि त्यांच्या असं लक्षात यायला लागलं की- केवळ निवडणुकीत एक पक्ष जाऊन दुसरा येतो, तसं हे सत्तांतर नाहीये, त्यापेक्षा काही तरी वेगळं आहे. लोकशाहीप्रणाली या कशा संकुचित होतात याची जी चर्चा आहे, तिला जगभर एवढी वाचा फुटण्याचं एक कारण : ट्रम्प यांनी तिथे जे काही केलं, ज्या पद्धतीने संस्थांची मोडतोड केली, ज्या पद्धतीने प्रथा मोडल्या, ज्या पद्धतीने अमेरिकेच्या संविधानाचं स्पिरिट न पाळण्याचा बाणा त्यांनी बाळगला, त्यात आहे. त्याच्यातून अमेरिकेच्या अभ्यासकांच्या असं लक्षात आलं की, जर अमेरिकेमध्ये दोनशे वर्षांनंतर हे घडू शकतं तर जगामध्ये हे कुठेही घडू शकेल आणि त्यांतून recession म्हणजे लोकशाहीला लागलेली ओहोटी असा एक शब्दप्रयोग आता वापरला जायला लागलेला आहे.

अमेरिकेत तिथल्या तज्ज्ञांनी जी भीती व्यक्त केली, तीच भारतात देखील व्यक्त केली तर मात्र अशा लोकांच्या नशिबी दूरदर्शीपणा न येता सार्वत्रिक नालस्ती येते. त्यामुळे लोकशाहीच्या कोंडीची खरे तर जास्त बोचरी जाणीव होऊ शकेल.

### रक्त-मांस आटलेली लोकशाही

लोकशाहीची ओहोटी किंवा लोकशाहीला लागलेली ओहोटी म्हणजे काय? ओहोटीचा पहिला अर्थ म्हणजे, लोकशाहीचा जवळपास सगळा सांगाडा कायम राहतो आणि ज्याला इंग्रजीमध्ये ब्लड अँड फ्लेश (रक्तमांस) म्हणतात- लोकशाहीचा जीव जो आहे, तो नाहीसा व्हायला लागतो, तो जीव कमी-कमी व्हायला लागतो. स्पिरिट म्हणा, जीव म्हणा, ब्लड अँड फ्लेश म्हणा! पण म्हणजे नक्की काय घडतं? तर, लोकशाहीमध्ये ज्या संस्था वगैरे असतात त्या तशाच राहतात; पण त्यांनी लोकशाहीत जसं काम करावं अशी अपेक्षा केली जाते, तसं त्या करत नाहीत. किंवा लोकशाहीचं जे एक सार असतं- तुम्ही आणि मी एकमेकांच्या विरुद्ध वेगवेगळे युक्तिवाद करू शकतो, मी

सत्ताधाऱ्यांचा निषेध करू शकतो. हे claims आणि counter-claims म्हणजे दावे आणि प्रतिदावे करण्याचं राजकारण आहे, ते जर तुम्ही नाहीसं करायला लागलात तर लोकशाहीचा सांगडा राहील आणि तिचा जीव किंवा आत्मा- जे काही तुम्हाला म्हणायचं असेल, तो लयाला जाईल.

वर जी उदाहरणं आपण पाहिली, त्यात हंगेरी असेल, तुर्कस्तान असेल, ब्राझील असेल; कुठेही उठाव झालेला नाही. १९६०चं दशक हे लोकशाहीविरोधी होणाऱ्या उठावांचं होतं. पण ही देशांची यादी आपण बघतोय, त्याच्यातील कुठल्याही देशांत उठाव झाला नाही आणि तरी लोकशाहीचा संकोच मात्र झाला. सैद्धांतिक पातळीवर याची एक मांडणी अमेरिकेच्या संदर्भामध्ये Levitske आणि Ziblat या नावाच्या दोन अभ्यासकांनी २०१८ च्या How Democracies Die या पुस्तकामध्ये केलेली आहे. आता उठावांनी लोकशाही मरत नाही, तर आतून तिचा जीव जातो, ती सुकत जाते, तिच्यामध्ये जीव शिल्लक राहत नाही. हे जे आतून घडणं आहे, ते आत्ताच्या लोकशाहीच्या ओहोटीचं वैशिष्ट्य आहे. (अर्थात त्यांचा सिद्धान्त अपुरा असू शकतो, कारण एकदा संस्था आतून जीव गमावून बसल्या की मग त्यांच्याविरुद्ध उठाव करून त्या फेकून देता येतात.)

## अधिकृत बहिष्कृती

दुसरं वैशिष्ट्य म्हणजे- आधी मी जे म्हणालो की, लोकशाहीच्या कल्पनेची कक्षा रुंदावते, त्याच्या नेमकी उलट प्रक्रिया घडून येते. लोकशाही निर्माण होऊन वाढली याचं कारण म्हणजे लोक नावाची गोष्ट विस्तारत गेली : बायका नव्हत्या, त्या लोकशाहीतील लोकांमध्ये समाविष्ट झाल्या. गुलाम नव्हते, काळे नव्हते ते आले. आता त्याच्या नेमकी उलट प्रक्रिया घडते आहे. अनेक देशांमध्ये हा लोकशाहीचा सांगाडा कोणाला तरी वगळण्यावरती महत्त्व देतो किंवा भर देतो. म्हणजे inclusion च्या- समावेश किंवा अंतर्भावा ऐवजी वगळण्याची प्रक्रिया घडते आहे. लोक नावाची संकल्पना संकुचित करणं हे लोकशाहीच्या ओहोटीचं दुसरं लक्षण आहे. त्याच्याबद्दलचा एक सिद्धान्त सॅमी डोहर नावाच्या एका इस्रायली अभ्यासकाने मांडलेला आहे, इस्रायलचंच उदाहरण घेऊ. तिथे औपचारिकपणेच ज्यू आणि बिगर ज्यू नागरिकांमध्ये फरक केला जातो. त्यामुळे लोकशाही मर्यादित होते. त्याने त्याला एथनिक डेमोक्रॅसी असं नाव दिलं आहे.

## आर्थिक संकटाची सावली

तिसरं आत्ताच्या लोकशाहीच्या अनुभवाशी जोडून येणारं वैशिष्ट्य म्हणजे, एका प्रदीर्घ आर्थिक संकटाच्या सावलीमध्ये ही ओहोटी येतीय. हे अचानक नाही झालेलं. याला कुठे तरी, कोणती तरी सामाजिक-आर्थिक कारणं आहेत. आणि त्यातलं एक कारण म्हणजे- थेट न दिसणारी, पटकन लक्षात न येणारी अशी आर्थिक संकटांची मालिका युरोप, अमेरिका किंवा आशिया खंडात अनेक ठिकाणी चालू राहिली आणि त्या आर्थिक संकटाच्या सावलीमध्ये लोकशाहीपासून लोक दूर जायला लागले आहेत. ग्रीस हे त्याचं एक उदाहरण म्हणून आपल्याला बघता येईल. इटली, इंग्लंड ही त्याची आणखीन उदाहरणं आहेत; ज्या देशांमध्ये लोकशाही आहे, निवडणुका होतात, सगळं रीतसर होतं, पण त्या लोकशाहीमधील जीव कमी-कमी व्हायला लागलाय. याचं कारण कदाचित ही आर्थिक संकटांची चाललेली मालिका तिच्या संदर्भामध्ये ते असणार.

## नवराष्ट्रवाद

चौथं कारण : मघाशी मी ज्याचा उल्लेख केला की, युरोपात मुळात राष्ट्र आणि लोकशाही हातात हात घालून पुढे आली, नेमकी त्याच्या विरुद्ध प्रक्रिया आत्ता चालू आहे. म्हणजे, राष्ट्र आणि लोकशाही यांच्यामध्ये द्वंद्व निर्माण करण्याचे प्रयत्न होतायत. राष्ट्राचं प्रेम असेल, तर लोकशाहीबद्दल कमी बोला, असं सांगितल जातं. सुसंस्कृत भाषेत त्याचं उदाहरण पाहायचं झालं, तर ब्रेक्झिट हे त्याचं उदाहरण आहे. थोडसं घोषवाक्याच्या स्वरूपात त्याचं उदाहरण पाहायचं असेल तर 'मेकिंग अमेरिका ग्रेट अगेन' हे आहे. अगदीच गावंढळ उदाहरण पाहिजे असेल तर 'न्यू पाकिस्तान' ही इम्रान खानची घोषणा. आपणही न्यू होतो आहोतच. या सगळ्या घोषणांमध्ये राष्ट्र व लोकशाही यांच्यामध्ये एक द्वंद्व पेरलं जातं आणि असं सांगितलं जातं की, राष्ट्र हे मूल्य वर आणि लोकशाही हे मूल्य खाली आहे. राष्ट्र सांभाळा, लोकशाही वगैरे नंतर पाहू. ही जी मूल्यांची उतरंड नव्याने तयार होतीय, हे आत्ताच्या लोकशाहीच्या ओहोटीमधलं एक महत्त्वाचं लक्षण आहे. मग ते

तुर्कस्तानमध्ये असो की अन्य कुठं. जिथं हे होतंय, तिथे तुम्हाला असं दिसेल की, लोकशाहीला ओहोटी लागायला राष्ट्र आणि लोकशाही यातील द्वंद्व कारणीभूत होतं.

**तंत्रज्ञानातून नियंत्रण**

आणि शेवटची गोष्ट- जी आपल्या नकळत पण डोळ्यांदेखत घडलेली आहे. ती म्हणजे- एक technofreindly किंवा तंत्रस्नेही अशा पद्धतीने राज्यसंस्थेचं नवस्वरूप उदयाला येतंय सगळ्या देशांमध्ये आणि जे देश लोकशाहीवादी असं स्वतःला म्हणवतात किंवा आपण ज्यांना लोकशाही म्हणू, तेही या अपवाद नाहीत. या किंवा तंत्रस्नेही पद्धतीने काय केलं जातंय, तर लोकांचा खासगीपणा संपुष्टात आणण्याचे प्रयत्न केले जातात. हा खासगीपणा संपवून लोकांवर सतत नजर ठेवण्याचे प्रयत्न केले जात आहेत. माझी ही चिकित्सा सरसकट तंत्रज्ञानाबद्दल नाही, तर भोळेपणाने किंवा मतलबी दृष्टीने तंत्रज्ञान वापरून, शासन-व्यवहार करण्याचे नाटक करीत प्रत्यक्षात नियंत्रणाची साखळी म्हणून तंत्रज्ञान वापरण्यापुरता इथे मर्यादित मुद्दा आहे.

हे शिकतोय कोणाकडून आपण? तर, चीनकडून शिकतोय. असा एक आर्थिक महासत्ता असलेला देश- जो सातत्याने आणि अत्यंत निश्चयपूर्वक लोकशाहीच्या विरुद्ध राहिलेला आहे. त्या देशाने नियंत्रणाचे हे तंत्रज्ञान विकसित करून, रस्त्याने जाणाऱ्या लोकांच्या फेशियल रेकग्निशनची टेक्नॉलॉजी वापरून, नंतर त्यांना पासपोर्ट नाकारणं किंवा व्हिसा नाकारणं हे प्रयोग केलेले आहेत. फेशियल रेकग्निशनचं तंत्रज्ञान वापरून अशा प्रकारे कायदे मोडणाऱ्यांना पकडण्याचं निमित्त करून चीनमध्ये सरकारचे विरोधक शोधण्याचे प्रयोग सुरू झालेले आहेत. हे आपण लक्षात घेतलं, तर मग इंग्लंडमध्ये किंवा अमेरिकेमध्ये कशा प्रकारे लोकांवर लक्ष ठेवलं जातं याच्या बारीक-सारीक उदाहरणांची यादी करण्याची गरज उरणार नाही. याला surveillance state म्हणतात. मी मराठीत याच्यासाठी 'पाळतखोर राज्यसंस्था' असा शब्दप्रयोग केला आहे. सगळ्या राज्यसंस्था या पाळत ठेवण्याच्या कामामध्ये प्रवीण व्हायला लागल्या आहेत.

याचं कारण असं की, सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे लोकशाहीचा मूलभूत मुद्दा हा अधिकारांना मर्यादित ठेवण्याचा आहे. पण तंत्रज्ञानामुळे आता हे अधिकार किती, कोण, कसं वापरतंय याच्यावरचं नागरिक म्हणून माझं नियंत्रण संपलं. फोरम फॉर इंटरनेट फ्रीडमसारख्या जगभरातल्या संघटनांपासून अनेक मानवी अधिकार संघटना हे प्रयत्न करतायत की, अशा प्रकारची पाळत ठेवली जाऊ नये. पण टेहेळणीचे तंत्र इतके पुढे गेले आहे की, त्यामुळे छोट्या-छोट्या उद्योगांमध्ये किंवा कारखान्यांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये cctv कॅमेरे बसवून कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवता येतं, तर राज्यसंस्थेच्या ताकदीचा आपण सहज अंदाज करू शकतो.

तुम्ही असं म्हणाल की, कामाच्या ठिकाणी काम करावं. ते बरोबर आहे. पण एका अर्थाने सात्त्विक दिसणाऱ्या या प्रतिपदानाबरोबर जे तामस प्रतिपादन आपसूक येतं ते असं- लोकांवर लक्ष ठेवता येतं, ते करण्यात काही गैर नाही आणि लक्ष ठेवण्यासाठी तुम्हाला चौकाचौकात पोलीस उभे करावे लागत नाहीत. तंत्रज्ञान हे तुमचे पोलीस बनतं, तंत्रज्ञान हा तुमचा एक्झिक्युशनर बनतो, तंत्रज्ञान हीच तुमची विचारसारणी बनते आणि त्यामुळे तंत्रज्ञान हा लोकशाहीचा एक विरोधक बनतो. हे आपल्या सगळ्यांचा डोळ्यांदेखत गेल्या पंधरा-वीस वर्षांत अत्यंत वेगाने घडले आहे. ही सर्व टेक्नॉलॉजी घडत होती, आकाराला येत होती आणि तिच्याबद्दल आपण तेव्हा बेसावधपणा बाळगल्यामुळे किंवा बावळटपणा स्वीकारल्यामुळे ह्या टेक्नॉलॉजीमधून चोरांना पकडण्याबरोबर सावांनादेखील पकडलं जाऊ शकतं, याचं भान आपल्याला राहिलं नाही. हे जगभर झालेलं आहे. टेक्नॉलॉजी आता भस्मासुराप्रमाणे डोक्यावर बसून स्वातंत्र्याची राख करते, हे लक्षात घेण्याची वेळ आली आहे; कदाचित निघून गेली आहे. त्यामुळे लोकशाहीला लागलेल्या ओहोटीच्या लक्षणांमध्ये हे आणखी एक लक्षण म्हणून आपण लक्षात ठेवलं पाहिजे.

(भाग ३ पुढील अंकात)

**सुहास पळशीकर,** पुणे
suhaspalshikar@gmail.com

(दि.२ डिसेंबर २०२० रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागात सुहास पळशीकर यांनी लोकमान्य टिळक स्मृतिव्याख्यान दिले. संपूर्ण भाषणाचे रेकॉर्डिंगवरून **शब्दांकन** करण्याचे काम **सतीशकुमार पडोळकर,** हिन्दी विषयाचे व्याख्याते, लोणीकाळभोर यांनी केले आहे. ते भाषण लेखस्वरूपात प्रसिद्ध करताना लेखकाने त्याचे संपादन करून आवश्यकतेप्रमाणे त्यात नव्याने भरदेखील घातली आहे.)

जयप्रकाश सावंत

# ऑर्वेलच्या तीन गोष्टी

ऑर्वेलच्या 'रोड टू विगन पीअर' या पुस्तकात एक आत्मचरित्रात्मक प्रकरण आहे, ज्यात त्याने इंग्रज समाजातल्या वर्ग-अहंकाराविषयी विस्ताराने लिहिलंय. त्याला स्वतःला याचा प्रत्यय तो सहा वर्षांचा असल्यापासून येऊ लागला होता. ऑर्वेलच्या आईने त्याचे मित्र असलेल्या प्लंबरच्या मुलांबरोबर खेळायला त्यालामनाई केली होती. तो म्हणतो, 'या आधी लोहार, कोळी, गवंडी ही त्याची हीरो मंडळी होती : ती त्याला आवडणारी कामं करत आणि त्यांत त्याला लुडबूड करायलाही देत.' पण अचानक या प्रेमळ सोबत्यांपासून त्याला दूर करण्यात आलं. पांढरपेशांच्या जगात श्रमिक वर्गाविषयी- ते घाणेरडे असतात, अशुद्ध भाषा बोलतात, त्यांना वास येतो- असे समज लहानपणापासून मुलांच्या मनावर बिंबवले जातात, त्यांचा ऑर्वेलच्या मनावर तो अगदी मोठा होईपर्यंत पगडा राहिला होता.

१. पहिला ट्रॅम्प-अनुभव

जॉर्ज ऑर्वेल बर्मातली इंडियन इंपीरियल पोलीसची नोकरी सोडून परत आल्यावर काही काळ लंडनमधल्या ट्रॅम्प्सच्या जगण्याचा अनुभव घेण्यासाठी त्यांच्यासोबत राहिला होता, हे सर्वांना माहीत आहे. पण एक आश्चर्यकारक योग म्हणजे, त्याला अशा प्रकारचा पहिला अनुभव वयाच्या १७ व्या वर्षी तो इटनमध्ये शिकत असताना घ्यावा लागला होता. तो शाळेच्या ऑफिसर्स ट्रेनिंग कॉर्प्सचं शिबिर संपवून सुट्टीसाठी घरी निघाला असताना अनपेक्षितपणे जे घडलं, त्याचा मजेदार वृत्तांत त्याने आपल्या स्टिव्हन रन्सिमन या मित्राला पत्राद्वारे कळवला आहे. १९२० च्या ऑगस्टमधल्या पत्रातला हा रोचक मजकूर :

प्रिय रन्सिमन

आज मला थोडा मोकळा वेळ मिळालाय, तेव्हा माझ्या मनात आलं की, एक हौशी ट्रॅम्प म्हणून मी केलेल्या माझ्या पहिल्या साहसाबद्दल तुला सांगायलाच हवं. बहुतेक सर्व भटक्यांप्रमाणे, हा अनुभव माझ्यावर लादला गेला होता. मी डेव्हनशायरमधल्या सीटन जंक्शन नावाच्या त्या रद्दड स्टेशनात पोचलो, तेव्हा मिनर्स- ज्याला तिथे गाडी बदलायची होती- तो माझ्या डब्याजवळ आला आणि म्हणाला, की ज्याने मिनर्सला त्याच्या डब्यातून प्रवास करण्यासाठी छळलं होतं, तो एक मूर्ख 'ऑपिडन'आता मला तिथे बोलवत होता.[१] मीसुद्धा तसा अनोळखी लोकांबरोबरच प्रवास करत होतो, म्हणून मी त्या डब्यात जाण्यासाठी बाहेर पडलो, तेवढ्यात गाडी सुरू झाली. आता धावती गाडी पकडायला दोन हात लागतात आणि किटबॅग, बेल्ट वगैरेमुळे माझ्याकडे एकच हात मोकळा होता. थोडक्यात सांगायचं तर, माझी गाडी सुटली. उशीर होईल म्हणून मी घरी तार पाठवली (जी दुसऱ्या दिवशी

पोचली). नंतर सुमारे अडीच तासांनी मला दुसरी गाडी मिळाली. प्लिमथ, नॉर्थ रोडला आल्यावर कळलं की, लुईला जायला त्या रात्री कुठलीही गाडी नव्हती.[२] इतक्या उशिरा फोन करणंही शक्य नव्हतं, पोस्ट ऑफिसं बंद झाली होती. मग मी माझ्या आर्थिक स्थितीचा आढावा घेतला. उरलेल्या प्रवासाचं भाडं सोडल्यास माझ्याकडे जास्तीचे साडेसात पेन्स होते. म्हणजे मी एक तर सहा पेन्स भाडं असलेल्या वायएमसीएमध्ये रात्र काढू शकत होतो, पण मग उपाशी राहायला लागलं असतं; किंवा काही तरी खाऊ शकत होतो, मात्र यात झोपायला जागा नव्हती.[३] मी दुसरा पर्याय निवडला. किटबॅग क्लोकरूममध्ये ठेवली आणि सहा पेन्सना बारा बनपाव विकत घेतले. रात्री साडेनऊ वाजता मी कुठल्या तरी शेतकऱ्याच्या शेतात चोरून घुसलो– तिथे काही झोपड्यांसारख्या घरांच्या रांगा होत्या आणि त्यांच्यामध्ये शेतं पसरलेली होती. त्या प्रकाशात मी माझ्या गणवेशामुळे येरझाऱ्या घालणाऱ्या एखाद्या सैनिकासारखा दिसत असेन. प्रवासात मला काही लोकांनी एवढ्यात कसं परत पाठवलं, याबद्दल विचारलंही होतं. शेवटी मी एका शेताच्या कोपऱ्यात असलेल्या एका वस्तीजवळ आसरा घेतला. मात्र मी थोडीशीही हालचाल केल्यावर आसपासचे सर्व कुत्रे भुंकायला लागले, तेव्हा मला आठवलं की, दुसऱ्याच्या शेतात झोपणाऱ्या व 'निराधार ठरणाऱ्या' व्यक्तींना सहसा चौदा दिवसांची सजा होते. त्या कोपऱ्यात आसरा घेण्यासाठी एक मोठं झाड होतं आणि लपून राहण्यासाठी काही झुडपं होती. पण थंडी असह्य होती आणि माझ्याकडे पांघरायला काही नव्हतं. मी टोपी उशाला घेतली, माझा लष्करी झगा अंगाभोवती आवळून घेतला आणि आडवा झालो. पण एक वाजेपर्यंत मी फक्त डुलक्या घेत होतो आणि थंडीने कुडकुडत होतो. मी जेव्हा माझ्या पोटऱ्यांवरच्या पट्ट्या पुन्हा नीट बांधून घेतल्या तेव्हा मला इतकी चांगली झोप लागली की, पहाटेची ४.२० ची पहिली गाडी एका तासाने चुकली. पुढच्या गाडीसाठी ७.४५ पर्यंत वाट बघायला लागली. जागा झालो तेव्हा माझे दात थंडीने कडकड वाजत होते. मी लुईला पोचलो तेव्हा भर उन्हात मला चार मैल चालावं लागलं. या साहसाचा मला खूप अभिमान वाटतो, पण असा अनुभव पुन्हा घ्यावासा नाही वाटत.

तुझा मित्र,
ई. ए. ब्लेअर

**२. भाषांतर**

नोकरी सोडून घरी परत आलेला ऑर्वेल काही काळ केवळ लेखनावर जगण्याचा प्रयत्न करून पाहत होता. त्याने लंडन–पॅरिसमधल्या अनुभवांवर पुस्तक लिहायला घेतलं होतं. 'अडेल्फी' नामक नियतकालिकात त्याचे लेख व परीक्षणं छापून येत होती. पण त्यातून मिळणारे पैसे उपजीविकेसाठी पुरेसे नव्हते. तेव्हा फ्रेंच कादंबऱ्यांची भाषांतरं करून काही पैसे मिळवण्याचा प्रयत्न त्याने या काळात केल्याचं त्याच्या पत्रांतून दिसून येतं. ऑर्वेलचा मित्र झालेला 'अडेल्फी'चा संपादक रिचर्ड रीस यानेही त्याला असं काम मिळण्यासाठी मदत केलेली दिसते.

ऑर्वेलचं या संदर्भातलं पहिलंच पत्र टी.एस. एलियटला आहे. एलियट या वेळी 'फेबर अँड फेबर' या प्रतिष्ठित प्रकाशनसंस्थेचा संचालक होता. दि.३० ऑक्टोबर १९३१ रोजी लिहिलेल्या या पत्राची सुरुवात, 'रिचर्ड रीस हे माझ्याबद्दल तुमच्याशी बोललेले असल्यामुळे हे पत्र वैयक्तिक पातळीवर लिहितोय,' अशी करून ऑर्वेल पुढे म्हणतो : 'नुकतीच मी जॅक रोबर्ती नामक लेखकाची'– la Belle de Nuit ही एक रोचक फ्रेंच कादंबरी वाचली. ही एका देहविक्रय करणाऱ्या स्त्रीची कहाणी आहे. तिच्या जगण्याचं खरंखुरं चित्रण करणारी म्हणता येईल अशी आणि अतिशय निष्ठुरपणे सांगितलेली. ती अश्लील विषयाचा केवळ धंदेवाईक उद्देशाने गैरवापर करणारी कादंबरी नाहीय. मला ती इंग्रजीत भाषांतरित होण्याच्या योग्यतेची वाटते. जर फेबर अँड फेबरला तिचं भाषांतर अजमावावंसं वाटत असेल, तर मी हे काम इतर कोणाइतकंच चांगलं करू शकेन. माझं फ्रेंच भाषेचं ज्ञान विद्वत्तापूर्ण आहे असा माझा दावा नाहीय; पण ज्या तऱ्हेच्या फ्रेंच समाजात ती घडते, त्यात वावरण्याचा मला अनुभव आहे. आणि मला फ्रेंच अशिष्ट भाषा (slang) अवगत आहे– खूप उत्तम नसली, तरी बहुतेक इंग्रजांपेक्षा चांगली. अशा प्रकारचं पुस्तक खपेल की नाही, हे मला माहीत नाही. पण मला वाटतं, एमिल झोलाच्या कादंबऱ्या इंग्लंडमध्ये जातात आणि या लेखकाचं झोलाशी थोडं फार साम्य जाणवतं. फेबर अँड फेबरला या बाबतीत पुढे जायची इच्छा आहे का, हे तुम्ही मला कळवू शकाल? त्यांना हे पुस्तक पाहायचं असल्यास मी ते पाठवू शकतो किंवा नमुना म्हणून काही पानांचं भाषांतर करू शकतो...'

एलियटने बहुदा पुस्तक बघायला होकार दिला असणार,

कारण चारच दिवसांनी ऑर्वेलने त्याला एक छोटं, चार-पाच ओळींचं दुसरं पत्र लिहून पुस्तक पाठवत असल्याचं सांगितलंय. ऑर्वेलला या वेळी कामाची किती गरज वाटत होती, हे त्याने पुढे जे लिहिलंय त्यावरून लक्षात येतं : 'फेबर अँड फेबरला कधी दुसऱ्याही कुठल्या फ्रेंच पुस्तकाचं भाषांतर करण्याची गरज भासली, तर त्यांनी मला तशी संधी दिल्यास मी अत्यंत ऋणी राहीन. मी अशा तऱ्हेचं एखादं काम करायला फार उत्सुक आहे. मी ते कुठल्याही सर्वसाधारण भाषांतरकाराइतकं चांगलं करू शकेन, असं मला वाटतं.'

या पत्रांतला आर्जवाचा सूर आणि त्यांत ऑर्वेलने कुठेही 'मी इतर भाषांतरकारांपेक्षा जास्त चांगलं काम करू शकेन' असं न म्हणणं, या दोन्ही गोष्टी लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत.

एलियट/फेबर यांनी ही फ्रेंच कादंबरी अत्यंत बीभत्स असल्याचं कारण देऊन नाकारली. यानंतर थोड्याच महिन्यांत एलियटने सुरुवातीला ज्याचा उल्लेख केला आहे ते ऑर्वेलचं पहिलं स्वतंत्र लेखनही नाकारलं. या लेखनाच्या सुधारित खर्ड्यासाठी– जो नंतर 'डाऊन अँड आऊट इन पॅरिस अँड लंडन' शीर्षकाने प्रसिद्ध झाला. प्रकाशक मिळावा म्हणून प्रयत्न करणाऱ्या ऑर्वेलने साहित्यिक एजंट लिओनार्ड मूर याला २६ एप्रिल १९३२ रोजी जे पहिलंच पत्र पाठवलं, त्यात ऑर्वेल पुन्हा एकदा भाषांतराचं काम मिळवण्यासाठी प्रयत्न करताना दिसतो. 'एलियटने भाषांतरासाठी नाकारलेली फ्रेंच कादंबरी पोर्नोग्राफी नाहीय, एखादा धाडसी प्रकाशक ती छापणं शक्य आहे, तुझ्या माहितीत तसा कोणी आहे का?' असं तो या पत्रात मूरला विचारतो.

ऑर्वेलने या पत्रात हेही उघड केलंय की, मधल्या काळात तो 'चॅटो अँड विंड्स' या प्रकाशकाकडे एमिल झोलाच्या कादंबऱ्यांचं भाषांतर करण्याचा प्रस्ताव घेऊन गेला होता, पण त्यांनीही ऑर्वेलला दाद दिली नाही. झोलाची इंग्रजीत भाषांतरं झालीयत, पण ती भयानक आहेत, असं मत त्याने इथे व्यक्त केलंय. या पत्राच्या शेवटी तो मूरला लिहितो : 'मी जुन्या फ्रेंचचंही भाषांतर करू



शकतो, निदान इ.स. १४०० नंतरच्या.'

एवढा सारा खटाटोप करूनही त्या दिवसांत ऑर्वेलला भाषांतराचं काम काही मिळू शकलं नाही. मात्र लवकरच मूरने त्याला 'डाऊन अँड आऊट'साठी व्हिक्टर गोलान्झ हा प्रकाशक मिळवून दिला आणि त्यानंतर ऑर्वेल त्याच्या कादंबऱ्यांत व अन्य लेखनात इतका गुंतून गेला की, कधी काळी आपल्याला भाषांतर करायचं होतं, याची पुढे बहुधा त्याला आठवणही राहिली नसेल.

**३. वर्गजाणीव**

ऑर्वेलच्या 'रोड टू विगन पीअर' या पुस्तकात एक आत्मचरित्रात्मक प्रकरण आहे, ज्यात त्याने इंग्रज समाजातल्या वर्ग-अहंकाराविषयी विस्ताराने लिहिलंय. त्याला स्वतःला याचा प्रत्यय तो सहा वर्षांचा असल्यापासून येऊ लागला होता. ऑर्वेलच्या आईने त्याचे मित्र असलेल्या प्लंबरच्या मुलांबरोबर खेळायला त्यालामनाई केली होती. तो म्हणतो, 'या आधी लोहार, कोळी, गवंडी ही त्याची हीरो मंडळी होती : ती त्याला आवडणारी कामं करत आणि त्यांत त्याला लुडबूड करायलाही देत.' पण अचानक या प्रेमळ सोबत्यांपासून त्याला दूर करण्यात आलं. पांढरपेशांच्या जगात श्रमिक वर्गाविषयी- ते घाणेरडे असतात, अशुद्ध भाषा बोलतात, त्यांना वास येतो- असे समज लहानपणापासून मुलांच्या मनावर बिंबवले जातात, त्यांचा ऑर्वेलच्या मनावर तो अगदी मोठा होईपर्यंत पगडा राहिला होता.

तो तेरा वर्षांचा असतानाच्या एका प्रसंगाचं वर्णन त्याने केलंय : तो रेल्वेगाडीच्या तिसऱ्या दर्जाच्या डब्यातून प्रवास करत होता आणि शेळ्या-मेंढरं आणि डुकरं विकायला गेलेल्या पशुपाळांनी डबा भरलेला होता. मधेच त्यांच्यातल्या कोणी तरी एक बिअरची बाटली काढली आणि सर्व जण ती घोट-घोट पीत पुढे सरकवायला लागले. ऑर्वेलने लिहिलंय, 'त्या' लोकांनी तोंड लावलेल्या बाटलीतून मला प्यायला लागलं असतं, तर मला नक्कीच ओकारी आली असती. पुढे तो म्हणतो की, आजही मला कोणी उष्ट्या केलेल्या कपातून प्यायला आवडणार नाही, पण त्यामागे वर्गभावना नसेल. नंतरच्या काळातल्या भटक्यांसोबतच्या जगण्याने आपली या वर्गजाणिवेतून सुटका झाली, असं मत त्याने व्यक्त केलं आहे.

या प्रकरणाच्या शेवटच्या भागात, वर्गमुक्त होण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रागतिक विचाराच्या मध्यमवर्गीयांविषयी- विशेषतः समाजवादी व कम्युनिस्ट यांच्याविषयी- ऑर्वेलने काही मनोरंजक, थोडी अन्यायकारकसुद्धा निरीक्षणं नोंदवली आहेत. तो म्हणतो : ते कितीही प्रामाणिक असले, तरी खाणंपिणं, कपडे, मित्र, पुस्तकं, संगीत या संदर्भातल्या त्यांच्या आवडी-निवडी मध्यमवर्गीयच राहतात. ते लग्नसुद्धा त्यांच्याच वर्गातल्या मुलीशी करतात. त्यांचे 'टेबल मॅनर्स' बदलत नाहीत! मी त्यांच्यातल्या एकालाही सूप भुरके मारून पिताना किंवा चहा बशीत ओतून पिताना पाहिलेलं नाही.

या टेबल-शिष्टाचारांच्या संदर्भातली एक मजेदार हकिगत मला बर्नार्ड क्रिक यांनी लिहिलेल्या ऑर्वेल-चरित्रात वाचायला मिळाली. ऑर्वेल बीबीसीमध्ये काम करत असताना तिथल्या जॉन मॉरिस नावाच्या सहकाऱ्याची तो अकारण चेष्टा करत असे. क्रिक यांच्या मते, मॉरिस ऑर्वेलला दिखाऊ व पोकळ वाटत असावा. ऑर्वेलच्या अशा वागण्याविषयी मॉरिसने, 'सम आर मोअर इक्वल दॅन अदर्स' शीर्षकाचा एक लेख लिहून ठेवलाय. बर्नार्ड क्रिकनी ही घटना त्यातून उद्धृत केलीय : ऑर्वेल आणि मॉरिस दोघे जण एकदा बीबीसीच्या कँटीनमध्ये एका टेबलावर बसलेले असताना ऑर्वेलने आपला चहा बशीत ओतून घेतला आणि तो सुर्र-सुर्र असा मोठा आवाज करत पिऊ लागला. मॉरिस म्हणतो, 'मी काही न बोलता माझ्या नेहमीच्या पद्धतीने चहा पीत राहिलो, तेव्हा ऑर्वेल माझ्याकडे आव्हानात्मक नजरेने पाहत राहिला. आमच्या टेबलावर दोन द्वाररक्षक बसले होते, त्यांनाही कसं तरीच झालं आणि थोड्याच वेळात ते तिथून उठून निघून गेले!'

**जयप्रकाश सावंत**, मुंबई
jsawant48@gmail.com
Mob. : 93217 76052

('ॲनिमल फार्म व 1984' या दोन कादंबऱ्यांमुळे जगप्रसिद्ध झालेल्या जॉर्ज ऑर्वेल या लेखकाचा ७१ स्मृतिदिन २१ जानेवारी रोजी आहे, त्यानिमित्ताने हा लेख प्रसिद्ध करीत आहोत.)

**टिपा :**

१. इटनमध्ये शिकणाऱ्या ११०० मुलांपैकी सत्तर 'किंग्ज स्कॉलर्स' असत. ऑर्वेल, मिनर्स, रन्सिमन हे असे किंग्ज स्कॉलर्स होते. इतर विद्यार्थ्यांना 'ऑपिडन' म्हटलं जाई. : मुळातली टीप संक्षेपाने.

२. ऑर्वेलचं कुटुंब उन्हाळ्याच्या सुट्टीत कॉर्नवॉलमधल्या लुई इथे राहायला गेलं होतं. : मुळातली टीप संक्षेपाने.

३. त्या काळातल्या पौंड-शिलिंग-पेन्सचं कोष्टक : १ पौंड = २० शिलिंग, १ शिलिंग = १२ पेन्स, अर्थात १ पौंड = २४० पेन्स.

नवे पुस्तक

विजया देव

# सदा सर्वदा

'सदा सर्वदा' हा लेखसंग्रह नामवंत संपादक सदा डुम्बरे यांचा आहे. आपल्या पत्रकारिता-संपादकीय कारकिर्दीत आपल्या अवतीभवती, देशात, जगात काय-काय घडतंय, याचा डोळस वेध डुम्बरे सतत घेत होते, त्या-त्या ठिकाणी जातही होते; त्यात अजूनही खंड पडलेला नाही. त्यातले जे वेगवेगळे विषय, पैलू त्यांनी पाहिले-अनुभवले, ते त्यांनी त्या-त्या वेळी लेखरूपाने मांडले. या संग्रहातील लेख हे १९७९ ते २०१७ अशा अडतीस वर्षांच्या दीर्घ कालावधीतले आहेत. लेखनाला उद्युक्त करणाऱ्या वेगवेगळ्या घटना-प्रसंगांतून ते लिहिले गेलेले आहेत. त्यामुळे अर्थातच लेखांची लांबी कमी-जास्त आहे. विषयानुरूप असे होणे साहजिकच आहे. एकूण लेखसंख्या ३८ आहे.

या पुस्तकाला श्री. भानू काळे (संपादक, 'अंतर्नाद') यांची प्रस्तावना लाभलेली आहे. या दीर्घ प्रस्तावनेत काळे यांनी योग्य पारख करणाऱ्या नजरेने प्रस्तुत लेखनाची मीमांसा अत्यंत सौहार्दाने केली आहे. ही प्रस्तावना हीदेखील या पुस्तकाची जमेची बाजू आहे. लेखक डुम्बरे आणि त्यांचे वैचारिक गद्य यांचे आकलन वाचकाची जाण समृद्ध करते. स्वत: लेखकानेही मनोगत मांडले आहे, त्यात आपली भूमिका त्याने स्पष्ट केली आहे.

डुम्बरे यांचे हे जीवनस्पर्शी लेखन वाचकाने नुसते वाचले आणि सोडून दिले, असे होत नाही; ते विचारप्रवृत्त करणारे आहे. उदाहरणार्थ- 'मिलेनियम धमाका' हा लेख (सहस्रकाचा किंवा उज्ज्वल भविष्यकाळाचा उत्सवी जागर) किंवा 'अभयारण्य : लोक विरुद्ध प्राणी?' या शीर्षकाच्या प्रश्नचिन्हातच एक गर्भितार्थ आहे. लोकविन्मुख कारभार आणि जंगल विरुद्ध माणूस असे चित्र उभे राहणे यामागची वस्तुस्थिती लेखक यात सांगतो. प्रश्न उपस्थित करून आपल्या विचारांना चालना देण्याचे काम लेखक करतो. उदाहरणार्थ- 'पर्यावरण : वैश्विक भान' या

सदा डुम्बरे यांना ग्रामीण जीवनातले गुंतागुंतीचे प्रश्न जितके जिव्हाळ्याचे आहेत, तितकीच पुण्यनगरीदेखील आंतरिक जिव्हाळ्याची आहे. कारण पुण्याला फार मोठा सांस्कृतिक वारसा आहे. त्या वारशावरच घाला घातला जातो, तेव्हा लेखक आपल्या संयमित पण धारदार लेखणीने या अनास्थेची दखल घेतो. याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'सांस्कृतिक रस्ते : ज्ञानदेव-तुकाराम चालले!' सांस्कृतिक जीवनाची ही पडझड आणि त्याकडे होणारी डोळेझाक या लेखात मांडताना (कै.) दि. बा. मोकाशी यांच्या 'देव चालले' या कादंबरीतला अखेरचा हृद्य प्रसंग डुम्बरे उद्धृत करतात. 'पुणे : सांस्कृतिक राजधानी' या लेखातूनही पुण्याच्या वैचारिक-सांस्कृतिक धुरिणत्वाचा परामर्श ते घेतात, काळ बदलल्यावर आपण कोणतं ध्येय ठेवलं पाहिजे, याचा विचार मांडतात.

लेखाचा शेवटच 'अणुऊर्जा प्रकल्पांबाबत आपण कोणाला दोष देऊ शकतो?' असा आहे.

'सदा सर्वदा' हे या पुस्तकाचे शीर्षक अतिशय अन्वर्थक आहे. स्वत:चे नाव लेखकाने या मथळ्यात गोवले आहेच आणि आपल्या अवतीभोवती सदोदित जे घडत असतं, त्याचा परामर्श घेणारे हे लेखन आहे. एरवी आपल्याला त्या भवतालचे कप्पे पाडता येत नाहीत; पण एकेका गोष्टीवर विचार करताना त्याची आपोआपच विभागणी होते- सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक- अशी. असा सर्व काळ जीवन व्यापून राहणाऱ्या वास्तवाची दखल हा अर्थ या शीर्षकातून चांगला व्यक्त होतो. त्यामुळे हे श्रुतयोजन समर्पक ठरते. (श्रुतयोजन म्हणजे आपल्या वाङ्मयातल्या एखाद्या सुपरिचित उक्तीचा वापर नंतरच्या लेखकाने आपल्या लेखनात केलेला असतो. 'सदा सर्वदा योग तुझा घडावा' हा रामदासांचा श्लोक आपल्या तोंडी असतोच. त्याचं उपयोजन इथे केलेलं आहे.)

प्रत्येक लेखाच्या सुरुवातीला, त्या लेखातील मध्यवर्ती विषयाची कल्पना देणारा एक पाच-सहा ओळींचा परिच्छेद आहे. तो लेखाचे विचारसूत्र मांडतो.

या संग्रहात जे विविध लेख आहेत, त्यांतील विषय स्थूलमानाने आपण पाहू- म्हणजे त्याची व्याप्ती लक्षात येईल. डुम्बरे जागरूक पत्रकार असल्यामुळे आणि त्यांचे सामाजिक भान प्रखर असल्याने विषयांचा आवाकाही खूप मोठा आहे. या संग्रहात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, पर्यावरण-निसर्गविषयक, भाषिक-साहित्यिक, नागरी जीवनाशी निगडित असे बहुविध विषय आहेत. शिवाय वेगवेगळ्या चळवळी-आंदोलने, धरणग्रस्त, जनसंज्ञापन माध्यमे यांचाही परामर्श ते अभ्यासू वृत्तीने घेतात. मुख्य म्हणजे त्या-त्या घटिताचे सरळसोट 'रिपोर्ताज'- वृत्तांकन न करता, ते त्यातली गुंतागुंत लक्षात घेतात. समाजात उपस्थित होणारा कोणताही विषय किंवा घडलेली घटना ते नुसती तटस्थपणे मांडत नाहीत, तर त्याच्या सर्व बाजू ते विचारात घेतात. त्यावर अभ्यास करतात, मागचे-पुढचे संदर्भ, त्यात गुंतलेले प्रश्न-उपप्रश्न यांची ते दखल घेतात. उदाहरणार्थ- 'बागलकोट : जुनं वाचवायचं की...?' हा लेख. धरणप्रकल्प, त्यापायी शहर पाण्याखाली जाणं आणि पुनर्वसन, त्यातून निर्माण होणारा लोक व सरकार यांच्यातला संघर्ष- हा विषय. त्याचा अत्यंत अभ्यासपूर्ण वेध लेखकाने घेतला आहे. किंवा 'मुली!' हा लेख अत्यंत कळवळ्याने लिहिलेला आणि तितकेच साधार विवेचन असलेला आहे. सौंदर्यदृष्टी आणि अभ्यासपूर्ण शास्त्रीय दृष्टी यांचा उत्कृष्ट संगम असलेला लेख पाहायचा असेल, तर 'अशोकाची नाममुद्रा' वाचावा.

या लेखात महत्त्वाचा वाटा आहे तो, डुम्बरे यांच्या भाषेचा. या लेखनाच्या भाषेबद्दल थोडक्यात असं सांगता येईल की, वैचारिक साहित्याची भाषा कशी असावी याचा वस्तुपाठ म्हणजे हे लेखन आहे. नेमकी शब्दयोजना (विषयानुरूप आणि अनौपचारिकतेकडे कल असला, तरी सहजपणे इंग्रजी शब्द सामावून घेणं.) विषयाला न्याय देते. वाचकाला विषयात गुंतवून ठेवण्यासाठी ते अगदी सहजपणे वेधक वाक्यप्रयोग करतात. त्याचं एक मनोज्ञ उदाहरण म्हणजे, 'पुणे शहराच्या संस्कृतीचा देव्हारा' असलेल्या फर्ग्युसन कॉलेज रोड (१४६); 'शैव म्हणजे अभेदभावी' (१०९), 'हा रस्ता ट्रेंडसेटर होता' (१४७). इंग्रजी शब्द, क्वचित एखादे इंग्रजी वाक्य येते. (उदाहरणार्थ- 'युरोप वॉज द ड्रायव्हिंग फोर्स') पण ते त्या ठिकाणी कमी शब्दांत मोठा आशय सांगून जाते. इंग्रजी टाळायचे, या सोवळेपणापेक्षा हा समावेशकपणा विषयाला अधिक न्याय देतो. शिवाय त्या वेळी तो लेख लिहिणं, लगेच प्रसिद्ध होणं या रेट्यात ते अपरिहार्यही असतं. मात्र, एक सांगितलं पाहिजे की- शब्दाच्या वापराबाबत, अर्थाबाबत डुम्बरे अतिशय जागरूक, दक्ष असतात.

'करमणुकीचं राजकारण आणि राजकारणाची करमणूक' (४७) हा नुसता शब्दखेळ नाही, तर त्यात गांभीर्यही आहे. डुम्बरे यांच्या चित्रमय शैलीचं एकच उदाहरण इथे देते : 'गेल्या वर्षी पहिल्यांदाच पाणी आलं. पहिल्याच वर्षी सातशे रुपयांचा कांदा, हजार रुपयांचा वाल आणि तीनशे रुपयांची मिरची या बहादूर शेतकऱ्यानं काढली होती. अजून पायात जोडा नव्हता, पैरण फाटलेली होती. मुंडाशाचा रंग उडालेला होता, पण मनात मात्र आनंदाचे कारंजे सुरू होते.' (१९१) एखाद्या चित्रकाराला किंवा चित्रपटकर्त्याला मोह व्हावा निर्मितीचा, इतकं हे शब्दचित्र जिवंत आहे. निसर्गाविषयी लेखकाच्या मनात सौंदर्यवेधी कोमलता आहे, ती भाषेत कशी व्यक्त होते ते पाहा अशोकवृक्षाच्या फुलांच्या वर्णनात (३१). व्यक्तीची अचूक पारख करावी, तीही डुम्बरे यांनीच. शरद पवारांविषयी ते म्हणतात, 'बदल हा त्यांच्या राजकीय स्थैर्याचा स्थायिभाव आहे' (१७०) आणि ते किती सत्य




आहे, त्याचा पडताळा आपण घेत आहोतच.

आवश्यक तिथे सडेतोड, परखड भाषा– कुठलाही संदेह राहणार नाही अशी रोखठोक भाषा, काळजाला भिडणारा प्रश्न मांडताना वाचकाचे संवेदन जागे करणारी भाषा आपल्याला विषयाच्या गाभ्यापर्यंत नेते. बऱ्याचदा विषय मांडून लेखक थांबत नाही, तर त्यावर उपायही सुचवतो, हे त्यांच्या विचारातले 'कर्ते'पण! उदाहरणार्थ– 'अभयारण्य : लोक विरुद्ध प्राणी?' (१८६) या लेखात आदिवासींच्या निर्वाहाचे पर्यायी मार्ग ते सुचवतात. एखादा विषय मेहनतीनं समजून घ्यायचा आणि ते आकलन वाचकांपर्यंत नेमक्या भाषेत, सुस्पष्टपणे पोचवायचे याची साक्ष देणारे लेख या संग्रहात आहेत. एकच उदाहरण देते, 'नेमेचि येतो मग पावसाळा...' (१७५-१८०) हे विषय तसे साधे-सरळ नसतात, आव्हानात्मक असतात. पण अभ्यासान्ती या विषयांना भिडल्यामुळे अनेक वर्षांपूर्वी लिहिलेले हे लेख आजही प्रस्तुत ठरतात, मार्गदर्शक ठरतात.

डुम्बरे यांची दृष्टी फक्त प्रदेश-देश यांच्यापुरती सीमित नाही, जागतिक प्रश्नही त्यांच्या विचारविमर्शाचा भाग आहेत. त्यामुळे अमेरिका, चीन या संबंधातले विषयही त्यांनी हाताळले आहेत. जगाकडे पाहण्याचा डुम्बरे यांचा परिघ खरोखरच फार विस्तृत आहे. एवढेच नव्हे, तर विहंग दृष्टीने (बर्ड्‌स आय व्ह्यू) ते या जगाकडे पाहतात, म्हणून त्यांना तो आवाका समदर्शीपणे पेलता येतो.

या संग्रहातला वेगळ्या धर्तीचा आणि अतिशय रोचक असा एक लेख म्हणजे, 'वाचकपत्रे : वृत्तपत्रांचा अलंकार'. वाचकांच्या प्रतिसादाशिवाय वृत्तपत्रे अपुरीच असतात. कारण वृत्तपत्रे ज्या समाजासाठी असतात, त्या 'जनमनाचा कानोसा' या वाचकपत्रांतून घेता येतो. 'दैनिक सकाळ'च्या सुवर्णमहोत्सवी अंकात (१ जानेवारी १९८२) अर्धशतकातील वाचकपत्रांचा आढावा घेतला गेला. समाज कसा बदलत जातो, किती विषयांवर वाचक मुखर होत असतात, राहणीतल्या बारीकसारीक गोष्टींपासून आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत काय-काय मते मांडतात, याचा आरसा म्हणजे ही पत्रे होत. म्हणून लेखक या पत्रांना वृत्तपत्रांचा अलंकार म्हणतो, हे यथार्थच आहे. ही पत्रे हा एका मोठ्या संशोधन-अभ्यासाचा विषयही होऊ शकतो.

असे पुस्तक प्रथम आले ते 'लंडन टाइम्स'च्या 'द फर्स्ट कुकू'च्या रूपाने. आता याचे नाव 'द फर्स्ट कुकू' का, तर इंग्लंडमधला बर्फगार हिवाळा संपता-संपता वसंताची चाहूल लागली की, कोकिळस्वर ऐकू येतो आणि तो प्रथम ऐकलेली व्यक्ती ताबडतोब 'आज कोकिळकूजन ऐकल्या'चे 'लंडन टाइम्स'ला कळवते. ते पत्र वृत्तपत्रात प्रसिद्ध होते. म्हणून या संग्रहाचे नाव 'द फर्स्ट कुकू' अशी ही कहाणी. अर्थात सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, जागतिक घडामोडींवरून वाचकमनात उमटणारे सर्वच तरंग पत्रांतून व्यक्त होतात. त्यांचा समावेश त्या ७५ वर्षांच्या संकलनात आहेच.

सदा डुम्बरे यांना ग्रामीण जीवनातले गुंतागुंतीचे प्रश्न जितके जिव्हाळ्याचे आहेत, तितकीच पुण्यनगरीदेखील आंतरिक जिव्हाळ्याची आहे. कारण पुण्याला फार मोठा सांस्कृतिक वारसा आहे. पण त्या वारशावरच घाला घातला जातो, तेव्हा लेखक आपल्या संयमित पण धारदार लेखणीने या अनास्थेची दखल घेतो. याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'सांस्कृतिक रस्ते : ज्ञानदेव-तुकाराम चालले!' सांस्कृतिक जीवनाची ही पडझड आणि त्याकडे होणारी डोळेझाक या लेखात मांडताना (कै.) दि. बा. मोकाशी यांच्या 'देव चालले' या कादंबरीतला अखेरचा हृद्य प्रसंग डुम्बरे उद्धृत करतात. फर्ग्युसन रोडवरच्या 'देव रस्त्या'च्या निमित्ताने भारतीय संस्कृतीवरच ते विषण्ण भाष्य करतात.

'पुणे : सांस्कृतिक राजधानी' या दीर्घ लेखातूनही पुण्याच्या वैचारिक-सांस्कृतिक धुरिणत्वाचा परामर्श ते घेतात

आणि आता काळ बदलल्यावर आपण कोणतं ध्येय ठेवलं पाहिजे, याचा विचार मांडतात. ऐतिहासिक परंपरांचं भान राखून विकासाचं नवं प्रारूप सिद्ध करण्याचं आव्हान– ‘महाराष्ट्र धर्म’ रुजवण्याचं आव्हान पेलण्याची ते हाक देतात.

वाचनीयतेच्या दृष्टीने या पुस्तकाची मांडणी देखणी आणि सुबक झालेली आहे. त्याला दर्जेदार निर्मितिमूल्य आहे. मुखपृष्ठावरची काळ्या पार्श्वभूमीवरची मांडणी, रंगसंगती आणि अक्षरवळण वेधक आहे. त्याची आवर्जून दखल घेतली पाहिजे. ‘सदा सर्वदा’ हे शीर्षक आणि सदा डुम्बरे हे लेखकनाम यांची अक्षरे क्लासिकल देवनागरीमध्ये आहेत. त्याला एक रेखीव अभिजात सौंदर्य आहे. लेखकाची वैचारिक मांडणी, भूमिका स्पष्ट–थेट आहे, नि:संदिग्ध आहे; त्याला साजेसे हे अक्षरवळण आहे. अनलंकृत असे.

शीर्षकात आणि लेखकनामात गमतीशीर साधर्म्य जुळून आले आहे. त्यातील कल्पकतेला न्याय देणारे डिझाइन मुखपृष्ठावर काळ्या पार्श्वभूमीवर पाच चौकोनांत रेखाटलेले आहे. (कारण शीर्षक व लेखकनाम यांत पाच–पाच अक्षरे आहेत.) पाच झरोके, त्यांचे वेगवेगळे रंग आणि त्यातून दिसणारे जग. जगाचा रंग एक– पिवळा, त्याची पार्श्वभूमी वेगवेगळ्या रंगांची. आपल्या जागीच राहून आपल्या परिप्रेक्ष्यातून भवतालाकडे पाहताना काय–काय दिसतं, कसं दिसतं ते सर्व लेखनातून आपल्यापर्यंत पोचते. त्याची प्रतीकात्मक झलक मुखपृष्ठावरून दिसते. श्याम देशपांडे यांच्या कल्पकतेला दाद द्यायलाच हवी.

या संग्रहातील लेख पूर्वी केव्हा, कुठे प्रसिद्ध झाले याची सूची पुस्तकाच्या शेवटी पृष्ठ २७०–२७१ वर आहे. ज्या क्रमाने ते प्रसिद्ध झाले, त्या कालक्रमाने ते इथे पुस्तकात नाहीत. कोणत्याही लेखाला तात्कालिक निमित्त, संदर्भ असले तरी त्या अर्थाने कोणताच लेख कालबाह्य ठरत नाही. आज वाचतानाही त्यातला ताजेपणा जाणवतो, इतकंच नव्हे तर (काही ठिकाणी– दुर्दैवाने समाजाची मानसिकता तीच राहिल्यामुळे) तो आजही लागू पडतो. पुस्तकात मुद्रणदोष अगदी किरकोळ प्रमाणात आहेत, पण एकंदरीने सुखद अनुभव येतो. महत्त्वाचे म्हणजे, हे लेखन क्रमश: वाचत गेले पाहिजे, असे नाही. आपल्या रुचीनुसार कोणताही लेख केव्हाही वाचावा असा आहे.

आपल्या लेखांसाठी पुरेसे संदर्भ, जरूर तेथे आकडेवारी दिलेली असल्यामुळे या संग्रहाचे संदर्भमूल्य वाढले आहे. शिवाय एखाद्या विषयाच्या संदर्भात लेखकाने केलेला युक्तिवाद किंवा मीमांसा जाणकार वाचकाइतकीच अभ्यासकालाही उपयुक्त आहे. उदाहरणार्थ– ‘साहित्य संमेलन : तेच ते’ या लेखात इंग्रजी अंगीकारणे का योग्य आहे, याची मीमांसा डुम्बरे करतात. ‘... जगण्याची किंमत देऊन भाषा नको, असे म्हणणारा एक मोठा वर्ग इथं आहे आणि त्याने आधीच भरपूर किंमत चुकवली आहे, याचं भानही ठेवलं पाहिजे.’ (२१०)

संदर्भासाठी ठोस आकडेवारी हेही या लेखांचे वैशिष्ट्य. ‘लोकसंख्या’ या विषयावरील तीन लेखांमध्ये विवेचन पाहता येईल, अशी आकडेवारी आहे. मात्र संख्या–आकडेवारी यात संवेदनशीलता हरवून जात नाही, उलट ती अधिक जाणवते, हे विशेष.

शेवटी या पुस्तकाबद्दल साररूपानं सांगायचं, तर त्यासाठी ‘स्वस्तिक’ हे रूपक मला योजावंसं वाटतं. स्वस्तिकाचा केंद्रबिंदू एक, पण त्याचा विस्तार असतो अष्टदिशांना. एकमेकांपासून वेगळ्या पण केंद्रस्थानी जोडलेल्या छेदरेषा आणि या रेषांचा विस्तार अमर्याद, असीम. तसंच या पुस्तकातल्या लेखांचं आहे. त्यांच्या केंद्रस्थानी आहे सदा डुम्बरे यांचं व्यक्तिमत्त्व. त्यांनी भोवतालच्या जीवनाच्या वेगवेगळ्या पैलूंचा घेतलेला वेध हा त्याचा विस्तार. सामाजिक प्रश्नांबद्दल कळवळा, राजकीय वास्तवाचं भान, भाषिक प्रश्न, डोळस आणि अभ्यासपूर्ण निसर्गप्रेम, बदलत्या जीवनाचे पैलू हे त्याला फुटलेले धुमारे.

म्हणून हा ठेवा सदा सर्वदा जपावा असा आहे.

**डॉ. विजया देव, पुणे**
Mob : 9423009522

**सदा सर्वदा**
लेखक : सदा डुम्बरे
गोल्डन पेज पब्लिकेशन, पुणे
पृष्ठे : २७१
मूल्य : रुपये ३७५/-

# प्रतिसाद

## पंचसूत्रीतील पहिल्या मुद्यासंदर्भात काही मुद्दे...

दि. २ जानेवारीच्या अंकातील संपादकीयाचा विषय पाहिल्यावर आधीच दोन मुलाखती होऊन गेल्यावर केशवरावांची तिसरी मुलाखत पुन्हा कशासाठी, असे क्षणभर वाटून गेले. पण संपादकीय वाचून झाल्यावर तिसरी मुलाखतही पहिल्या दोन्हींपेक्षा जास्त महत्त्वाची व निर्णायक असल्याने तिचे महत्त्व उलगडले.

गेल्या १०-१५ वर्षांमध्ये वेगाने बदल होत असलेली माहितीची देवाण-घेवाण व आपली मते/प्रतिक्रिया रोखठोक मुक्तपणे समाजापुढे मांडण्याची सोय अनेक जण वापरायला लागल्याने प्रिंट व दृक्मीडियाचे महत्त्व घसरत आहे, असे दिसते. इतर अनेक अडचणी आणि त्यामध्ये मागील वर्षभरात 'दुष्काळात तेरावा महिना' यावा त्याप्रमाणे कोरोना संकटाने निर्माण केलेली अडचण ही भर पडलेली आहे. अशा सर्व बदलांना तोंद देताना संपादक म्हणून वैचारिक नियतकालिकाचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी आपण विचारलेल्या योग्य प्रश्नांमधून तुम्ही मार्ग कसा काढावा यावर केशवरावांनी केलेले मार्गदर्शन (पंचसूत्री) किती महत्त्वाचे आहे, हे उलगडते.

पहिले सूत्र 'दीर्घ लेखमाला टाळा' याची दोन वेगवेगळी उदाहरणे आठवली. श्री.बागल यांनी एक अत्यंत अभ्यासपूर्ण व माहितीपूर्ण लेखमालिकेतील चीनमधील माओंपासून शी पिंग यांच्यापर्यंत राजकारणात काय काय, कसकसे व काय कारणाने बदल होत गेले याची सविस्तर पण संक्षिप्त चर्चा केली. चीनचा भूगोल, त्यातील वेगवेगळ्या प्रांतांचे लोकेशन, त्यांचे केंद्रीय सत्तेतील वजन, तेथील नेतृत्व व अशा सर्व नेत्यांचे परस्परसंबंध व स्पर्धा हे भारतीय वाचकांशी आजवर अपरिचित राहिले असल्याने किती वाचकांचे इंटरेस्ट टिकून राहिले, अशी शंका मनात आली. त्यामुळे श्री.बागल यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीबद्दल पूर्ण आदर राखून असे म्हणावेसे वाटते की, कदाचित माओंपासून आजपर्यंत ज्यांनी पक्षाचे नेतृत्व भूषविले, त्यातील प्रत्येकाबद्दल एक-एक लेख लिहिला असता तर जास्त योग्य झाले असते.

गांधीजींबद्दल आंतरिक ओढ निर्माण झाल्याने पाश्चात्त्य उच्चवर्णीय विदुषी इथे कशा आल्या, ही संजीवनी खेर यांची काहीशी माहितीपूर्ण लेखमालिका बऱ्याच दिवस चालत राहिली. यामधील अनेक जणी गांधीजींची पूर्वपरवानगी घेऊन व गांधींनी नकार देऊनही इथे येऊन धडकल्या, असे जरी असले तरी या सर्व जणींबद्दलच्या कथा समानच आहेत याचा पुन्हा पुन्हा अनुभव घ्यावा लागला. ह्यापेक्षा एक-दोन जणींची पूर्ण कहाणी व इतर जणींचा नामोल्लेख जरी केला असता तरी पुरेसे झाले असते। त्यानंतरच्या लेखिकेचा अंतिम लेख मात्र जरूरी होता.

पण एक लेखमाला बरीच लांबूनही माझ्याप्रमाणे इतर अनेक वाचकांना आवडल,ी असे मी समजतो. डॅनियल मस्कारणीस यांनी अतिशय मोकळ्या व खेळकर शैलीमध्ये वसईमधील मराठी भाषक ख्रिश्चन समाजामधील वैचारिक घुसळण उत्तम रंगवली होती, हेही आठवले.

असो, पंचसूत्रीतील पहिल्या मुद्यावरील लेखन बरेच लांबले. इतर मुद्यांवरही काही लिहिण्यासारखे उरले आहे असे वाटते.

पण त्यासाठी पुन्हा वेगळा प्रतिसाद लिहावा लागेल. साधनाची मागील काही वर्षांत योग्य दिशेने झालेली प्रगती याबद्दल लिहायची इच्छा आहे.

**रमेश आगाशे,** सातारा

## दुसऱ्यांदा वाचताना फार पटून गेलेला विचार अधोरेखित करते...

मी साधना साप्ताहिकाची वर्गणीदार झाले ते किती हितावह ठरले याचा प्रत्यय साधनाच्या प्रत्येक अंकामुळे वारंवार येतो. महामारीच्या काळातले ऑनलाईन पाठविलेले अंक मला मिळू शकले नाहीत, परंतु माझ्या असहायतेला प्रतिसाद देत साधनाने एप्रिल ते जुलै २०२० मधले सगळे अंक पाठवून दिले.

प्रत्येक अंकातील आवडलेले, मनन करायला लावणारे लेख मी पुन्हा वाचते. पहिल्या वाचनाचा प्रतिसाद मिळतो 'व्वा!', दुसऱ्यांदा वाचताना फार पटून गेलेले विचार अधोरेखित करते. तिसऱ्यांदा वाचते ते माझ्या लेखनात त्या विविध ठिकाणी, विविध अंगांनी उपयोग करता येतो म्हणून.

माझ्या सवयीप्रमाणे मला आवडलेले लेख इतरांनी वाचावेत म्हणून धडपडत (खास करून कोरोना काळात) अंक पाठवीत असते, समविचारी मित्रमैत्रिणींना वाचायला सांगते. इतरांना खूप महत्त्वाची खूप कामं असतात. मला दहाही दिशांनी मिळणारी माहिती संपुष्टात ठेवण्याखेरीज दुसरे कामच नसते. व्यासंगपूर्ण लेखनाला मी हमखास प्रतिसाद देते. त्यामुळे साधनात लिहिणाऱ्या अनेकांशी मी दूरध्वनीवरून संपर्क साधू शकले. हे सर्व लेखक साहित्यिक म्हणून माझ्यापेक्षा किती तरी ज्येष्ठ असूनही माझ्या प्रतिसादाने त्यांना झालेला आनंद निर्भेळ होता, हे त्यांच्या बोलण्यातून जाणवले.

लेखक आणि वाचकाला समृद्ध करणाऱ्या साधनाचे आभार मानावे तेवढे थोडेच.

**शैला राव,** गोवा

## आपण असे का वागतो?

साधनामधील (९ जानेवारी २०२१) हिंदी कवी मंगेश डबराल यांची स्मृती जागविणारा लेख वाचला. इतर भाषांतील प्रामुख्याने हिंदी भाषेतील कवींचे मोठेपण सांगत त्यांचे गारूड मराठी मनावर बसविण्याचा उपक्रम सध्या साधनापासून प.वा.पर्यंत सर्वत्र सुरू आहे.

आंतरभारती हवीच, पण त्यात आपल्या श्रेष्ठ कवींना आपण अगदी सहजपणे स्मृतीतून हद्दपार करण्यात यशस्वी होतो. लोककवी मनमोहन, ना.घ.देशपांडे आणि खरे तर भा.रा.तांबे यांच्याबद्दल आपण हे केलंय. आणि गुलजार आणि बच्चन हे महाकवी आहेत, हे आपण छानपणे मराठी मनावर कोरलंय. डबराल यांच्यावर साधनात लेख आला. तुलसी परब, गुरुनाथ धुरी, राजा ढाले यांची साधी नोंदही आपण त्या वेळी आणि आजही का घेत नाही? मराठी ही हिंदीची बोलीभाषा आहे, हे आपणच मराठी जनमानसावर नकळत बिंबवतोय का?

**दत्तप्रसाद दाभोळकर,** सातारा

---

## १ जानेवारीपासून साधनाच्या वर्गणीत वाढ

साधना साप्ताहिकाचे वर्षभरात मिळून ४८ अंक प्रकाशित होतात, त्यात तीन दिवाळी अंक (बालकुमार, युवा, मुख्य) आणि अन्य पाच विशेषांक असतात. हे सर्व अंक दर आठवड्याला वर्गणीदार वाचकांना पोस्टाने पाठवले जातात. वर्षभरातील या घरपोच अंकांसाठी वार्षिक, द्वैवार्षिक व त्रैवार्षिक वर्गणी भरण्याची सोय असते. प्रत्येक दोन किंवा तीन वर्षांनंतर या वर्गणीत थोडी वाढ केली जाते. त्यामुळे १ जानेवारी २०२१ पासून साधनाची वार्षिक द्वैवार्षिक व त्रैवार्षिक वर्गणी अनुक्रमे ९०० रुपये, १८०० रुपये, २७०० रुपये अशी आहे. ही वर्गणी चेक, कॅश, बँक ट्रान्सफर इत्यादी मार्गाने भरता येते, त्यासाठी आवश्यक तपशील साधनाच्या प्रत्येक अंकात अनुक्रमणिकेच्या पानावर असतात.


महासुपर
गृह कर्ज
आकर्षक व्याजदर
(रेपो रेटला संलग्न)
कमीत कमी ईएमआय
परतफेड कालावधी 30 वर्षे
शेवटचे दोन हप्ते माफ • प्रक्रिया शुल्कावर ५०% सवलत
*नियम व अटी लागू
सबसिडी रु.२.६७ लाखांपर्यंत प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत
बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक
8010633633 नंबर वर मिस कॉल द्या | Follow us @mahabank

Registered Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6 / 31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/ 2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Date of Posting : 18-1-2021 / Date of Publication : 18-1-2021

## १२ जानेवारी (राष्ट्रीय युवकदिन) रोजी सोनाली कुलकर्णी आणि सूरज येंगडे यांच्या हस्ते प्रकाशित झाले साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक

# तरुणाईसाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर

## प. रा. आर्डे




डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हयातीत आणि नंतरच्या कालखंडातही अनेक युवक-युवती अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात सहभागी झाले आहेत. या तरुणाईला डॉक्टरांच्या कर्तृत्वाचा अधिक तपशीलवार परिचय व्हावा आणि अंधश्रद्धा निर्मूलनच्या चळवळीला प्रेरणा मिळावी, हा या पुस्तक लेखनामागचा मुख्य हेतू आहे. १९८५ पासून २० ऑगस्ट २०१३ पर्यंत म्हणजे जवळजवळ २८ वर्षे मी डॉ. दाभोलकरांचा चळवळीतील साथी होतो, त्यामुळे त्यांचा स्वभाव, त्यांचे विचार आणि समाजाप्रती असलेली तळमळ हे सर्व मी जवळून अनुभवत होतो. माझे व इतर सहकाऱ्यांचे अनुभव एकत्र करून हे पुस्तक साकार झाले आहे.

**– प्रा. प. रा. आर्डे**

पृष्ठे २५६ । किंमत २५० रुपये
सवलतीत १५० रुपये (ट.ख. वेगळा)

तर्कशील व त्याचे तरुण मित्र-मैत्रिणी प्रश्न विचारतात आणि प्रा.आर्डे त्यांची उत्तरे देतात, या चर्चामंथनातून प्रवास उलडगत जातो–
डॉ.नरेंद्र दाभोलकरांच्या जीवनकार्याचा...

संपर्क

**साधना प्रकाशन**
४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph. 020 24459635
mediasadhana@gmail.com

also available at amazon.in

इ-बुक स्वरूपात किंडलवर उपलब्ध.